१ जुलै १९६५

तीस पैसे

# माणूस



एव्हरेस्टची यात्रा सफल झाली
आता तयारी हवी अंतराळयात्रेची

श्रेष्ठ साहित्याचा संग्रह
किफायतशीर गुंतवणूक

# राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

- मोठ्या रॉयल आकाराची एक हजार पृष्ठे (दोन भाग)
- उत्कृष्ट कागद, टिकाऊ बांधणी
- दलालांची आकर्षक रेखाचित्रे व बहुरंगी मुखपृष्ठे
- ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे, नकाशे

**किंमत ३६ रुपये**

**१०० रुपयांची ठेव**

**५ वर्षांसाठी**

- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे ठेवल्यास सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा लोकमान्य व राजमान्य ग्रंथ ताबडतोब विनामूल्य आपल्याला घरपोच मिळेल.
- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे आपली ठेव आजच पाठवा व आपली प्रत राखून ठेवा.
- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.
- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास ७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी.

राजहंस प्रकाशन पुणे

४१९ नारायण, पुणे




वर्ष पाचवे : अंक तिसरा : १ जुलै १९६५ : तीस पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. दूरध्वनी : ५७३५९

लेख : ● एव्हरेस्टची यशयात्रा
□ अशोक जैन

कविता : ● दोन कविता
□ ज्ञानेश्वर शंभरकर

कथा : ● फॅमिली
□ चंद्रशेखर मराठे

● वय
□ प्रमोद कुलकर्णी

पुस्तकपरिचय : ● नाझी भस्मासुराचा उदयास्त
□ रा. म. शास्त्री

शिवाय : ● जगाच्या पाठीवर, दिल्ली दरबार, रंगभूमी, चित्रपट, विचारवारे, भितीच्या तुंबड्या, ही नेहमीची सदरे.

मुखपृष्ठ ● सालकर

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## □ दिल्लीतील 'नू. म. वि.'

भारताच्या राजधानीत नित्य वावरणाऱ्या अनेक मराठी भाषिकांनाही ज्ञान नसते, की दिल्ली विश्वविद्यालयात 'मराठी' भाषेचे अध्यासन (फॅकल्टी) आहे. सुमारे २१ विद्यार्थी (बहुतेक सर्व अमराठीभाषी) याचा लाभ प्रतिवर्षी घेऊ शकत आहेत. प्रा. अ. म. करंदीकर हे या अध्यासनाचे प्रमुख असून, त्यांच्या सुविद्य पत्नी प्रा. शैलजाबाई करंदीकर या विभागात मदतनीस प्राध्यापक आहेत. काही वर्षांपूर्वी मुंबईचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्री (आता योजना-आयोगाचे सदस्य) डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव दिल्ली विश्वविद्यालयाचे कुलगुरू असताना मराठी व अन्य काही (राष्ट्रीय) प्रादेशिक भाषांची अध्यासने येथे चालू झालेली आहेत. मराठी अध्यासनासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने अनुदान दिलेले असले, तरी येथील हे अध्यासन अधिकाधिक मजबूत व्हावे, म्हणून नागपूर, मुंबई, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद आदि स्थळींच्या मराठी विद्यापीठांनी विविध प्रकारे याची वास्तपुस्त करणे आवश्यक नाही का ? येथील अध्यासनाचेद्वारा मुख्यत्वे संशोधनकार्यच चालू असल्याचे कळले. यामुळे तर या अध्यासनाकडे महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांनी अत्यंत आस्थेने लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे.

राजधानीमध्ये "नू. म. वि." पण आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी अशी साधार शंका वाटू लागली होती, की ही 'मराठी' भाषिकांनी चालू केलेली शाळा पूर्णतया 'पंजाबी' विद्यार्थ्यांचीच होणार का ? मराठी माध्यमाचा वापर करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीही संख्या रोडावू लागली होती. ही निराशाजनक परिस्थिती गतवर्षीपासून झपाट्याने बदलत आहे. दादरच्या 'छबिलदास' चे पट्टीचे शिक्षक श्री. मु. ल. जोशी सध्या या शाळेचे प्रधानाचार्य आहेत व आणखी निदान एक वर्ष तरी ते या संस्थेत कार्य करणार आहेत, असे कळले. या प्रधानाचार्यांनी

शाळेत ' प्राण ' निर्माण करण्यास प्रारंभ केला, हे जेवढे खरे आहे, तेवढेच श्रेय ही शाळा ज्या (सोसायटीतर्फे) शिक्षण मंडळातर्फे चालविली जाते, तिच्या कार्यकर्त्यांनाही दिले पाहिजे. प्रसिद्ध पत्रकार श्री. इंदूरकर, सरकारी नोकरी सांभाळून कार्य करणारे श्री. बेडेकर (मूळ पुण्याचे), दिल्ली क्लॉथ मिल्सचे श्री. शिरोळकर, व्यापारी श्री. गोडबोले आदि उत्साही मंडळींची उभारी पाहून गेल्या काही महिन्यांपासून स्वतः संरक्षणमंत्री श्री. य. ब. चव्हाणही या मंडळाचे अध्यक्षपद स्वीकारून मार्गदर्शन करू लागलेले आहेत. या शाळेत सध्या सुमारे १२०० विद्यार्थी असून, त्यांपैकी शेकडा २५ टक्के मराठी माध्यमाचेद्वारा अध्ययन करणारे आहेत. अन्य विद्यार्थ्यांसाठी हिंदी माध्यम आहे. ही शाळा व तिला चालविणारे मंडळ हे सर्व माजी नामदार श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांच्या प्रेरणेनेच चालू झालेले कार्य आहे, याचा उल्लेख करणे आवश्यकच आहे. कारण, अगदी परवापर्यंत श्री. गाडगीळ हेच या मंडळाचे कायमचे अध्यक्ष असल्यागत होते !

## □ मराठी शिक्षणवर्गाचा प्रयोग

राजधानीमध्ये सुमारे २५ सहस्रांपेक्षा थोडी अधिक एवढी मराठी-भाषी जनता आहे. त्यांपैकी अवघे सुमारे ३०० विद्यार्थी मराठी माध्यमाचा उपयोग करणारे आहेत. अन्य अनेक मराठी भाषी विद्यार्थी इंग्रजी वा हिंदी माध्यमाचेद्वारा दिल्लीत अध्ययन करीत आहेत. या सर्वच विद्यार्थ्यांना मराठी, इतिहास, साहित्य, संस्कार, परंपरा आदि जिव्हाळ्याच्या विषयांची निदान ओळख व्हावी, म्हणून एक अभिनव योजना गेल्या सुमारे दोन वर्षांपासून येथील ' नू. म. वि. ' च्याच आवारात प्रतिसप्ताह चालू करण्यात आलेली आहे. या अभिनव योजनेला ' मराठी शिक्षणवर्ग ' असे नाव देण्यात आलेले असून, त्या वर्गाचा लाभ सध्या सुमारे १०० विद्यार्थी घेऊ लागलेले आहेत. [ कलकत्ता, मद्रास आदि बृहन्महाराष्ट्रातील मोठ्या स्थळीही हा प्रयोग करून पाहण्याजोगा असल्याने त्याचा मुद्दाम उल्लेख करीत आहे. ] या शिक्षणवर्गात भाग घेणाऱ्यांच्यामध्ये आपोआपच मराठी वाचनाची आवड निर्माण होऊन मराठी पुस्तकांची मागणी वाढू लागलेली आहे. दिल्लीतील महाराष्ट्र

सरकारचे ' महाराष्ट्र परिचय केंद्र ' या अभिनव योजनेला संपूर्ण सक्रिय सहाय्य देत असल्याने काही निवडक मराठी अनुबोधपट (डॉक्युमेंटरीज) पण या शिक्षणवर्गाच्या उद्दिष्टांना पुष्टी देण्यासाठी दाखविण्याची व्यवस्था करण्यात येत असते. राजधानीमधील मराठीभाषी जनता चार प्रमुख स्थानी विखुरलेली असल्याने या शिक्षणवर्गातर्फे पुस्तकपेटचा (mobile libraries). योजनाही चालू करण्यात आलेली आहे. उत्साही कार्यकर्त्यांच्या परस्पर सहकार्याने ही अभिनव योजना चालू असल्याने योजनेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून नाममात्र शुल्क (वाहनखर्च म्हणन) घेण्यात येत असते. सध्या हा वर्ग एकाच स्थळी (नू. म. वि., पहाडगंज) चालतो. अन्य काही स्थळी तो चालू करावा की काय, या-विषयी सध्या विचार चालू असल्याचे कळते.

## □ सरदार पटेल विद्यालय

दिल्ली दरबारात मराठीजनांचा प्रभाव पडत नाही, निदान जाणवत नाही, अशी तक्रारही वेळीअवेळी ऐकावयास मिळत असते, तिची या ओघातच आठवण झाल्याविना राहात नाही. मराठी शिक्षण, त्याच्या योजना, त्याआधीच्या संस्था यांचा आज जो ओझरता आढावा घेतला आहे, त्यासोबतच राजधानीतील गुजरातीभाषीबांधवांनी त्यांच्या स्वत:-साठी काय काय योजना आखल्या आहेत, याचे ओझरते दर्शन उद्बोधक ठरण्याचा संभव आहे. कारण राजधानीत कोणाचा प्रभाव पडतो वा का पडत नाही, याचाही काही अंशी उलगडा यामुळे होऊ शकेल. येथील बोर्डाच्या (एस्. एस्. सी. समान) यंदाच्या निकालाकडे सहज नजर टाकली, तर ' सरदार पटेल विद्यालय ' हे नाव नजरेतून निसटू शकत नाही; एवढ्या प्रामुख्याने त्या शाळेचे विद्यार्थी यंदा चमकलेले आहेत. या शाळेत आपल्या घरच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा म्हणून बुद्धि-पुरस्सर प्रयत्न करणारे पालक (गुजराती नसलेले) गतवर्षी मी स्वतः पाहिलेले आहेत.

या शाळेतील शिक्षणाचा दर्जा व त्यामुळे शाळेचा होऊ लागलेला गौरव हा राजधानीतील अन्यभाषिक शिक्षकांना सध्या विचार कर-ण्याजोगा विषय वाटू लागलेला आहे. [ गुजरात्यांजवळ गडगंज पैसा

आहे, तेव्हा त्यांना हे सर्व घडवून आणणे साधले ! असा फसवा युक्तिवाद करून काही दिल्लीकर मराठी नागरिक आपली स्वतःचीच फसवणूक करून घेत असतात. त्यांचेजवळ पैसा आहे, परंतु मराठी भाषिकांजवळ ' विद्वत्ता ' आहे, असे वारंवार म्हटले जाते ना ! मग त्या विद्वत्तेला व्यवहारवादाची (वास्तविकतेची) जोड देऊन मराठी मंडळींना प्रतिष्ठा वा प्रभाव निर्माण करणे का जमू नये ? हासुद्धा एक विचारणीय विषयच नाही का ? ] शिक्षणक्षेत्रात सरदार पटेल विद्यालय गुजरात्यांचा गौरव वाढवीत आहे; त्याचप्रमाणे ' गुजराती समाज ' हे नवे भवन गेल्या ३–४ वर्षांत निर्माण करून या मंडळींनी अनेकांची सुखसोय पाहिली आहे. गेल्या सप्ताहात काही निमित्ताने हे भवन पाहण्याची संधी लाभली. पाहुण्यांची व्यवस्था करता येईल काय, असा प्रश्न विचारला असता उत्तर मिळाले, की ' कोणीही गुजरातीभाषी केव्हाही येवो; आमच्याकडे जागा रिकामी असो वा नसो; त्याला रात्रीपुरता निवारा निश्चित मिळेलच, अशी व्यवस्था केली जाईल. ' राहण्यासाठी स्वतंत्र खोली न देता आली, तर मोठ्या सभामंडपवजा जागेत एका रात्रीपुरते आठ आणे घेऊन आश्रय देण्यात येतो, असे कळले. राजधानीत ' पूना गेस्ट हाउस ' आणि ' बृहन्महाराष्ट्र भवन ' या दोन जागा मराठी भाषिकांना आश्रय देण्यासाठी भरपूर परिश्रम घेत असताना दिसतात. तरीसुद्धा ' गुजराती समाज ' व तेथील एकूण साधीच परंतु योजनापूर्वक केलेली व्यवस्था पाहून असे वाटले, की हा ' समाज ' म्हणजे नुसती ' खाणावळ ' नव्हे ! त्यापेक्षा येथे काहीतरी अधिक आहे. व्यवहारवादी व वास्तववादी बनून हे ' अधिक ' चांगले काय आहे, हे शोधण्याचा प्रयत्न ज्या दिवशी मराठीभाषी करू लागतील, त्या दिवसापासून आपोआपच त्यांची प्रतिष्ठा व प्रभाव दूरवर पसरू लागेल. अन्य भाषिक मंडळींनासुद्धा आपल्या शिक्षणसंस्था, समाज, साहित्य आदि जीवनविषयक पैलंविषयी विशेष आकर्षण आपण निर्माण करू शकू का, हा आजचा मुख्य प्रश्न आहे.

**दरबारी**

• • •

# विचार धारे

## • मानसिक सीमोल्लंघन

दोन युद्धांच्या मधल्या काळाला शांतता म्हणावी, अशी एक अवखळ व्याख्या आहे; पण आता दोन 'गरम' युद्धांच्या मधल्या काळाला शीतयुद्धाचा काळ म्हणतात. या शीतयुद्धाच्या राजकारणाचे जगातल्या तमाम स्त्री-पुरुषांच्या मनात जे विष भिनले आहे, ते काढून टाकण्याचा विडा उचललेल्या पाच स्त्रिया सर्व जगाचे परिभ्रमण करीत करीत नुकत्याच दिल्लीला येऊन गेल्या. देशादेशांतल्या संघर्षांबद्दल रात्रंदिवस वर्तमानपत्रांत वाचून लोकांची मने आता इतकी सरावली आहेत' की शांततेच्या विचाराच्या बाबतीत एक प्रकारची अजाणती प्रतिकारक्षमता (' इम्यूनिटी ') त्यांच्यात निर्माण झाली आहे, असे या स्त्री-मंडळाच्या प्रमुख सौ. हेलन टकर यांनी एका सत्कार-समारंभाच्यावेळी उद्गार काढले.

ही मानसिक अवस्था घातक आहे. खरे म्हणजे माणसा-माणसांत संघर्ष निर्माण करणाऱ्या गोष्टीपेक्षा सहकार्य घडवून आणणाऱ्या गोष्टीच जगात जास्त आहेत, याची लोकांना जाणीव करून देण्याची जबाबदारी आता स्त्रियांवर आहे. ही जबाबदारी त्या पार पाडू शकतील, कारण त्या कुठल्याही देशांतल्या असल्या, तरी राजकीय विचार बाजूला सारून सर्वांना सारख्याच जिव्हाळ्याच्या अशा मुद्यावर एकमेकींच्याजवळ येऊ शकतील. कुटुंबाचे व मुलांचे हित ही गोष्ट सबंध जगात सारखीच महत्त्वाची असल्याने स्त्रियांच्या दृष्टिकोनात एकप्रकारची विश्वव्यापकता असते आणि असा विशाल दृष्टिकोन जवळ असल्यामुळेच त्या निःशस्त्रीकरणाची कैफियत इतक्या जोरकसपणे मांडू शकतील, की ही समस्या राजकारणाच्या मर्यादित रिंगणातून बाहेर पडून, एक मानवी समस्या म्हणून ओळखली जाऊ शकेल.

" आंतरराष्ट्रीय सहकार्य वर्षाच्या " निमित्ताने ही स्त्रियांची चळवळ सुरू झाली: तेव्हा पहिल्याप्रथम जर्मन आणि रशियन स्त्रिया कानडात एकमेकींना भेटल्या व आपल्यात संघर्ष असण्याची काय काय कारणे असू शकतील, हे शोधून काढण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांनी एकमेकींना प्रश्न केला, " तू माझा द्वेष का करतेस ?" आणि त्यांना आढळले, की या प्रश्नाला काही उत्तरच नाही. म्हणजे या ध्येयवादी स्त्रिया जे सीमोल्लंघन करीत चालल्या आहेत, ते जेवढे भौगोलिक आहे, तेवढेच मानसिकही आहे. " अशारीतीने निरनिराळ्या देशांतल्या स्त्रिया

अधिकाधिक प्रमाणात एकमेकींना प्रत्यक्ष भेटू लागल्या, तर जगातले गैरसमज दूर होतील व शत्रुत्वाच्या जागी सौहार्दाची भावना यईल."

—तथास्तु !

## • "जो दुसऱ्यावरी विसंबला......"

जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला, हे भारतासारख्या प्रगतिशील देशाने येनकेन प्रकारेण आर्थिक उन्नती साधण्याच्या भरात विसरू नये, याची जाणीव गेल्या आठवड्यात एका परकीयानेच करून दिली. भारतीय अर्थकारणाचे एक सोव्हिएट तज्ज्ञ डॉ. पावलॉव्ह हे भारतसरकारच्या आमंत्रणावरून इकडे येऊन गेले. २–३ महिने ते भारताच्या आर्थिक-समस्यांचा अभ्यास करीत होते. या आपल्या अध्ययनात भारतीय अर्थकारणाचा इतिहास आणि आजच्या आर्थिक समस्या असे दोन विषय असल्याचे त्यांनी सांगितले. या अध्ययनात त्यांना काय दिसले ? मुख्य गोष्ट दिसली ती ही, की भारतातला समाज अजून बव्हंशी 'मांडवलवाद-पूर्व' युगात आहे. भारतात भांडवलवाद ब्रिटिशांनी आणला नाही, तो येथे ते येण्याच्या आधीच होता; पण भांडवलशाहीमुळे समाजात होणारे सामाजिक व आर्थिक विघटन नंतरच्या काळात अधिक प्रमाणावर झाले.

सध्या काही बाबतीत तरी या सामाजिक विस्कळीतपणाला परकीय आर्थिक सहाय्य जबाबदार आहे. उदाहरणार्थ, पावलॉव्ह हे एक 'इंडस्ट्रियल एस्टेट' पाहायला गेले असताना त्यांना दिसले, की ५० टक्के परकीय भांडवलाच्या आधारावर उभारलेला एक कारखाना चांगला चालला होता, तर परकीय सहाय्य न घेणाऱ्या दुसऱ्या एका कारखान्याची परिस्थिती वाईट होती. त्यामुळे आर्थिक विषमता वाढत होती व समाजाचा एक लहानसा भाग आधीच संपन्न होता, तो अधिक समृद्ध होत होता. परकीय सहकार्याचा प्रत्यक्ष फायदा फारच थोड्यांना मिळत होता.

परकीय मदतीच्या जोडीला आणखी एक समाजविघटक गोष्ट म्हणजे मोठ्या, आधुनिक व यंत्रतंत्राने सुसज्ज अशा कारखान्यांची उत्पादनक्षमता आणि लहान उद्योगधंद्यांची उत्पादनक्षमता यांच्यातली भयंकर तफावत. शिवाय एकीकडे मोठ्या आधुनिक उद्योगधंद्यांचे उत्पादन तंत्रज्ञानाच्या बळावर फार चांगले वाढले आहे, तर दुसरीकडे शेतीच्या क्षत्रात तांत्रिक ज्ञान मागासलेले आहे, यामुळेदेखील ही तफावत वाढली आहे. ब्रिटिशांच्या काळातही त्यांनी हिंदुस्थानात मोठ्या उद्योगधंद्यांना उत्तेजन दिले व खेड्यांतल्या कारागिरांकडे दुर्लक्ष केले; त्यामुळे त्यांच्या आधी सुरू झालेल्या सामाजिक विघटनाच्या प्रक्रियेला त्यांनी आपल्या आमदानीत मदतच केली. अखेर सामाजिक व आर्थिक विघटनेचा राजकीय विघटनेशी संबंध आहे काय ?—" शक्य आहे. "

समीर

# एव्हरेस्टची यशयात्रा

• अशोक जैन

दि. २० मे रोजी सकाळी ९–३० वाजता पहिल्या पथकातील कॅ. ए. एस्. चीमा आणि नवांग गोम्बू हे २९,०२८ फूट उंचीच्या शिखरावर चढून गेले. नंतर दोन दिवसांनी म्हणजे २२ मे रोजी दुपारी १२–३० वाजता सोनाम ग्यात्सो व सोनाम वांग्याल या दोघा गिर्यारोहकांनी हे शिखर जिंकले. दि. २४ मे रोजी सकाळी १०–४५ वाजता सी. पी. व्होरा आणि अंगकामी या दोघांनी एव्हरेस्ट चढून 'हॅट-ट्रिक' केली आणि २९ मे रोजी एच्. सी. एस्. रावत आणि सरदार फू दोरजी या तिघांनी सकाळी दहा वाजता हे शिखर पादाक्रान्त करून, या सर्व यशावर 'कळस' चढविला.

या यशयात्रेची ही हकीकत...

"वारा घोंघावत होता. सर्वत्र दुधाच्या सायीसारखे पांढरे-शुभ्र नि दाट बर्फ होते. थोड्याच अंतरावर एव्हरेस्टचे ते स्वर्गशिखर बेगुमानपणे उभे होते. आता वाऱ्याला चांगलाच वेग चढू लागला होता. झंझावाती वाऱ्याचे तांडवनृत्य सुरू झाले. एकेक पाऊल टाकणे अतिशय कठीण झाले होते. प्रतिकूल हवामानामुळे चढाई लांबली व त्यामुळे ऑक्सिजनचा साठा संपुष्टात आला होता. मोठ्या कष्टाने आम्ही श्वास घेत होतो. थोडीशी चढाई केली, की आमच्या चेहऱ्यावर हसू फुले, परंतु निसर्गाने आपले थैमान सुरू केले, की ते हसू लगेच मावळे. हळूहळू आम्ही पुढे सरकत होतो. कमालीची जिद्द आमच्यात होती आणि शेवटी २० मे रोजी आमच्या मनीचे 'स्वप्न' प्रत्यक्षात अवतरले. २० मेला सकाळी ९–३० वाजता आमच्यातील कॅ. चीमा व नवांग गोम्बू या दोघांनी एव्हरेस्ट या अत्युच्च शिखरावर पाय ठेवला नि आम्हांला अस्मान ठेंगणे झाले !"

मे महिन्यात चारवेळा 'एव्हरेस्ट' सर केलेल्या तुकडीतील गिर्यारोहकाने हा रोमहर्षक अनुभव सांगितला आहे. एकोणीसजणांचे हे पथक २२ फेब्रुवारी रोजी दिल्लीहून निघाले होते. पंढरीला ज्या भक्तिभावाने वारकरी जातो, त्याच भक्तिभावाने ही मंडळी या स्वर्गमाथ्याच्या रोखाने निघाली. त्यांच्या यशात नितान्त आदराचा नि श्रद्धेचा फार मोठा भाग आहे.

जयनगर हा एव्हरेस्टचा पायथा आहे. तेथून मोहिमेस आरंभ होतो. २५ फेब्रुवारी रोजी ही तुकडी जयनगरहून निघाली. आपल्या चार महिन्यांच्या आरोहणात या

तुकडीने सहा छावण्या उभारल्या. एव्हरेस्टचा शेवटचा टप्पा साऊथ कोल ते एव्हरेस्ट असा आहे. साऊथ कोल २६,२०० फूट उंचीवर आहे. साऊथ कोलच्या अलीकडे ल्होत्सेफेस नावाचे ठिकाण आहे. या तुकडीची मूळ छावणी १७,८०० फूटांवर होती. शेवटची छावणी २८,७५० फुटांवर (साऊथ समिट) उभारण्यात आली होती.

या सर्व प्रवासात खरी झुंज असते, ती साऊथ कोल ते एव्हरेस्टपर्यंत चढण्यात. परंतु या आपल्या तुकडीला साऊथ कोलपर्यंत पोहोचण्यासाठी फार त्रास पडला. झंझावती वाऱ्याने त्यांना सळो का पळो करून सोडले. साऊथ कोलवर पोहचले असूनदेखील त्यांना प्रतिकूल हवामानामुळे परत फिरावे लागले होते.

वीस हजार फुटांवर २७ मार्च रोजी उभारलेल्या पहिल्या छावणीपासूनच गिर्यारोहकांच्या या अद्भुत महायात्रेला आरंभ झाला. रोज जीवन-मृत्यूशीच खेळ होता. खाली 'आ' वासून पसरलेली दरी आणि वर सरळसोट कडा आणि या सर्वांत भरून राहिलेले शुभ्र बर्फ, यातून वाट काढायची होती. रस्ता तयार केला, की खटचाळ बर्फ व खोडकर वारा तो मोडून टाकी. त्यामुळे पुढे जाणेही अशक्य होई. बर्फ फोडावयाच्या पहारी घेऊन पुन्हा रस्ता करावा लागे. शेर्पा मात्र अतिउत्साही. अशा या बिकट वाटेतूनही पहाडी गीते गात प्रत्येकजण पन्नास पौंडांचे ओझे घेऊन वर जाई. साधारणपणे सूर्योदय झाला, की हे शेर्पा ओझी घेऊन बाहेर पडत आणि दुपारी तीनच्या सुमारास मूळ छावणीवर परत येत.

**● व्हॅली ऑफ सायलेन्स**

पहिल्या छावणीवर स्टोव्ह, तंबू, अन्न, गॅस इत्यादि सर्व वस्तू भरपूर नेल्यावर मग या तुकडीने ल्होत्सेफेसचे आव्हान स्वीकारावयाचे ठरविले. एव्हरेस्ट मोहिमेत सर्वांत मोठा अडथळा ल्होत्सेफेस हा होय. मुल्कराज, बी. पी. सिंग, बहुगुण, अंगकामी हे मूळ छावणीवरून ३ एप्रिल रोजी निघाले व पहिल्या छावणीवर ते जाऊन पोहोचले. ते पोहोचले तेव्हा हवा फार सुंदर नि आल्हाददायक होती. त्यामुळे पहिल्या छावणीतून दिसणाऱ्या निसर्गसौंदर्याचा त्यांना पुरेपूर आस्वाद घेता आला. या पहिल्या छावणीपासून जवळच्याच अंतरावर एक उभा चढ सुरू होत होता. या चढाच्या माथ्याशी २७,८९० फुटांवर ल्होत्से हे शिखर होते. उजव्या बाजूस 'ल्होत्से-नूप्त्से' चा अगदी सरळ भिंतीसारखा कडा होता. डाव्या बाजूस एव्हरेस्टची उजवी बाजू होती आणि या दोघांच्या मध्ये लांबच लांब दरी पसरलेली होती. ही दरी 'व्हॅली ऑफ सायलेन्स' नावाने ओळखली जाते. बर्फाचा एखादा कडा कोसळला, की मग या दरीतील शांतता भंग पावते.

पुढील दिवशी मुल्कराजने २१,३०० फुटांवरील एक जागा दुसरी छावणी उभारण्यासाठी निश्चित केली. झाले, परत गिर्यारोहकांचा प्रवास सुरू झाला, परंतु सुरवातीलाच वाऱ्याने तुफानी हल्ला चढविला व गिर्यारोहकांना तसेच छावणीत पडून

राहावे लागले. अंगकामी मात्र कँपबाहेर हिंडत होता. त्याला एक मरून पडलेला निळा पक्षी सापडला.

दुसऱ्या दिवशीची सकाळ मात्र प्रसन्न वातावणात उगवली. ल्होत्सेफेसवर चढाई करावयाचीच, असा ठाम निर्धार करून गिर्यारोहकांनी कामास सुरवात केली. ल्होत्सेफेसचा २३ हजार ते २६ हजार फुटांपर्यंतचा भाग हिमाच्छादित होता. या ल्होत्सेफेसच्या पूर्वेस दुर्गम साऊथ कोल विसावले होते. एव्हरेस्ट आणि ल्होत्से या दोन शिखरांच्यामध्ये साऊथकोल आहे. अनेक तुकड्या या साऊथकोलपर्यंत जाऊन परतल्या. त्यांनी तेथे ठेवलेल्या विविध वस्तू गिर्यारोहकांना दुर्बिणीतून दिसू शकत होत्या. साऊथ कोलवर छावणी उभारावयाची, हे गिर्यारोहकांचे उद्दिष्ट होते. त्यांनी या मोहिमेत ऑक्सिजनचा वापर करावयाचे ठरविले.

गोम्बू व अंगकामी हे बऱ्याच शेर्पांबरोबर ६ एप्रिल रोजी दुसऱ्या छावणीवरून निघाले. ल्होत्सेफेस 'अनंत हस्ते' बर्फाची उधळण करत होते. हे बर्फ जेथे पडत होते, तेथे २२,९०० फुटांवर अंगकामीने तिसरी छावणी उभारली. सर्वत्र बर्फाचा वर्षाव होत होता. अंगकामीने रात्र कशी तरी तळमळत काढली. संध्याकाळी चीमाही त्यांना येऊन मिळाला होता.

आठ एप्रिलला सकाळी आकाश निरभ्र होते. चीमा, अंगकामी काही शेरपांबरोबर पुढील चढाईची ठिकाणे हेरू लागले. परंतु थंडी इतकी भयंकर होती, की ऑक्सिजनचे रेग्युलेटर्स गोठले, त्यामुळे त्यांना नाइलाजाने छावणीत परतावे लागले.

गोम्बूने मात्र क्षणाचीही उसंत घेतली नाही. दिवसभर आपली आयुधे सरसावून तो काम करीत होता. ल्होत्सेफेसवर आतापर्यंत उभारली नसेल, इतक्या उंचीवर (२५००० फूट) त्याने चौथी छावणी उभारली व तो संध्याकाळी परत तिसऱ्या छावणीत परतला.

याचवेळी तुकडीचे नेते लेफ्टनंट कमांडर कोहली ७ एप्रिलला ग्यात्सो, वांग्याल, अहलुवालिया आणि बाळकृष्णन यांच्याबरोबर दुसऱ्या छावणीकडे निघाले. बाळकृष्णनने दुसऱ्या छावणीवर वायरलेस-सेट बसवून काठमांडूपर्यंत दळणवळण प्रस्थापित करण्यात यश मिळविले.

### ● अमेरिकन मोहिमेतील वस्तू

एक दिवस विश्रांती घेऊन सोनाम ग्यात्सो व वांग्याल हे दोघे चौथ्या छावणीच्या रोखाने निघाले. ११ एप्रिल रोजी ते या छावणीवर पोहोचले. गोम्बूचे राहिलेले काम या दोघांनी पुरे केले. १२ एप्रिलच्या दुपारपर्यंत शिडीवरून वर येता येईल, असा रस्ता तयार करण्यात त्यांना यश आले. हा रस्ता तयार करताना त्यांना अमेरिकन मोहिमेने तेथे ठेवून दिलेला ३०० फूट लांबीचा दोर सापडला. थोड्या वरच्या बाजूस त्यांना दोन ऑक्सिजनचे सिलिंडरही सापडले. त्यांतील एक भरलेला होता.

## लेफ्टनंट कमांडर एम्. एस्. कोहली

एव्हरेस्टवर आरोहण करणाऱ्या पथकाचे प्रमुख लेफ्ट. क. कोहली हे तर धैर्य व उत्साहाचे मूर्तिमंत प्रतीक आहेत. चौतीस वर्षांच्या या युवकाची झेप खऱ्याखुऱ्या अर्थाने अस्मानाला गवसणी घालणारी आहे.

श्री. कोहली हे मूळचे दिल्लीचे रहिवासी. दिल्ली विश्वविद्यालयातून पदवी घेतल्यावर १९५४ साली ते भारतीय नौदलात दाखल झाले. १९५६ साली त्यांनी गिर्यारोहणास आरंभ केला. दार्जिलिंग येथे गिर्यारोहणाचे प्राथमिक धडे गिरवल्यावर मेजर जयाळ यांच्या नेतृत्वाखालील पूर्व काराकोरम मोहिमेत ते सामील झाले.

१९५९ साली नौदलाची नंदकोट मोहीम त्यांनी आखली. २२,५१० फूट उंचीचे नंदकोट त्यांनी पादाक्रान्त केले. पहिल्या भारतीय एव्हरेस्ट मोहिमेच्यावेळी साऊथ कोलपर्यंत ते चढले होते. १९६१ साली त्यांच्या नेतृत्वाखाली अन्नपूर्णा–३ मोहीम गेली होती. २८ हजार ८५८ फूट उंचीचे हे शिखर दोन शेर्पांबरोबर त्यांनी जिंकले. १९६२ सालच्या दुसऱ्या भारतीय एव्हरेस्ट मोहिमेचे ते उपनेते होते. त्यावेळी २८ हजार ६०० फुटांपर्यंत ते गेले होते, परंतु प्रतिकूल हवेमुळे त्यांना परतावे लागले होते. गेल्या वर्षी त्रिशूळीनंदा मोहिमेचे नेतृत्व त्यांनी स्वीकारले होते.



फू दोरजीच्या नेतृत्वाखाली १५ शेरपांची एक तुकडी १० एप्रिल रोजी साऊथ कोलच्या दिशेने निघाली. चीमा व अहलुवालिया या तुकडीत होते. परंतु प्रतिकूल हवामानामुळे या तुकडीला छावणीत परतावे लागले. १३ एप्रिलला वैशाखी होती. एकमेकांना शुभचिंतनात व हास्यविनोदात हा दिवस गेला. 'मुल्कराज' या गिर्यारोहकांच्या 'अन्नमंत्र्यांनी' त्या दिवशी गोडधोडाचा बेत केला होता.

सैबेरियन बदकांचा एक मोठा जथा गिर्यारोहकांना दिसला. गिर्यारोहकांना दुर्गम वाटणाऱ्या एव्हरेस्टवरून ही बदके मोठ्या ऐटीने उडत होती. त्यांत काही ब्राह्मी बदकेही असावीत. तिबेटच्या बाजूने ही बदके आली आणि त्यांतील निम्मी परत गेली व निम्मी थ्यांगबोचेच्या दिशेने गेली.

## ● साऊथ कोलवर

गिर्यारोहकांना साऊथ कोलला जाण्यासाठी १२ एप्रिल रोजी मार्ग तयार करता आला व १६ एप्रिल रोजी ते साऊथ कोलवर (२६,२०० फूट) जाऊन पोहोचले. अगदी आनंदाचा हा दिवस होता. शेवटच्या टप्प्याच्या पायथ्याशी हे गिर्यारोहक उभे होते. वर एव्हरेस्टचे शिखर मिस्कीलपणे हसत उभे होते. एक नवीन साहसाच्या पर्वाला आता आरंभ होणार होता.

साऊथ कोलवर जाताना अमेरिकनांची अनेक फूट सिनेफिल्म गिर्यारोहकांना सापडली. गंमत म्हणजे १९६२ च्या मोहिमेतील हरीडांग या गिर्यारोहकाची २०० रुपयांची नाणीही सापडली. १९६३ सालच्या अमेरिकन मोहिमेच्या नजरेतून ही नाणी सुटली असावीत !

आता शेवटचा टप्पा उरला होता. २१ एप्रिल रोजी वर चढाई करण्याचा गिर्यारोहकांनी निश्चय केला. त्यावेळी सायंकाळी पुरविण्यात आलेल्या हवामानविषयक बुलिटिनमध्ये २५ तारखेपर्यंत प्रतिकूल हवामान राहील, असे म्हटले होते. गिर्यारोहकांना त्याचा प्रत्यय येऊ लागला. निसर्गाने आपली एकेक रौद्र रूपे दाखवावयास आरंभ केला. हवामान चांगले असते, तर २७ एप्रिल रोजीच गिर्यारोहक एव्हरेस्ट 'सर' करू शकले असते; परंतु निसर्गाची काय लहर फिरली कोणास ठाऊक. गिर्यारोहकांच्या मार्गात विघ्न आणण्याचा त्याने चंगच बांधला होता.

२३ एप्रिलच्या सकाळी स्वच्छ हवा पडली होती. गिर्यारोहकांनी तावडतोब दिल्ली वेधशाळेला तातडीचा संदेश पाठवून हवामानाविषयी पृच्छा केली. त्यांनी आणखी दोन दिवस वाईट हवामान राहील, असे सांगितल्यामुळे गिर्यारोहकांनी तिसऱ्या छावणीतच थांबावयाचे ठरविले.

बाहेर वादळ असले, तरी गिर्यारोहकांची मने मात्र खंबीर व शांत होती. अगदी आनंदाने त्यांनी या छावणीत वेळ घालवला. दानूने मसाले भात, आमटी, बटाट्याची भाजी, परोठे, मटन व चिकन केले होते. डॉ. तेलंग यांनी मुंबईहून आणलेले लोणचें

व सुके मासे तोंडी लावण्यासाठी होतेच. गाणी म्हणण्यात, मिटक्या मारीत जेवण्यात व पत्ते खेळण्यात हा दिवस त्यांनी घालवला. डॉ. तेलंग मात्र पत्रे लिहीत बसले होते.

रात्री अचानक वादळाचे थैमान सुरू झाले. साऱ्या पर्वताला घुसळणारे चक्रीवादळ सुरू झाले. पिसाटवारा अंगाला झोंबू लागला. बर्फाचे खडे निखळून एकमेकांवर आदळू लागले. साऊथ कोलवर न थांबता तिसऱ्याच छावणीवर थांबण्याचा आपला निर्णय शहाणपणाचा होता, हे गिर्यारोहकांना समजले व त्यांना हायसे वाटले. तीन दिवस हे वादळ चालले नि २७ एप्रिलला हे वादळ थंडावले.

## पुरंदर किल्ल्यावर नवांग गोम्बू

एव्हरेस्ट हे सर्वोच्च शिखर दोनदा जिंकणारा जगातील नवांग गोम्बू हा पहिलाच गिर्यारोहक होय. १९६३ साली अमेरिकन तुकडीबरोबर नवांग गोम्बूने एव्हरेस्टवर आरोहण केले व त्यात तो विजयी झाला. गुरुवारी (२० मे) कॅ. चीमाबरोबर गोम्बूनेही एव्हरेस्टवर चढून जाण्यात यश मिळविले.

दार्जिलिंग येथील हिमालय गिर्यारोहण संस्थेत गोम्बू इन्स्ट्रक्टरचे काम करतो. १९६४ साली नंदादेवी शिखर चढून जाण्यात त्याने यश मिळविले. याचवर्षी त्याला 'पद्मश्री' हा किताब मिळाला.

सासवडजवळील पुरंदर गडावर असलेल्या एन्. सी. सी. ॲकॅडमीत गिर्यारोहणाचे शिक्षण देण्यासाठी श्री. गोम्बू १९६३–६४ साली आले होते. ९ फेब्रुवारी, ६४ रोजी पुरंदरावर गिर्यारोहणाचे प्रात्यक्षिक दाखविताना नवांग गोम्बू यांनी दाखविलेले धैर्य संस्मरणीय ठरले आहे.

हे गिर्यारोहण चालू असता अचानक मधमाशांचे एक प्रचंड मोहोळ उठले व मधमाशांच्या एका मोठ्या जथ्याने प्रेक्षकांवर कडाडून हल्ला

● **गोम्बूज हॉरर**

तुकडीचे नेते कोहली व गुरुदयाळ हे ल्होत्सेफेसच्या बाजूने निघाले आणि तेथील प्रचंड सुळक्यासारखा कडा पाहून ते स्तंभितच झाले ! सुमारे शंभर फूट उंचीची ती बर्फाची भिंतच होती. अगदी सरळ, शिडी लावून चढायचे म्हटले, तरी सोय नाही. माथ्यावरून खाली दोन दोऱ्या सोडलेल्या होत्या. त्यावरून सर्कसमध्ये करतात तशी कसरत करत वर जायचे. मागे वळून पाहिले तर बोबडीच वळायची आणि पाय घसरला, की संपलेच ! गोम्बू मात्र अगदी निर्भयतेने या कड्यावरून चढला, म्हणून या कड्याला 'गोम्बूज हॉरर' असे म्हणायचे ठरले.



चढविला. शेर्पांचे नेते नवांग गोम्बू हे खडकाचा एक उभा कडा चढू लागले होते, तोच त्यांच्या-वरही मधमाशांनी हल्ला केला. ते घसरत खाली आले. मधमाशांना हाकलल्यावर परत गोम्बू कडा वर चढून जाऊ लागले, तेव्हा त्यांनी मोठ्या शिताफीने मधमाशांच्या माऱ्याला तोंड देऊन आपला बचाव करून घेतला. या विशेष प्रसंगाची आठवण म्हणून पुरंदरवरील या कड्याच्या एका जागेस 'गोम्बू कॉर्नर' असे नाव देण्यात आले आहे.

एव्हरेस्टवर आरोहण करणारे पहिले गिर्या-रोहक तेनसिंग नोर्के हे गोम्बूचे चुलते आहेत. त्यांनी गोम्बूच्या घरी जाऊन त्याच्या पत्नीस पतीच्या मर्दुमकीची बातमी सांगितली.

नवांग गोम्बूची पत्नी, चार वर्षांची कन्या वांगडू व दोन वर्षांचा फिझो या सर्वांचा आनंद गगनात मावेनासा झाला. नवांग गोम्बूचे छाया-चित्र हातात घेऊन मुलांनी आपल्या पित्याचा दिग्विजय रस्त्यात भेटणाऱ्या प्रत्येकजणाला सांगितला. ●

२८ एप्रिलचा दिवसही शांत होता. सकाळी ९ वाजेपर्यंत गिर्यारोहक आपल्या पिशवीत पहुडले होते. सूर्याची किरणे छावणीत शिरून गिर्यारोहकांच्या पायाला जेव्हा गुदगुल्या करू लागली, तेव्हा सर्वजण उठले. अगदी स्वच्छ ऊन पडले होते. एव्हरेस्टच्या स्वर्गमाथ्यावर स्वर्णकांती चढली होती. साऊथ कोल ते एव्हरेस्टपर्यंतचा मार्ग अगदी स्पष्टपणे दिसत होता. घाईघाईने न्याहारी करून गिर्यारोहकांनी आगेकूच केले व अवघ्या तीन तासांत साऊथ कोलवर ते जाऊन पोहोचले. आकाश निवळले होते. वारा मात्र वेगाने वाहातच होता. परंतु त्याला न जुमानता अनेक फोटो या गिर्यारोहकांनी घेतले.

हळूहळू थंडी वाढू लागली. ' गुलाबी थंडी ' वगैरे प्रकार फक्त साहित्यातच. हिमालयातील ही थंडी जीवघेणी होती. तिच्यामुळे गिर्यारोहकांचे रक्त गोठण्याची पाळी आली.

साऊथ कोलवर छावणी उभारण्यास जवळजवळ दोन तास लागले. थंडीत कुडकुडणारे सर्वजण छावणीत शिरून कातडी पिशवीत लपेटून बसले. गरम गरम कढी ओरपल्यावर गंमत म्हणून कोहली यांनी वॉकी-टॉकी सेट चालू केला आणि आश्चर्य म्हणजे तिसऱ्या छावणीशी ते दळणवळण प्रस्थापित करू शकले. आतापर्यंत कोण-

# बल्लवाचार्य थोंडूप

" भाईसाहेब ! आज आपला वाढदिवस आहे. खास तुमच्यासाठी तुमचा आवडता केक मी बनवलाय. जरा चाखून तरी पाहा ! " एव्हरेस्ट मोहिमेतील मुख्य आचारी थोंडूप एका गिर्यारोहकला केक खाण्याचा आग्रह करत होता. त्याच्या शब्दांतच इतका गोडवा आणि प्रेम होते, की त्या गिर्यारोहकाने मिटक्या मारीत केक खाल्ला.

सैन्य ज्याप्रमाणे पोटावर चालते, त्याप्रमाणे गिर्यारोहकांची मोहीमही आचाऱ्याच्या पाककौशल्यावर अवलंबून असते. चारदा एव्हरेस्ट ' सर ' केलेल्या या तुकडीला थोंडूप नावाचा एक पाककुशल आचारी मिळाला. तो सुग्रास भोजन तर तयार करीच, परंतु आपल्या हास्यविनोदाने तो नेहमी प्रसन्न वातावरण निर्माण करी.

एव्हरेस्टवर चढाई केलेल्या या पथकातील कोणाच्याही प्रकृतीत फारसा फरक पडला नाही, याचे मुख्य श्रेय सर्व गिर्यारोहक थोंडूपला देतात. वेळेवर ताजे व रुचकर अन्न तो तयार करी.

थोंडूप या गिर्यारोहकांच्या पथकात इतका लोकप्रिय झाला, की ते त्याला

त्याही तुकडीला साऊथ कोलवरून वॉकीटॉकीच्या सहाय्याने दळणवळण प्रस्थापित करता आले नव्हते.

## ● माघार आणि पुन्हा आगेकूच

प्रत्येकजण ऑक्सिजनचा मुखवटा घालून बसला होता. मुखवटयाच्या आतल्या बाजूस बाष्प साचे व त्यामुळे त्रास होई. हवामान अतिशय वाईट होते आणि निसर्गाने शेवटी मात केली. नाइलाजाने पुन्हा तिसऱ्या छावणीवर या गिर्यारोहकांना परतावे लागले. साऊथ कोलवरून प्रतिकूल हवामानामुळे मागील दोन्हीही भारतीय मोहिमांना परतावे लागले होते. या मोहिमेच्या बाबतीतही तेच घडले. परंतु त्यामुळे गिर्यारोहक निरुत्साही झाले नाहीत. एकवेळ निसर्गाला त्यांना शरण जरी जावे लागले, तरी प्रत्येकात कमालीची जिद्द होती. पुन्हा १४ मे रोजी त्यांनी 'आगेकूच' केले आणि शेवटी एव्हरेस्टचे सर्वोच्च शिखर या तुकडीने गाठले. एकदा नव्हे तर चारदा ! ऑक्सिजन संपला म्हणून, नाहीतर आणखी दोन-तीनदा तरी हे शिखर 'सर' करता आले असते, असे कोहली यांनी सांगितले.

तुकडीचे नेते लेफ्टनंट कमांडर श्री. कोहली यांना परत एव्हरेस्टवर चढाई करण्याचा आपला मानस आहे काय ? असे विचारता त्यांनी नकार दिला. एव्हरेस्ट

'जनरल' म्हणत व थोंडूपचा सहकारी दानू याला 'ब्रिगेडियर' म्हणत.

थोंडूपचे वैशिष्टय असे, की तो फक्त गिर्यारोहकांच्या मोहिमेचेच आचारीपद स्वीकारतो. बाकीचा वेळ तो विश्रांती घेत असतो. १९५१ साली हिलरी मोहिमेबरोबर त्याने ही 'बल्लवाचार्या'ची भूमिका पार पाडली होती.

" उंचावर स्वयंपाक करणे तुम्हाला जमते तरी कसे ? " असे त्यांना विचारता ते म्हणाले, " त्यात काहीच अवघड नाही भाईसाहेब ! पर्वतावर चढन जाणेच मात्र महाकठीण असते. "

" पण तुम्ही स्वयंपाक करता तरी कसा ? " असे विचारता चौकसतेमुळे चिडून न जाता थोंडूप म्हणाला, " प्रथम बर्फाची एक लादी घेऊन मी ती विस्तवावर ठेवून वितळवतो. भात शिजविणे व भाजी तयार करणे फारसे अवघड नसते. मास शिजविताना मात्र फार त्रास होतो. प्रशर कुकरमध्ये घालूनच ते शिजवावे लागते. "

थोंडूपने केलेल्या 'परोठयाची' लज्जत काही औरच आहे. परंतु कोणाला काय आवडते, याची त्याला पुरेपूर माहिती. एखाद्याचा लग्नाचा वाढदिवस असो, किंवा स्वतःचा वाढदिवस असला, तर तो नेमका ध्यानात ठेवून थोंडूप मोठ्या अदबीने सुग्रास भोजनाचा 'बडा खाना' घेऊन उभा असतोच ! ●

दोनदा पादाक्रान्त केलेला गोम्बूदेखील पुन्हा एव्हरेस्टवर चढाई करील, असे आपल्याला वाटत नसल्याचेही त्यांनी सांगितले.

"पहिली तुकडी शिखरावर पोहोचताच आपल्याला काय वाटले ?" असे त्यांना विचारता ते म्हणाले, "शिखर 'काबीज' केले, ही वार्ता काही अचानक आली नाही. गोम्बू व चीमा हे दोघे जेव्हा एव्हरेस्टच्या दिशेने निघाले, तेव्हा आम्ही दुर्बिणी सरसावूनच बसलो होतो."

हिमालयात 'यती'चे वास्तव्य आहे, अशी वदंता आहे; परंतु आपल्याला असा कोणी 'यती' भेटला नाही, असेही कोहली यांनी सांगितले.

**● इमानी टायगरचा निरोप**

या एव्हरेस्टविजेत्या गिर्यारोहकांचे अभिनंदन करावयाचा मान सर्वांच्या आधी एका कुत्र्याला मिळाला आहे! या कुत्र्याचे नाव आहे 'टायगर.' बर्फाच्या सततच्या माऱ्यामुळे हा कुत्रा शिखरावर जाऊ शकत नसे, परंतु गिर्यारोहक शिखरावरून परतले, की त्यांचे अभिनंदन हा कुत्रा करी. आपल्या इवल्याशा लुसलुशीत जिभेने तो गिर्यारोहकांचे पाय चाटून आपला आनंद व्यक्त करी. महाभारतात युधिष्ठिराबरोबर स्वर्गापर्यंत गेलेल्या कुत्र्याची कथा सर्वश्रुत आहेच; त्याचप्रमाणे हा कुत्रा गिर्यारोहकांबरोबर जात होता.

या कुत्र्यासंबंधी बोलताना कॅप्टन अहलुवालिया म्हणाले, "जयनगरहून निघताना हा कुत्रा आमच्याबरोबर नव्हता, परंतु बेसकॅम्पवर आम्ही जेव्हा पोहोचलो, तेव्हा आमच्या तुकडीत आणखी एकाची भर पडल्याचे आम्हांला आढळून आले. ही भर होती या कुत्र्याची. आम्ही त्याचे नाव ठेवले 'टायगर!' आमच्या या खडतर व अतिशय दुर्दम्य अशा चढाईत तो आमचा अगदी जिवश्चकंठश्च मित्र बनला."

सोनेरी झाक असलेला हा केसाळ कुत्रा या गिर्यारोहकांना फार उपयोगी पडला. सतत चार महिने तो त्यांच्याबरोबर राहिला.

गिर्यारोहकांच्या तुकडीबरोबर एखादे कुत्रे असले, तर ते शुभ समजले जाते. १९५३ साली तेनसिंग नोर्केने एव्हरेस्ट 'सर' केले, तेव्हा त्यांच्या तुकडीबरोबरदेखील एक काळा कुत्रा होता.

● १९६० साली भारतीय पथकाने एव्हरेस्टवर आरोहण करण्याचा पहिला अयशस्वी प्रयत्न केला. १९६२ साली निघालेल्या दुसऱ्या मोहिमेसहि निराशाच पत्करावी लागली. हिमालयावरील शिखरांवर चढून जाण्यास यापुढे संमती देण्यात येणार नाही, असे नपाळ सरकारने जहीर केल्याने ही तुकडी शेवटचा प्रयत्न म्हणून निघाली होती.

● एव्हरेस्टवर चढण्याचे दुसऱ्या महायुद्धापूर्वीचे सर्व प्रयत्न उत्तरेच्या म्हणजे तिबेटच्या बाजूने झाले. त्यानंतरचे सर्व प्रयत्न दक्षिणेच्या म्हणजे नेपाळच्या बाजूने झाले. ●

या गिर्यारोहकांच्या तुकडीबरोबरील 'टायगर' ने तुफानी वाऱ्याचा व हिमकणांचा मारा सहन केला. दिवसचेदिवस तंबूबाहेर तो पहारा करी.



'टायगर' हा हिमालयातील कुत्रा आहे. थंडीवाऱ्याचे त्याला काही सोयर-सुतक नाही. उलट उबदार हवा असलेल्या पठारावर तो जीवन जगू शकत नाही. गिर्यारोहक परतत असताना तो त्यांच्याबरोबर राही! परंतु घोलानघाटच्या पुढे मात्र उबदार हवेमुळे त्याला त्रास होऊ लागला. असात्रास जेव्हा त्याला होई, तेव्हा तो जवळच्या एखाद्या झुळझुळत्या झऱ्यात जाऊन तासन् तास बसे व गार वाटले, की पुन्हा आपल्या गिर्यारोहकांकडे धावत धावत जाई.

या कुत्र्याला दिल्लीला आणता येईल का? असे विचारता गिर्यारोहक श्री. मुल्कराज म्हणाले, "दिल्लीतील हवामान त्याला एक दिवसदेखील मानवणार नाही. बर्फात राहावयाचीच त्याला संवय झाली आहे आणि जरी आपण त्याच्यासाठी एअर-कंडिशन्ड खोलीची व्यवस्था केली, तरी इंडियन एअरफोर्सचे विमान या प्रवाशाला घेईल, की नाही, कोणास ठाऊक?"

शेवटी या तुकडीला लाडक्या इमानी टायगरचा निरोप घ्यावा लागला. आता आपल्याला गिर्यारोहकांबरोबर जाता येणार नाही, याची कल्पना असूनदेखील 'टायगरच्या' चेहऱ्यावर निराशा पसरली होती आणि त्याचे डोळे अश्रूने अगदी भरून आले होते! □

● एव्हरेस्ट शिखराचा शोध सर्वप्रथम १८५२ साली सर्व्हे ऑफ इंडियामधील श्री. राधानाथ सिकदार यांना लागला. हे शिखर सर्वोच्च असल्याचे त्यांनीच निदर्शनास आणून दिले. त्यावेळचे सर्व्हेअर जनरल सर जॉर्ज एव्हरेस्ट यांचे नाव या शिखरास देण्यात आले.



## यशस्वी संघ

पहिली रांग—(डावीकडून) पथकाचे नेते लेफ्टनंट कमांडर एम्. एस्. कोहली, कॅ. ए. एस्. चीमा, श्री. नवांग गोम्बू (चीमा व गोम्बू ही एव्हरेस्टवर पोहोचणारी पहिली तुकडी)

दुसरी रांग—पथकाचे उपनेते मेजर एन्. कुमार, श्री. सोनाम ग्यात्सो व सोनाम वांग्याल. (ग्यात्सो व वांग्याल ही दुसरी तुकडी)

तिसरी रांग—शेर्पांचे नेते अंग चेरिंग, श्री. सी. पी. व्होरा, श्री अंगकामी. (व्होरा व अंगकामी ही तिसरी तुकडी)

चौथी रांग—श्री. खू. दोरजी, कॅप्टन एच्. एस्. अहलुवालिया, श्री. एच्. एस्. सी. रावत. या तिघांची चौथी तुकडी.

# कण आणि क्षण

● गोम्बू व चीमा या पहिल्या तुकडीस हिमालयाच्या या 'स्वर्ग माथ्यावर' अमेरिकन पथकाने लावलेला ध्वजस्तंभ आढळला. सर्वसाधारणपणे बर्फात मारावयाच्या पहारीला ध्वज बांधून पहार बर्फात रोवली जाते. परंतु भारतीय गिर्यारोहकांना तेथे ध्वजस्तंभ आढळल्याने त्यांनी त्यालाच भारतीय ध्वज बांधला.



चीमा

● गोम्बूने आपले चुलते तेनसिंग यांनी दिलेली बुद्धाची मूर्ती या शिखरावर ठेवली.

● गोम्बूची पत्नी सीता हिने मोहिमेपूर्वी दिलेला स्कार्फहि गोम्बूने मोठ्या भक्तिभावाने या शिखराला अर्पण केला.

● त्यांचे जोडीदार चीमा यांनी गंगानगर येथे राहणाऱ्या आपल्या आईने दिलेली चांदीची राणी या शिखरावर वाहिली.

● गोम्बू व चीमा यांचा शिखरावर अर्धा तास मुक्काम होता. त्यांनी बरीच छायाचित्रेही घेतली.

● ग्यात्सो व वांग्याल हे दोघे या शिखरावर पन्नास मिनिटे होते. अत्यंत प्रतिकूल हवामानाशी निर्धाराने सामना देत त्यांनी यशस्वी चढाई केली.

● सोनाम ग्यात्सो आपल्या यशाचे सर्व श्रेय आपण केलेल्या प्रार्थनेला देतो. साऊथ कोलवरून आपल्या शेवटच्या छावणीकडे येत असताना त्याच्या पाठीस फोड आले, परंतु शिखरावरील डौलाने फडकणारे ध्वज पाहून त्याला वेदनांचा विसर पडला. ग्यात्सो हा भावुक मनाचा आहे. बेस कॅम्प सोडून जाताना त्याने तेथे वीस फूट उंचीचा प्रार्थनाध्वज रोवला. साऊथ कोल सोडताना त्याने तेथे एक बुद्धाचा विविधरंगी ध्वज लावला. एव्हरेस्टवर जाताना त्याने वादळापासून संरक्षण होण्यासाठी एक व हिमापासून बचाव होण्यासाठी एक, असे दोन ध्वज व गुरुपद्म संभा यांची प्रतिमा नेली होती.



ग्यात्सो

□

# दृष्टिक्षेप. . . .

● आतापर्यंत एव्हरेस्टवर चढाई करण्याचे प्रयत्न झाले, ते खालील प्रमाणे—

१९२१—कर्नल हॉवर्ड ब्यूरी–नॉर्थ कोलवर पोहोचणारे पहिले गिर्यारोहक.

१९२१—जे. सी. ब्रूस मोहीम–२६,९८५ फूट.

१९२४—लेफ्ट. जनरल एफ्. एफ्. नॉर्टन मोहीम–२८,१२६ फूट.

१९३३—सटल्ज मोहीम–२७,४०० फूट.

१९३४—एम्. विल्सन याने एकट्यानेच एव्हरेस्टवर आरोहण करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यातच त्याला मृत्यू आला.

१९३५—शिप्टन हे नॉर्थ कोलपर्यंत पोहोचले.

१९३६—सटल्ज–खराब हवामामुळे प्रयत्न सोडून द्यावा लागला.

१९३८—टिबमन मोहीम–यांनी नॉर्थ कोलच्या बाजूने चढाई करण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रतिकूल हवामानामुळे तो सोडून द्यावा लागला. २७,३२० फूट.

१९५१—साऊथ कोलच्या बाजूने चढाई करण्याच्या दृष्टीने मार्ग शोधण्याचा शिप्टनचा प्रयत्न.

१९५२—स्वीस मोहीम–नेते डॉ. व्यासड्यूनान्ट—२८,२१० फूट.

१९५२—दुसरी स्वीस मोहीम. नेते—चॅव्हेली.—२६,५६० फूट.

१९५३—कर्नल हंट मोहीम (तेनसिंग व हिलरी यांनी २९ मे १९५३ रोजी एव्हरेस्ट जिंकले)–२९,०२८ फूट.

१९५६—तिसरी स्वीस मोहीम—२३ व २४ मे १९५६ या दिवशी एव्हरेस्ट दोनदा जिंकले.

१९६०—चिनी मोहीम २५ मे ला शिखरावर पोहोचली.

१९६२—मेजर जे. डायस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय मोहीम–३० जून रोजी २८,६०० फुटांवर पोहोचले.

१९६३—अमेरिकन मोहीम—तीनदा शिखर सर केले. दोनदा नेहमीच्या 'साऊथ कोल' मार्गाने व एकदा पश्चिम कड्याच्या (वेस्टर्न रीज) मार्गाने.

१९६५—लेफ्टनंट कमांडर कोहली मोहीम–चार वेळा शिखर पादाक्रान्त केले.


● ● ●

ज्ञानेश्वर शंभरकर

दोन कविता

## कवडसा

कधीचा हा धूर
वाहतो दिव्यात
कळेना ही आग ... लागे कुठे ?
झोपडीचे मन
मीरेचे मंदिर
मनात अधिर ... जळे काही
दुःख दुःखापरी
माझे आहे मला
उजाड घराला ... कवडसा



## पहाट

दूर धुकारते वाट
घर अनोखे भासते
उभ्या उन्हात जीवाला
तीर दुरुनी छळते

नको अंधारात राहू
अता लपून पाखरा
इथे तिथे चहूकडे
नसे जीवाला आसरा

वाट पहायाची आहे
तुझी तुलाच सत्याची
पोर हिंसेची राजसा
रात्र नाही कळायाची

एक अनोखी तपस्या
दिशा, दिशा उजळते
घोर अंधारात डोळा
सत्य उजळून जाते

# काविळी

सेंटर सेकंड भराभर फिरत असतो. मिनिट-काटा त्याच्यामागून बोजडपणे चाललेला असतो. संसारावर एकाच रसाची पखरण आहे, कंटाळा !

**चंद्रशेखर मराठे**

वेणीचा पेड सोडीत सुशीला पोर्चच्या दाराजवळ उभी आहे. पोर्चच्या दोन्ही बाजूला नवीन पद्धतीच्या मोठ्या खिडक्या आहेत. त्यावर अर्धवट पडदे सोडलेले आहेत. सवयीने सुशीलेची नजर रस्त्यावर जात आहे.

शाळकरी पोरांची वर्दळ ओसरली आहे. एन्. सी. सी. चा युनिफॉर्म चढविलेला एखादा तरुण खाडखाड बूट वाजवीत चालला आहे. सायकलीवर मागेपुढे पायाच्या लाद्या टाकून एखादा सायकलवाला धापा टाकीत चालला आहे. एखादं दुसरे जोडपे एकमेकांचा हात धरून रस्ता ओलांडीत आहे.

संध्याकाळची वर्दळ अजून सुरू झालेली नाही, पण रस्ता सुस्तपणे हालचाल करू लागलेला आहे. जवळपासच्या अमृततुल्य हॉटेलात भज्यांचा दुसरा घाणा सुरू झाला आहे. कापडाच्या-स्टेशनरीच्या दुकानांसमोर पाणी मारणे चालले आहे. फुल-वाल्याने फुलांवर–गजऱ्यांवर पाण्याचा शिडकावा दिला आहे. या साऱ्याचा तेलकट, ओला वास हवेत तरळत आहे.

दुसरा पेड सोडताना सुशीलेला यावेळी नेहमी दिसणारी मुलगी दिसते. व्हायो-लिनची केस हातात घेऊन रस्त्याच्या कडने खाली मान घालून ती मुलगी ठराविक वेळी येथून जाते. थोडीशी अकाली प्रौढ दिसणारी. साध्या वेषातील ती मुलगी क्लासला जात असते, की क्लासमधून परत येत असते, हे सुशीलेला ठाऊक नव्हते; पण कितीतरी दिवस हा क्रम चालू होता. बिचारीने किती प्रगती केली होती देव जाणे !



सुशीलेनेही काही दिवस सतार शिकण्यासाठी एका क्लासात नाव घातले होते, पण शिकणे जमत नव्हते. दुपारच्या एकसुरी वातावरणात बदल करणारा एक टप्पा एवढेच त्या क्लासला महत्त्व होते. अलीकडे क्लासला जाणे तिने सोडलेच होते. कोठे एखाद्या चांगल्या कलाकाराची मैफल असली, तर ती मात्र सुशीला सहसा चुकवीत नसे.

ती व्हायोलिनवाली मुलगी दिसली, की नंतर थोड्याच वेळात राजा ऑफिसातून सरळ घरी आला, तर येत असे. अर्थात असे क्वचितच होत असे, पण आज सुशीलेने राजाला सरळ घरी येण्याबद्दल बजावले आहे. ती अभावितपणे घड्याळाकडे पाहते. राजाची वेळ आलीच आहे. टॉयलेट जरा घाईघाईने आवरायला हवी होती. एकदा राजाची गडबड सुरू झाली की मग काही जमत नसे. भराभरा वेणी आवरून सुशीला बेसिनपाशी जाते. पाण्याचे दोन–चार सपकारे चेहऱ्यावर मारते. तोंडभर साबणाचा फेस असतानाच सुव्रतने दप्तर फेकल्याचा आवाज आणि पाठोपाठ त्याची आरोळी येते.

"कोको फ्रिजवर ठेवलाय रे." चेहरा धुता धुता सुशीला ओरडते. कारण व्रतू किचनमध्ये जाऊन घाईघाईने उसकापासक करणार, हे तिला ठाऊक आहे. व्रतू नेहमी शाळेतून याच्या जरा आधीच येई. त्याचे आणि नंतर राजाचे येणे, हे सुशीलेच्या रोजच्या कार्यक्रमातील महत्त्वाचे कार्यक्रम होते; पण अलीकडे शाळेत कसल्यातरी कल्चरल शोचा सराव चालू असल्याने व्रतू जरा उशिरा येई. राजा आणि

तो कधीकधी एकदमच येत आणि सुशीलेची धांदल उडवीत.

उभ्याउभ्याच कोको संपवीत ब्रतू बाहेर पळत सुटतो. जाता जाता ओरडतो, "आई ग, मी प्रकाशकडे जातोय-आज त्याचा बर्थडे आहे."

"अरे–थांब–थांब," सुशीला टॉवेलने चेहरा टिपीत ओरडते. "त्याला ते परवा नवीन आणलेलं मॅजिक बुक प्रेझेंट घेऊन जा."

ड्रॉवर्सची बरीच उलथापालथ करून ब्रतू पुस्तक मिळवतो आणि 'जातो,' असे ओरडून पळत सुटतो. जिन्यावरून दोन दोन पायऱ्या टाकून उतरत असावा. मोठा घायकुता पोर होता.

अजून राजा आलेला नाही. टॉयलेट संपविताना सुशीला घड्याळाकडे पाहते. एव्हाना यायला हवा. आज–आत्ता सुशीलेला तिच्या मावसबहिणीची व्हिजिट रिटर्न करायची आहे. प्रेमाचे मिस्टर पुढच्या वीकमध्ये स्टेट्सला जाणार आहेत, त्यांना 'बॉन व्हॉएज' करावयाचे आहे. आत्तापर्यंत बाहेर पडायलाच हवे होते. सकाळी राजाला एवढे बजावूनदेखील तो अजून आला नाही.

सगळे आवरून–पर्समध्ये पैसे टाकून, ती टेबलावर टाकून सुशीला पुन्हा पोर्चच्या दाराजवळ येऊन उभी राहते. दुकानासमोर पातळे टांगली आहेत. झगमगत्या उजेडाचा शिडकावा नजर पोहचेपर्यंत मारलेला आहे. पलीकडच्या बिल्डिंगमधल्या सलून-वाल्याच्या रेडिओचा कलकलाट सुरू झाला आहे. 'सुहाने सपन' की कसला तरी शिळा फिलमी गाण्यांचा प्रोग्रॅम चालू आहे. इतक्या लांबवरदेखील स्पष्ट ऐकू येते आहे. सलून-मधल्या गिऱ्हाइकांचे कान फुटत असले पाहिजेत. कंटाळून सुशीला एका बैठ्या खुर्चीवर बसते. टीपॉयवर चालू आठवड्याचा फेमिना पडला आहे. दुपारी तो सर्व चाळून झाला आहे. त्यातली नवीन नीटिंग पॅटर्नदेखील ट्राय करून झाली आहे. नवीन तरी कसली म्हणा, जरा इकडचे तिकडे केले की झाले नवीन !

सुशीला खोलीभर नजर फिरवते. सगळे कसे शिळे दिसत आहे. पडेल रंगाच्या कुशन्स, कित्येक दिवस त्याच कोनात मांडलेल्या वेताच्या फताड्या खुर्च्या-मधल्या बारक्या टेबलावरची शिळी मासिके–वर्तमानपत्रे. वर्षानुवर्षे एखाद्या लिनोलियमच्या जाहिरातीत दाखविलेल्या चकचकीत, पण निर्जीव खोलीसारखी ती खोली दिसत आहे. उद्या अरेंजमेंट थोडीतरी बदलली पाहिजे. खिडक्यांच्या बाजूला कापलेल्या बांबूतले काही वेल टाकावे.

छे:, एवढा बदल पुरेसा नाही. काहीतरी ड्रॅस्टिक चेंज हवा. फक्त खोलीतच नव्हे. आपल्या रुटीनमध्येही. महिनाभर मौंटेनियरिंगच्या कोर्सला दार्जिलिंगला जावे का ? राजा आणि ब्रतू जातील "डिसेंट"मध्ये लंचला; पण हा प्लॅन फारच मोठा आहे. जवळपासच कोठेतरी शॉर्ट ब्रेकसाठी जावे. राजाला रजा मिळाली तर पाहावी.

राजा अजून कसा आला नाही ? कंपनीत काम तर सगळे नुसते शोई असते. मॅनेजमेंट-कन्सलटन्सी-वर्कस्टडी ॲडवर्टायझिंग करणारी एक ब्रिटिश कंपनी-प्रत्यक्ष

कामापेक्षा फस मारी-ऑफिसचा शो–अघळपघळ गळेपडू बोलणे–इंग्लिश वळणाचं वागणे हे भांडवल–पार्ट्या, फंक्शनस, गेट टु गेदर्स, सिंपोसिया–असले तेथे फार चाले. चार दोन मोठी घेंडे कंपनीला वश होती म्हणून चालले होते. असल्या सुपर फ्लूअस् धंद्यात राहून राजालाही एक्सेसेसची-चैनबाजीची-डामडौलाची हॅबिट लागली आहे. कोठे गप्पा मारीत बसला, की भान राहात नाही–चेन स्मोकिंग,– –वीकएण्डच्या वेट पार्ट्या–सारे कंपनीच्या अकाऊंटवर असले म्हणून काय झाले? काहीतरी चेक हवाच !

रोज ती या सुमारास सारे आवरून राजाची वाट पाहात राही, पण तिच्या वाटयाला तो आठवडयातून एकदोन दिवसच येई. राजा आला नाही, की ती जवळपास कोठेतरी मैत्रिणीकडे जाऊन येई. मैत्रिणी कसल्या ओन्ली अॅक्वेंटन्सेस ठाकूर–केणी–राजवाडे–यांच्याकडेच आलटूनपालटून जावे लागे. अगतुग करण्यासारखी गट्टी कोणाशीच जमली नव्हती. या घेडगुजरी शहरात तिला कोणीच मैत्रीण मिळाली नव्हती. सांगलीला किती मैत्रिणी होत्या–उषा, रतन, सरल, लाली. उषाचे मॅरेज सर्वांच्या आधी झाले. त्यावेळी गळामिठी घालून उषा आणि सुशीला कितीतरी वेळ रडत होत्या. कोठे असेल उषा–गुंतूरहून बदली झाली असेल बहुधा तिची–म्हणजे तिच्या मिस्टरांची.

सगळ्याच आता कोठेकोठे होत्या. दुपारच्या दुपार उषा आणि सुशीला बालकवी अनिल यांच्या कविता वाचीत काढत. बालकवींच्या काव्यावर लिहिलेला–कॉलेजात गाजलेला लेख. त्या दिवशी उषाने घेतलेला मुका–परीक्षेनंतर एकमेकींची पातळे नेसून केलेली भटकंती–दर उन्हाळ्यात हमखास होणारी मोठ्यांची भातुकली–हिरव्या मिरच्या घालून वाटलेल्या लसणीच्या तिखटाने लागलेली उचकी–खोटे खोटे प्रेमपत्र पाठवून रतनची केलेली फजिती–आणि एकमेकींना नेहमी पत्रे पाठविण्याची गळ्यावर हात ठेवून दिलेली वचने ! दुपारच्या उन्हात गच्चीवर बसून चावलेले आवळे !

येथे कोणी मैत्रिणी नाहीत–नुसती कंपनी– बूफे डिनरमधल्या ओझरत्या गप्पांसारखी. सुशीला उठते. आता प्रेमाकडे जायचे म्हणजे उशीरच झालेला आहे. रात्री काय करायचे, सकाळचे काय आहे, हे पाहावे. सुशीला किचनकडे चालू लागते. फोन वाजतो–बहुधा राजाचाच !

" हॅलो शिलू डियर." राजाचा घायकुता आवाज आला. " हे बघ, आत्ता सडन्‌ली एका फॉरिन पार्टीशी एंगेजमेंट ठरली आहे. "

" पण प्रेमाताईकडे जायचं ठरलंय् म्हटलं आपलं. " सुशीला ढिसाळ आशेने म्हणते. " बिफोर हॅंड फिक्स झाली आहे ही व्हिजिट. " " तू एकटीच जा आजच्या दिवस, " राजा गडबडीने म्हणतो. " आणि हे बघ, माझी जेवणासाठी वाट बघू नकोस–मी नऊ साडेनऊपर्यंत येतोच. ओके डियर. "

राजाने फोन ठेवून दिल्याचा आवाज येतो. सुशीला असहायतेने फोनकडे पाहात फोन ठेवून देते. शिलू डियर म्हणे ! डियर–डार्लिंग–स्वीटी–जिभेवर सारखे नाचत असतात हे शब्द. थोडा वेळ बसण्यासाठी आलेल्या तिऱ्हाइताला वाटते काय प्रेम आहे बायकोवर–बायकोबरोबर कुठे थोडा वेळ यायला फुरसत नाही यांना. हे गोडगोड-चिकट शब्द धंद्यातील सवयीमळे राजाच्या तोंडी बसले आहेत. त्याची बोलण्याची लकबच गळेपडू झाली आहे. कसली ही नोकरी. काही खासगी व्यक्तिमत्त्व नाहीच. चैनदेखील ऑफिशियल, प्रेमदेखील पब्लिक रिलेशन्सच्या मुलायम घोटीव भाषेत.

सुशीला किचनमध्ये जाते. काही करावयाचे असे फार नव्हतेच. थोडा भात कुकरमध्ये लावून ती बाहेर येते. काहीतरी करायचे म्हणून रेडिओ लावते. कोठे-तरी सतारीचे सूर वाजतात. तेथेच काटा ठेवते आणि दुपारी अर्धे राहिलेले कट-वर्कचे डिझाईन पुरे करण्यास घेते.

ऋतू शिटी वाजवीत येतो. शूज-सॉक्स काढून फेकीत जवळच्या खुर्चीत पाय पसरून बसतो.

" डॅडी आले नाहीत अजून ?"

" त्यांना ॲपॉईंटमेंट आहे. ते जरा उशिरा येतील."

" आज प्रकाश काय चिक दिसत होता आई-एकदम बॉबी डॅरिन."

सुशीला एकवार ऋतूकडे पाहते. हिरवा स्पोर्टशर्ट–पांढरी रेयॉनची पँट–अस्ता-व्यस्त झालेले कुरळे केस आणि हात नाचवीत बोलण्याची घाई. पडलेला एक दात चेहऱ्यावरच्या कोवळेपणात भर घालीत होता. तो कोवळेपणा सोडला तर थेट राजाच !

" पण प्रकाशच्या डॅडींनी भलताच लाँग डिस्कोर्स दिला ग–सगळे चम्स बोअर झाले–रियली ना आम्ही कडक डान्स ॲरेंज केला होता. हेमनं माऊथ ऑर्गन आणला होता, पण डॅडींचं स्पीच संपेच ना."

" अरे, वाढदिवसाला चार चांगल्या गोष्टी सांगितल्या तर त्यात वाईट काय ?"

"चांगल्या कसल्या–हंबग सगळं–प्रकाशचे डॅडी काय करतात म्हाईत आहे? ब्लॅक-मनी आहे सगळा ब्लॅकमनी." यावेळी सुशीला त्याच्याकडे पाहते. ऋतूला फार लवकर नको त्या गोष्टी समजू लागल्या होत्या. अकराव्या वर्षी ऋतू एखाद्या बनेल बिझनेस-मनसारखा बोलत होता. आपले डॅडी नोकरीत उगाच फुकट वेळ घालवीत आहेत, असे त्याला वाटे. त्याच्या डॅडींनाही खरे म्हणजे बिझनेसचे फार ॲट्रॅक्शन होते. कंपनीच्या नोकरीच्या आधाराने राजाचे अनेक उद्योग चालत. ओळखीने होण्या-सारखे कोठलेही काम राजाने करून द्यावयाचे, असा त्याचा लौकिक होता. मोठमोठ्या बिझनेसमेनपासून चौकातल्या पानवाल्यापर्यंत सर्वांशी त्याची सलगी होती. सरकारी अधिकारी–पोलीस इन्स्पेक्टर, पुढारी–असे राजाशी अनेकांचे लागेबांधे होते. आपली

छोटी फियाट घेऊन तो सकाळी बाहेर पडला, की रात्री केव्हा घरी येईल त्याचा नेम नसे.

दुपारचा त्याचा लंच एखाद्या भकास उजेड असलेल्या भपकेबाज हॉटेलात होई. सिनेमापासून सदाचारापर्यंत सर्व सब्जेक्ट्सवर राजा चमकदार बोले. बोलणे हे त्याचे न संपणारे भांडवल होते. सुशीलेबरोबर संध्याकाळी एखादे वेळी फिरावयास निघाला, की रस्त्यात त्याला छपन्न लोक भेटत. त्यांच्याशी सत्रांदा टाळ्या देत–पाठीवर थापा मारीत त्याच्या गप्पा चालत. सुशीला रस्त्यावरची ट्रॅफिक न्याहाळत–दुकानाच्या पाट्या वाचीत उभी राही. एखादी लांबलचक कार राजाला पाहून कर-करत थांबे. मग कारमध्ये बसून बेफाट हसणे–बोलणे सुरू होई. मोटरवाला मान हलवीत हसत राही. सुशीला सिगारेटचा धूर हाताने बाजूस करीत बसून राही. व्रतू हा राजाची जास्त मॉडर्न अशी पॉकेट एडिशन होता. त्याच्याही भोवती सदैव दोस्तांचा घोळका असे.

डोअरबेल वाजते. सुशीला उठून दार उघडते. मिसेस प्रधान.

" हॅलो मिसेस केणी ! " मिसेस प्रधान रुमालाने घाम टिपीत बोलतात.

" हॅलो–सुशीला. " कोल्डली विचारते. तिला ही नटवी–बडबडी–सांस्कृतिक बाई मुळीच आवडत नाही.

" गिरीधारी हॉलमध्ये फोटोग्राफिक एक्झिबिशन आहे. मॉर्निंग स्टडीज फार चांगले आहेत म्हणे. येता का ? "

" कोणाचं आहे ? "

" नवीनच आहे बाई कोणीतरी ब्रूच म्हणून–चला येत असला तर जाऊन येऊ सहज. "

" आता म्हणजे फार लेट झाला हो मिसेस प्रधान. " सुशीला मनगटाकडे पाहात म्हणते.

" बरं, उद्या नक्की येणार का ? " मिसेस प्रधान खट्टू होत म्हणतात.

" बघू ! बरं तुम्ही काय घेता ? लेमन स्क्वॅश आणू थोडं ? "

" नको बाई ! मिस्टर प्रधान येतील आता. " मिस्टर प्रधानांचे थोडे वर्णन करून मिसेस प्रधान जातात.

" व्रतू–तू जेवून घेतोस का ? डॅडींना जेवायचं नाही आज ".

" मला मुळीच भूक नाही–प्रकाशाकडे हाय टी होता. " व्रतू कोचावर पालथा पडून म्हणतो. " आणि ते स्टेशन बदलून इंग्लिश सिलोन लाव ग. "

सुशीला किचनमध्ये जाते. रोज राजा असला नसला तरी तिला व्रतूची तरी कंपनी असे. एकट्याने तिला जेवण जात नाही. थोडा बटाट्याचा रस्सा आणि ब्रेड खाऊन ती उठते. आवरासावर करते. भात आता सगळा उरणार. सकाळी नर्मदेला द्यायला हवा. दिवा मालवून टाकीत ती बाहेर येते. व्रतू कोचावरच झोपी गेलेला असतो.

सुशीला रेडिओ बंद करते. पोर्चच्या दाराजवळ खुर्ची टाकून बसते. खिडकीचा पडदा बदलायला झाला आहे. उद्या डेकोरेशन सेंटरमध्ये जाऊन यायला हवे. प्रेमाकडे जाऊन ॲपॉलाजॉईझ करायला हवे. शिवाय बरशेनचा सिलेंडर संपला आहे. तो पाठवण्याबद्दल सांगायला हवे. रस्त्याकडे पाहात सुशीला राजाची वाट पाहात असा काही काही विचार करीत बसते.

रस्ता आता परत थंड झाला आहे. एक भेळवाला गाडी ढकलीत चालला आहे. लक्ष्मीविलास भेळ–रोज तीच आंबट तिखट चव–तोच कागदाचा लिबलिबीत होणारा तुकडा–तीच नंतर घशाला पडणारी जळजळीत कोरड. तरीही लोक घेताहेत–खाताहेत. चटकदार भेळ. इराण्याकडची वर्दळ मंदावली आहे. कोठून तरी उंच स्वरात भिकारणीचे ओरडणे ऐकू येते 'अन्न वाढा माई'. कशाला ? रोज हेच ओरडण्यासाठी जिवंत राहायला. तेलमालीशवाल्याची विचित्र बसकी आरोळी ऐकू येत आहे. राजा अजून आला नाही. तो येईपर्यंत असंच रस्त्याकडे पाहायला पाहिजे. सिलोन रेडिओवरून आदळणारी गाणी टॉलरेट केली पाहिजेत. वेळ काढला पाहिजे. शेजारी चिटणिसांच्या ब्लॉकमधून जोरात भांडणाचा आवाज येत आहे. वर गोखल्यांच्या ब्लॉकमध्ये पेटीवादन चालले आहे. बीटल्सच्या या जमान्यात गोखल्यांचे रोज "पांडवा सम्राट्पदाला" किंवा असेलच कोठलेतरी गाणे चालू असते. हात मात्र तयार आहे त्यांचा.

"मल्टिप्लिकेशन" या गाण्याचे शिळेवर वाजविलेले सूर जिन्यातून येतात. धाडधाड आवाज येतो. राजा आला आहे.

"हलो शिलूराणी–फार उशीर नाही ना झाला ?" टायची गाठ सैल करीत राजा म्हणतो, "स्वीडिश कोलॅबोरेशनची पार्टी होती. अकाऊंट मिळाला, तर सॉलिड बिझनेस आहे."

खुर्चीवर पाय पसरून बसत राजा विचारतो, "प्रेमाताईकडे गेली होतीस ?"

"नाही रे, एकटीला कंटाळा आला जायचा." त्याचा कोट घेत सुशीला म्हणते– "ब्रतूला तेवढा त्याच्या बेडवर ठेवतोस का ?"

"इथेच झोपला वाटतं– झोप आवरत नाही एवढा मोठा झाला तरी– इडियट" ब्रतूला उचलून घेत राजा म्हणतो आणि आत जातो.

नाईटसूट घालून परत येऊन एका वेताच्या खुर्चीत रेलून बसत राजा सिगारेट पेटवतो.

"बाहेर पुरं नाही का झालं स्मोकिंग ?"

सुशीला खवळून विचारते.

"ओ – डोन्ट वरी–इट्स नॉट मच."

"नॉट मच काय ? सारखं चालूच असतं तुझं."

"शिलू डियर– एक काम करतेस का प्लीज– गेट मी अ ग्लास फुल ऑफ प्लेन

चिल्ड मिल्क–आय ॲम ऑफुली टायर्ड. "

सुशीला उठते. किचनमधून दूध आणून टेबलावर ठेवते. राजा जांभया देत घड्याळाकडे पाहतो.

" ए– आपण सिटी हायस्कूलपर्यंत चक्कर मारून येऊ या का ? "

" इफ् यू डोंट माइंड– शिलू–मी फार फार दमलो आहे– अ टफ डे रियली ! मी आता सरळ झोपी जाणार– राइट अवे– आपण उद्या नक्की जाऊ– आय होप यू विल नॉट माइंड–काय ? "

सुशीला शेजारच्या खुर्चीवर धपकन बसते. राजाचे हे पब्लिक रिलेशन्स ब्रँड बोलणे तिला मुळीच आवडत नसे. बायकोला ' का इफ यू डोंड माइंड ' म्हणायचे असते ? सारखे आपले रिसेप्शनिस्टसारखे मेले बोलणे ! बायको काय माइंड करणार बिचारी– वाटेल तसे वागा– अजून उशिरा घरी या !

" स्टेट्सला काय एखाद्या फौंडेशनकडून जातोय काय प्रेमाचा नवरा ? "

" छेरे– ऑन हीज ओन ! गेल्यासारखं नीट झालं म्हणजे बरं– नाहीतर त्या मिसेस राजवाड्यांच्या भावासारखी ट्रॅजिडी व्हायची. " सुशीला गप्पा मारण्याच्या आवेशात म्हणते. सिगारटचे थोटूक ॲशट्रेत टाकीत राजा उठतो आणि बेडरूमकडे चालू लागतो.

" कमॉन शिलू– लेट्स पॅक अप. "

सुशीला उठते. दिवा घालवून बेडरूमकडे जाते. बेडवर पडून राजाने नवे चिल्लर थ्रिलर वाचण्यास सुरवात केलेली असते. हाडले चेस वाचीत वाचीत झोपी जायचे असा त्याचा शिरस्ता. त्याच्या बेडजवळचा दिवा ठेवून सुशीला सगळे दिवे घालवते आणि बेडवर येऊन बसून राहते. राजाला वाचता वाचता नेहमी झोप लागे. पुस्तक सुशीलेला उचलून ठेवावे लागे. दिवा मालवावा लागे. राजाला झोप लागेपर्यंत ती बसून राही.

" केणी– राजा, अरे केणी ". खालून कोणाच्या तरी जोरजोरात हाका येतात. राजा पुस्तक फेकून देऊन उठतो. धावत पोर्चमध्ये जातो. सुशीलेला मोठमोठ्या आवाजातील बोलणे ऐकू येऊ लागते.

" अंतू– तू आत्ता– केव्हा आलास बेंगलोरहून ?

" लँडिग टुडे– खाली येना लेका. "

" तूच वर येरे अंतोन. "

" नो नो, गेट डाऊन राइट अवे– वहिनींना डिस्टर्बन्स कशाला उगाच ? ये खाली लवकर. "

राजा भराभरा बेडरूममध्ये येतो. बुशशर्ट चढवीत सुशीलेला म्हणतो, " ए, मी जाऊन येतो ग जरा– अनंत पारकर आलाय बेंगलोरहून. "

" फार उशीर करू नका गडे ". सुशीला नाराजीने म्हणते. " आणि आताच

म्हणालात ना फार दमलोय् म्हणून."

"आय ॲम फाईन–जरा एक लाईट चक्कर टाकून येतो. यू गो टू बेड–मी आलोच."

सिगारेटचे पाकीट खिशात कोंबीत राजा पळत सुटतो. दार लोटल्याचा आवाज येतो. सुशीला बेडवर बसून राहते. आता राजा येईस्तोवर दार उघडे ठेवावे लागणार– म्हणजे झोप येणार नाही– लावून घेतले तर उघाडायला उठावे लागणार– राजा येईपर्यंत काय करावे ?

सरलला पत्र लिहावे का. बरेच दिवसांत भेटली नाही. बेबीचा रिझल्ट– नव्या बंगल्याचा प्रोग्रेस– साऊथची ट्रीप– असा मजकूर जुळवीत सुशीला लेटरपॅड काढते. पेन उघडून मायना टाकते.

" प्रिय सरल, बरेच दिवसांत तुझे पत्र नाही."

सुशीला थांबते– बरेच दिवसांत कसले. सरलचे अद्याप तिला एकही पत्र आले नव्हते. सुटीत वगैरे गेल्यावर काय भेट होई तेवढीच. क्लासवन नवऱ्याचा प्रपंच सांभाळताना वेळ होत नसेल पत्र लिहायला. आपले तरी काय अडले आहे ? पेन मिटवून– लेटरपॅड बंद करून सुशीला घड्याळाकडे बघत बसते.

सेंटर सेकंड भराभर फिरत असतो. मिनिटकाटा त्याच्यामागून बोजडपणे चाललेला असतो. सुशीला भिंतीला डोके टेकते. केव्हातरी तिचा डोळा लागतो. दिवा तसाच जळत राहतो.

● ● ●

विनोद कुलकर्णी

# पथ

फिरायला निघताना तरुणपणाचे चढवलेले लेणे पुष्कळवेळा असे चोरीस जाते.

सुमीबरोबर दादा फिरायला म्हणून बाहेर पडले, तेव्हा अजून पूर्ण उजाडले नव्हते. रस्त्यावरचे बल्ब अजून तेवतच होते. पूर्वेकडे थोडासा फिका प्रकाश फाकत होता. शुक्राची चांदणी लख्खपणे चमकत होती. गार पहाटवारे भिरभिरत होते. दादांच्या गळ्याभोवती लोकरीचा मफलर होता. हातात हस्तीदंती मुठीची शिसवी काठी होती. डांबरी सडकेवर तिचा पावलागणिक निघणारा टकटक आवाज मोठा मजेशीर वाटत होता. दादांनी दुसरा हात सुमीच्या खांद्यावर विसावला होता. अंगाभोवती पदर घट्ट लपेटून, सुमी दादांच्या बरोबर सावकाश पावले टाकीत होती.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंचे बंगले हळूहळू जागे होत होते. एखाद्या खिडकीच्या काचेतून प्रकाश बाहेर डोकावत होता. आतली खडबड अस्पष्ट ऐकू येत होती. पानापानांत दडलेले पक्षी हवेत अलगद सूर मारीत होते. त्यांचा किलबिलाट हलके हलके वातावरणात घुमत होता. दादांना प्रसन्न वाटत होते. आजारपणामुळे पूर्वीची फिरायची सवय आपण सोडून दिली हे काही चांगले केले नाही, असे त्यांना मनोमन वाटले. सुमी बरोबर असो वा नसो, उद्यापासून आपण नेमाने फिरायला यायचेच असे त्यांनी मनातच ठरविले.

कुठूनतरी जाईच्या फुलांचा मंद वास वाऱ्यावर वाहात आला आणि चालता चालता दादा थबकले. तो वास दादांनी पुन्हा हुंगला. दादांना अचानक थबकलेले पाहून सुमीने विचारले, ‘ का थांबलात ? पाय दुखू लागले ? ’

‘ छे : छे :, पाय नाही दुखत– ’ दादा म्हणाले, ‘ हा वास पाहिलास ? किती छान आहे ना ? ’ आणि मान वळवून त्यांनी बाजूच्या बंगल्याकडे पाहिले.

बंगला मराठ्यांचा होता. मराठे त्यांचे स्नेहीच होते. नुकतीच त्यांची निवृत्ती झाली होती. बंगल्यापुढे छोटीशी बाग मराठ्यांनी फुलविली होती. निरनिराळ्या वेली मांडवावर चढविल्या होत्या. जाईची वेल फुलांनी खचाखच भरली होती. ती पांढरीशुभ्र, नाजुक फुले पाहात दादा तसेच उभे राहिले.

इतक्यात बंगल्याचे दार उघडले आणि मराठे बाहेर आले. त्यांच्यामागूनच त्यांचे पांढरेशुभ्र केसाळ कुत्रे शेपटी हलवत पुढे आले. मराठ्यांची नजर दादांवर स्थिरावली आणि पायऱ्या उतरून ते खाली आले. कुंपणापलीकडूनच त्यांनी म्हटले, ' नमस्कार जोशी. '

' नमस्कार, ' दादांनी हसत म्हटले.

' आज बरं फिरायला बाहेर पडलात ? '

' हो. मध्ये ती सवय जवळजवळ सुटल्यासारखी झाली होती. डॉक्टरांनीच फिरायला बंदी केली होती. आता परवानगी मिळालीय् हिंडायला. '

' आजारपणानं फारच अशक्त झालात तुम्ही ! '

' पण आता अगदी आराम आहे. सहज चार मैल चालू शकेन मी. '

' असं ? ' मराठे पुटपुटले आणि त्यांनी मंद हास्य केले. अभावितपणे त्यांची नजर सुमीकडे गेली आणि त्यांनी प्रश्न टाकला, ' ह्या कोण ? '

' ओळखलं नाहीत हिला ? ' दादांनी हसत म्हटलं, ' बाकी कसं ओळखाल म्हणा ! पाचसहा वर्षांची होती तेव्हा पाहिली होती तिला. '

मग मराठे एकदम म्हणाले, ' सुधाकरची मुलगी का ? ओ हो–खरंच नाही ओळखलं पहिल्यांदा. केवढी मोठी झालीय्. सुमित्राच नाव ना हिचं ? '

' हो. '

' कुठं असते हल्ली ? '

' पुण्याला. यंदाच बी. ए. झालीय्. '

' असं ? छान हं. लहान होती तेव्हा किती दंगा करायची ... वाक्यावाक्याला हसायची आणि हसायला लागली, की गालांवर खळी पडायची हिच्या ! ' एवढं म्हणून मराठ्यांनी सुमीकडे पाहिलं.

सुमी लाजली. पदर सावरून, मराठ्यांकडे न बघता दूरच उभी राहिली. मराठे मग दादांना म्हणाले, ' तिथंच का उभे आहात जोशी ? आत या. थोडा चहा घ्या. किती दिवसांनी येताय् इकडे. '

' नको, नको– ' दादा म्हणाले, ' चहा घ्यायला एकदा सवडीनं अवश्य येईन. पेन्शनरांच्या यादीत आता तुमचंही नाव दाखल झालंय–मग रिकाम्या वेळेला काय तोटा ! जरा फिरून येतो आता. '

' अच्छा– ' मराठे म्हणाले आणि सुमीकडे पुन्हा नजर जाताच त्यांनी सांगितले, ' थांबा थोडं. सुमित्रेसाठी फुलं देतोय. तिला आवडतात ना ? '



मराठे वळले. जाईच्या वेलीपाशी गेले. त्यांचे कुत्रे पायात घोटाळतच होते. त्यांनी चांगली ओंजळभर फुले खुडली. त्यांतली कित्येक दवांत न्हाली होती. ओंजळ पुढे करीत ते म्हणाले, ' ही घे, सुमित्रा.'

सुमीने ओंजळीत फुले घेतली. दादा पाहात होते. मराठे सुमीला न्याहाळीत आहेत, अगदी लक्षपूर्वक तिला टिपत आहेत, असे त्यांना वाटले. त्यांना काहीसे खटकले. मराठे सुमीला म्हणत होते, ' राहाणार आहेस ना इथं महिनाभर ? एखाद दिवस ये आमच्याकडे. अगदीच नको विसरू आम्हा लोकांना '. एवढे बोलून मराठे खदखदून हसले आणि त्यांनी पावले आत वळवली. ते खुजे कुत्रे धावत धावत त्यांच्यामागे निघाले.

सुमीच्या खांद्यावर हात ठेवून दादा पुढे निघाले. मराठ्यांनी दिलेली फुले सुमीच्या मुठीत होती. ती मूठ सुमी पुन:पुन्हा नाकाजवळ नेत होती, हुंगत होती. दादांना वाटले, त्यांतली थोडी फुले सुमीकडून मागून घ्यावीत; पण ते काहीच बोलले नाहीत. मराठ्यांनी काही त्यांच्यासाठी दिली नव्हती ती. सुमीला आणि सुमी-साठीच त्यांचे ते दान होते.

सुमी विचारीत होती, ' हे गृहस्थ कोण हो दादा ? मी मुळीच ओळखलं नाही

त्यांना. त्यांनी प्रेमानं फुलं दिली, ती घेतली इतकंच.'

'ह्यांचं आडनाव मराठे,' दादांनी सांगितलं.

'आपल्या घरी येतात ?'

'पूर्वी यायचे.'

'माणूस मोठा प्रेमळ दिसतो.'

'प्रेमळ ?' दादा त्या विशेषणाने जरा चरकले. सुमीने मराठ्यांची इतकी प्रशंसा करायला नको असे त्यांना वाटले. ते म्हणाले, 'फक्त गोड शब्दांवरून माणसाची परीक्षा करायची नसते.'

'म्हणजे ?' सुमीने न समजून विचारले.

'मराठे पक्का डाम्बीस माणूस आहे. सिव्हिल इंजिनीअर होता. खोऱ्याने पैसा ओढला. उगाच का बंगली उभारलीय् ?'

'खरंच ?'

'खोटं वाटतं ? मध्ये एका प्रकरणात साफ बडतर्फ व्हायचा. मीच चालवलं ते प्रकरण कोर्टात. निकाल लागेपर्यंत बिचारा जेवत–झोपत नव्हता नीट. शेवटी बचावला झालं.'

दादा सुमीच्या चेहऱ्यावरचा बदल न्याहाळीत होते. सुमीने मुठीतली फुले एकदा हुंगली आणि मूठ सैल सोडली. एक एक फूल खाली गळले. दादा मनात हसले. त्यांनी विचारले, 'फुलं का ग टाकलीस ?'

'त्यांचा वास संपला. नाजुक फुलं–लगेच सुरकुतून जातात !' सुमी म्हणाली.

सगळ्या दिशा आता उजळून निघाल्या होत्या. लालबुंद सूर्यबिंब क्षितिजावर सरकत होते. रस्त्यावरची रहदारी जरा वाढली होती. सगळ्याच बंगल्यांना चांगली जाग आली होती. नीरव शांततेवर मधूनच ओरखडा निघत होता. सुमी स्वतःशीच कसलीशी ओळ गुणगुणत होती आणि तिचा शब्दन् शब्द दादा कानात साठवायचा प्रयत्न करीत होते.

इतक्यात समोरून रामभाऊ आले. हाफपँट आणि बनियन घातलेले. रामभाऊंच्या कपाळावरून घाम निथळत होता. रोज पहाटे चार मैलांची रपेट करून येणे, हा त्यांचा छंद. रामभाऊंनी शरीर कमावले होते. या वयातही त्यांचे बाहू पीळदार होते. पोटऱ्या नि मांड्या भरीव होत्या. गर्दन भरलेली होती. पाहाणाऱ्याला वाटावे, रामभाऊ असतील चाळिशीचे, पण हिशोबाने दादांच्यापेक्षा त्यांचे वय दोन वर्षांनी अधिकच भरले असते.

दादांना पाहून रामभाऊंनी गती मंदावली आणि ते म्हणाले, 'काय जोशी, गाडी रुळावर आली म्हणायची.'

'तसं म्हणायला हरकत नाही,' दादांनी सांगितलं, 'म्हणूनच तर फिरायला आलोय्.'

रामभाऊंनी सुमीकडे पाहिले आणि पुन्हा दादांकडे. मग त्यांनी म्हटले, ' माणसानं सर्वांपेक्षा शरीराची निगा राखायला हवी आधी. देह कसा पोलादासारखा कणखर हवा. माझं पाहिलंत ? वीस वर्षं झाली-कसला आजार म्हणून माहीत नाही. त्यापूर्वी एकदा हिवतापानं आजारी होतो. तेही किती फक्त तीनच दिवस. उभ्या आयुष्यात तेवढा एकच आजार ! ' रामभाऊंनी तिरक्या नजरेने सुमीकडे पाहिले. बनियनशिवाय सगळे अंग उघडेच होते त्यांचे. सुमी चोरटया नजरेने त्यांच्याकडे पाहात होती. रामभाऊ कुठेतरी सुखावले, पण दादा मात्र त्यांच्या शब्दांनी ओशाळले होते. सुमीसमोर रामभाऊंनी अशी स्वतःची बढाई मारून त्यांना अप्रत्यक्ष खिजवले होते.

विषय बदलावा म्हणून दादा म्हणाले, ' हल्ली क्लबात जाता ना ? '

' छे :, कसला क्लब घेऊन बसलाय् ? तुम्हाला माहीत नाही. व्यायामशाळा उघडलीय् मी ! ' रामभाऊंनी पुन्हा एकदा सुमीकडे पाहायचा प्रयत्न केला आणि ही गोष्ट अनुभवी दादांनी बरोबर हेरली. गोगलगायीसारखे अंग चोरून सुमी स्तब्ध उभी होती. रामभाऊंच्या तांवरलेल्या नजरेची सुमीला दृष्ट लागेल की काय, अशी दादांना भीती वाटली. म्हणूनच ते म्हणाले, ' अच्छा, जरा पुढं जाऊन येतो. ' आणि सुमीच्या आधाराने दादा चालू लागले.

रामभाऊंनी मान वेळावून त्या दोघांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहिले. तो विशालकाय माणूस एकदा पचकन् थुंकला आणि कुणीतरी पाठीमागून धक्का दिल्यासारखे पुढे झुलत चालू लागला.

गाव मागे राहिला. दोन्ही बाजूंना शेतांची संगत असलेला रस्ता वळणे घेत धावत होता. एका छोटया पुलाजवळ दादा थांबले आणि सुमीला म्हणाले, ' इथंच बसू थोडा वेळ. खूपच लांब आलो ना आपण ? '

' होना–' सुमी म्हणाली, ' दोन मैल अंतर सहज आहे हे. '

दादा पुलावर बसले. सुमीही त्यांच्याजवळच बसली. आता स्वच्छ ऊन सगळीकडे पसरले होते. सुमीचे लक्ष समोरच्या आंब्यांच्या झाडाकडे गेले. हिरवेगार आंबे लहडत होते. जणू झुंबरे टांगली होती. सुमीला कैऱ्याचा मोह पडला आणि ती उठली. दादांनी विचारले, ' कुठं निघालीस ? '

' इथंच. आंबे किती खाली आहेत पाहिलेत ? एखादा हाताला लागतो का पाहते. '

दादा काही म्हणाले नाहीत. सुमी आंब्याखाली जाऊन उभी राहिली. एकवार तिने वृक्ष चौफेर न्याहाळला. एक टंच कैरी अगदी खाली लोंबकळत होती. सुमीने हात उचलला–पण तो पुरला नाही. कैरी वरच राहिली. दादा सुमीकडे पाहात होते. तिचे अंग लवलवत होते. ती टाचा उंचावत होती, पण कैरी हाताला लागत नव्हती.

मग दादाच उठले. आंब्याखाली आले. हातातल्या शिसवी काठीचा एक तडाखा त्यांनी दिला आणि ती कैरी धप्कन गळली. सुमीने तिच्यावर जवळजवळ झेप घातली आणि हातात तो हिरवा टंच आंबा घेऊन ती खदखदून हसू लागली. ते हसणे पाहून दादा मोहरले. त्यांना फार फार बरे वाटले. वाटले, सुमीने न थांबता असेच हसत राहावे.

पाच मिनिटांनी सुमी म्हणाली,' आता परतूया ना.'

'चल,' दादा म्हणाले. त्यांनी हातात काठी सावरली.

सुमीने विचारले, 'हात धरू का ?'

'नको, नको–' दादा म्हणाले, 'गेलेलं सारं बळ आता परत आल्यासारखं वाटतं बघ, सुमी ! ह्या काठीच्या आधाराचीही आवश्यकता नाही.'

सुमीबरोबर दादा चालत राहिले. वय विसरून चालत राहिले. सुमीच्या हातात अजून ती कैरी होती. तिचा लांब देठ तिने हाताच्या बोटात पकडला होता. त्याच्याकडे सुमी कौतुकाने पाहात होती. स्वतःशीच दंग होऊन चालत होती. चालता चालता तिची नजर समोर गेली आणि आश्चर्याने ती वेडी झाली.

समोरून दिलीप येत होता. एकटाच. तिच्याशी नजरभेट होताच त्यालाही नवल वाटले, तितकाच आनंद झाला. सुमीने थांबून विचारले, 'तू इथं कसा ?'

'इथं माझे मामा राहतात. काम होतं त्यांच्याकडे – म्हणून काल आलो.' दिलीप म्हणाला, 'पण तू कशी इथं ?'

'हे आजोळ माझं,' सुमीने सांगितले, 'हे माझे आजोबा.'

दिलीपने दादांना नमस्कार केला. दादांनी त्याच्याकडे निरखून पाहिले. पंचविशीतले त्याचे उमदे तारुण्य. सफाईने मागे वळवलेले केस. बोलण्यात गोडवा. नजरेतील स्निग्धता. सुमी त्यांना सांगत होती, 'दादा, हे माझ्यावरोबर होते पुण्याला.' सुमी कौतुकाने दिलीपबद्दल सांगत राहिली.

सुमी खळखळून हसली. दिलीप तिच्याकडे एकटक पाहात होता. दादांची नजर दिलीपवर घोटाळत होती.

सुमी मग म्हणाली, 'आज दुपारी आमच्या घरी यायला हवंस. तीनला ये.'

'पण–'

'मी काही सबब ऐकायची नाही. शनीच्या देवळामागं जोशांचा वाडा कुणीही सांगेल. यायला हवंस हं तू. मी वाट पाहीन.' सुमीने इतके म्हटले नि मग विचारले, 'एकटाच निघालास फिरायला ?'

'लवकर जाग आली नि मनात आलं जावं फिरत.'

'कवीच तू. काय लहर येईल कुणी सांगावं ? आजोबा, हे कविता करतात !"


दिलीप हसला. निरोपादाखल सुमीने हात पुढे करीत म्हटले, 'दुपारी यायचं हं. बोलत बसू. सगळ्यांच्या ओळखी करून देईन.'

तो पुढे गेला आणि सुमीबरोबर दादा निघाले. सुमी सांगत होती, ' दादा, दिलीप भारी हुशार आहे हं. अवघ्या कॉलेजात नाव गाजवलंय् त्यानं. त्याच्या कविता अवश्य वाचून पाहा तुम्ही. दुपारी आला, की गायला सांगू त्याला. नाही म्हणणार नाही तो. निदान मी सांगितल्यावर तरी ! ' आणि शेवटचे वाक्य बोलून तिनं जीभ चावली. स्वत:शीच ती लाजली. हातातली कैरी तिने ओठावर टेकवली.

दादांनी तिचे बोलणे ऐकले आणि कसले तरी मळभ त्यांच्या मनात दाटून आले. मोहरलेले मन गळून गेले. वयाचे ओझे मानगुटीवर बसले. आपण फार जून झालो, असे त्यांना वाटू लागले. कुणाचा तरी आधार आपणाला हवाच, असे त्यांचे मन म्हणाले आणि आपला हात सुमीच्या खांद्यावर विसावत ते म्हणाले, ' सावकाश चल, सुमी. अग म्हातारा माणूस मी. तुझ्यासारखं भरभर चालणं कसं जमेल ? '

● ● ●

बँकिंगसंबंधी
सर्व कामकाज
*अर्थात*
**दी**
**बँक ऑफ इंडिया**
*मध्येच !*
B/C/20



उत्तरार्ध : लेखांक सातवा



# भस्मासुराचा उदयास्त



## रा. म. शास्त्री

" फ्रान्स पडल्यानंतर आमच्या सर्व मित्रांच्या व शत्रूंच्या मनात एकच प्रश्न येत होता– ' आता इंग्लंडही शरण जाणार काय ? ' १८ जूनला म्हणूनच मी कॉमन्स सभागृहात स्पष्ट सांगून टाकले–आमच्या तिन्ही लष्करी दलप्रमुखांना अंतिम विजयाची अजूनही खात्री वाटते. फ्रान्सची लढाई संपली असली, तरी आमची ब्रिटनची लढाई आता कुठे सुरू होत आहे. आमचे ब्रिटिश जीवन, आमच्या संस्कृतीचे अस्तित्व व साम्राज्याचे भवितव्य या लढाईने ठरणार आहे. शत्रू–आपल्या सर्व शक्तीनिशी-आता आपल्यावर तुटून पडणार आहे, कारण हिटलर हे जाणतो, की आमच्या या बेटात उतरून आम्हाला पराभूत केल्याखेरीज युद्ध संपणार नाही. हे दिव्य तरी त्याला करावे लागेल, किंवा युद्ध हरावे लागेल ! आपण आज उभे राहिलो, तर उद्या सर्व युरोप स्वतंत्र होण्याची आशा आहे व त्यामुळे जगाची प्रगती होणे शक्य आहे. परंतु जर आपण आज हार गेलो, तर जगात एक काळे भीषण पर्व सुरू होणार आहे. हे युग विध्वंसक ठरणार आहे. कारण शास्त्रीय ज्ञानाच्या दुरुपयोगाने त्याची भयानकता अधिकच वाढलेली असेल. म्हणून आपण आपले कर्तव्य करण्यासाठी आज कंबर कसून अशारीतीने उभे ठाकू, की जर ब्रिटिश साम्राज्य व कॉमनवेल्थ हे पुढील हजार वर्षे टिकले, तर शेवटपर्यंत लोकांना म्हणावे लागेल, की प्रस्तुतचा काल हाच काल आमच्या कर्तृत्वशक्तीचा परमोच्च काल होता.

[Let us therefore **brace** ourselves to our duties & so bear **ourselves** that if the British Empire and its Commonwealth **last** for

a thousand years men will still say: 'This was their finest hour.' ]

## चर्चिल यांचा ठाम युद्धपवित्रा

१८ जून १९४० रोजी पंतप्रधान चर्चिल यांनी वरीलप्रमाणे, हिटलरच्या सर्व शांतताप्रस्थापनेच्या प्रयत्नांना पाने पुसली. चर्चिल यांच्या वक्तृत्वाप्रमाणे हिटलर स्वत: वक्तृत्वकलेत गुणी असल्यामुळे त्याला वाटले, की चर्चिलसाहेब वरवर कितीही शौर्याचा आव आणीत असले, तरी युद्ध बंद करण्याची संधी मिळाली, तर ते ती दवडणार नाहीत. परंतु वरवर युद्धाच्या वल्गना करीत देशबांधवांना फसवून व त्यांना अंधारात ठेवून, युद्धतहकुबीच्या आतून वाटाघाटी करणारे भेकड नेतृत्व तोपर्यंत जन्माला आलेले नव्हते. चर्चिल कॉमन्ससभागृहात जे सांगत होते, तसेच आदेश त्यांनी सर्वत्र सोडले होते.

हिटलरचे शांततेचे प्रयत्न तीन दिशेनी चालू होते. स्वीडनच्या राजामार्फत युद्ध बंद करावे, असे पत्र चर्चिल यांना आले होते. महात्मा पोप याने व्हॅटिकनमधून मुसोलिनी व चर्चिल यांना पत्रे लिहून ख्रिश्चन धर्मियांनी चालवलेले हे युद्ध बंद करावे, म्हणून पत्रे लिहिली होती. शिवाय अमेरिकेत वृत्तपत्रांतून जाहिराती फडकत होत्या—" Keep America out of war." (अमेरिकेला युद्धाबाहेर ठेवा!) या सर्व प्रयत्नामागे जर्मनीचा गुप्त हात होता. न्यूयॉर्क टाईम्सच्या २५ जून, १९४० च्या अंकात ही जाहिरात प्रसिद्ध झाली होती.

चर्चिल यांनी अमेरिकेतील ब्रिटिश वकील लॉर्ड लोथियन (Lothian) यांना सक्त ताकीद पाठवली, की अमेरिकेतील जर्मन परराष्ट्रखात्याशी यत्किंचितही संपर्क ठेवू नका. लॉर्ड लोथियन हे समजून होते, की चर्चिलचा आदेश न मानता, जर्मन परराष्ट्रखात्याशी चुंबाचुंबी केली, तर सिमल्याच्या थंड हवेत अटकेत ठेवण्यासारखी सौम्य शिक्षा न होता डोकेच मारले जाईल! त्यामुळे रावापासून रंकापर्यंत एकही ब्रिटिश प्रजाजनाची जर्मनीच्या जाळ्यात अडकून पडण्याची प्राज्ञा नव्हती.

स्वीडनच्या राजाला चर्चिल यांनी फटकारून लिहिले—

" शांततेचा विचार करण्यापूर्वी जर्मनीने आपल्या कृतीने आपल्या कृत्यांचे परिमार्जन केले पाहिजे. नुसते शब्द नकोत–कृती हवी. झेकोस्लोव्हाकिया, पोलंड, नार्वे, डेन्मार्क, हॉलंड, बेल्जम व फ्रान्स यांचे स्वतंत्र जीवन पुन्हा सुरू करू देण्याची कृती जर्मनीने प्रथम करावी व मग शांततेचा उच्चार करावा– "

चर्चिल यांच्या या बाणेदार पवित्र्याने, सोयीप्रमाणे युद्ध बंद करून शांतता प्रस्थापित करण्याचा हिटलरचा डाव उधळला गेला. अहमदशहा अब्दालीच्या उन्मत्त थोबाडावर थुंकून दत्ताजी सांगतच होता–' बचेंगे तो और भी लढेंगे–! ' १९ जुलै, १९४० ला हिटलर राईशपुढे चर्चिलचा समाचार घेऊ लागला. हिटलर या भाषणाच्यावेळी कसा दिसत होता, याचे वर्णन त्यावेळी राईशमध्ये हजर असलेल्या शिररने केलेले आहे.

The Hitler we saw in Reichstag today was the conqueror & conscious of it & yet so wonderful an actor, so magnificent a handler of the German mind that he mixed superbly the full confidence of the conqueror with the humbleness, which always goes down so well with the masses, when they know a man is on top. His Voice was lower tonight–he rarely shouted as he usually does.

## नट हिटलर

[ आज राईशस्टॅगपुढे जो हिटलर दृष्टीस पडला, तो आपण जेते आहोत याची पूर्ण जाणीव असलेला होता. त्याच्या ठिकाणचे खरे नाटय व जर्मन मनावरील त्याची हुकमी पकड याचेही विस्मरण होत नव्हतेच. त्याने आपल्या वक्तृवात जेत्याचा संपूर्ण आत्मविश्वास व नम्रपणा याचे कौतुकास्पद मिश्रण साधलेले होते. नेतृत्वाच्या अत्युच्चपदी असलेल्या व्यक्तीच्या ठिकाणी अशी नम्रता पाहाताच सर्वसाधारण जनता नेहमीच भारून जाते. आज तो खालच्याच आवाजात बोलत होता व इतरवेळेप्रमाणे त्याने आपला आवाज आज एकादाही तारस्वरात नेला नाही– ]

आपल्या भाषणात हिटलरने सांगितले–

" ब्रिटनमधून मला जो एकाकी सूर ऐकू येतो, तो तेथील जनतेचा नसून तेथील राजकीय नेत्यांचाच असा आग्रह दिसतो, की युद्ध चालूच राहिले पाहिजे ! या राजकीय नेत्यांना, हे युद्ध असेच चालू राहण्यात काय धोके आहेत, याची कल्पना आहे, की नाही, हे मला ठाऊक नाही. एक गोष्ट खरी आहे, की ब्रिटन नष्ट झाले, तरी कॅनडामधून युद्ध चालूच ठेवण्याचा इरादा ते व्यक्त करीत आहेत. ज्यांना युद्धाची खुमखुमी आहे तेवढेच लोक कॅनडात जाऊ शकतील ! ब्रिटिश जनता ब्रिटनमध्येच राहाणार आहे – "

" मित्रहो, माझ्यावर विश्वास ठेवा, की अशातऱ्हेच्या तत्त्वशून्य राजकीय नेत्यांविषयी माझ्या मनात अत्यंत तिरस्कारच आहे. ही अशी माणसे सर्व राष्ट्रच्या राष्ट्र अधोगतीला नेतात. मला याचे अतीव दुःख होते, की या अशा माणसांनी जो सत्तेचा डोलारा डळमळत आणलाच आहे, त्याला अखेरचा धक्का मारण्याचे काम दैवाने मलाच द्यावे ! मिस्टर चर्चिल यांनी एकवार तरी माझ्या या भविष्यवाणीवर विश्वास ठेवावा. माझे भविष्य आहे, की त्यांचे बलाढय साम्राज्य या आततायीपणामुळे धुळीला मिळणार आहे. परंतु वस्तुतः या साम्राज्याला धक्का लावण्याची माझी बिलकुल इच्छा नव्हती. असे असूनही या क्षणी पुनः एकदा ब्रिटनमधील सुजाण अशा माणसांना व इतरेजनांनाही शांततेचे आवाहन करण्याचे कर्तव्य मला केले पाहिजे. मी असे आवाहन करू शकतो, कारण मी कोणी परा-

भूत असा भिकमाग्या नसून, जेता आहे व जेता म्हणूनच सुजाणांना माझे हे आवाहन मी करीत आहे. मला युद्ध यापुढे चालू राहण्याचे कारणच समजत नाही."

आपले भाषण मध्येच थांबवून यावेळी हिटलरने बारा व्यक्तींना फिल्ड मार्शलचे किताब सन्मानाने दिले. ब्राऊश, कायटेल, रुडन्स्टेंड, बॉक, लीब, लीस्ट, क्लज, विझलबेन, रिशेनॉ या नऊ लष्करी अधिकाऱ्यांना व मिट्च, केसरलिंग व स्पिरले या तीन लुप्तवाफ् अधिकाऱ्यांना यापुढे फिल्ड मार्शल म्हणून ओळखले जाणार होते. मार्शल गोअरिंगला या बाराजणांहून वरचा दर्जा– ' राईश मार्शल'पद बहाल करून देण्यात आले.

१९ जुलै, १९४० च्या या हिटलरच्या भाषणाचा परिणाम जर्मन जनतेवर विलक्षण झाला. फ्युररने युद्ध जिंकल्यासारखेच आहे व इंग्लंडची शरणागती हा आता फक्त काही कालाचाच प्रश्न आहे, असा समज सर्वत्र दृढ झाला.

## इंग्लंड सज्ज झाले

परंतु हिटलरचा व जर्मन जनतेचा अपेक्षाभंग झाला. ब्रिटन शांत होते. हिटलरच्या शांततेच्या आवाहनाला ब्रिटिश पंतप्रधानांनी जातीने उत्तर देण्याचीही जरूरी नाही, असे चर्चिल यांनी ठरवले व २२ जुलैला परराष्ट्रखात्याचे चिटणीस लॉर्ड हॅलिफॅक्स यांनी रेडिओवरून हिटलरला खणखणीत जबाब दिला, की " हिटलरच्या सोयीनुसार लढाई बंद होणार नाही– ! "

चर्चिल यांनी आपले सारे लक्ष आता ब्रिटनच्या संरक्षणावर केंद्रित केले होते. हिटलरच्या भाषणाची दखलही त्यांनी घेतली नाही. कारण जाता क्षण मोलाचा होता. अमेरिकेतून अटलांटिक ओलांडून शस्त्रास्त्रांची आयात सुरू झाली होती. पहिली मदत इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरत होती. डंकर्कला शस्त्रे टाकून पळालेले ब्रिटिश सैन्य पुनः शस्त्रसज्ज केले जात होते.

जनरल आयर्नसाईड यांच्याकडून ब्रिटनच्या संरक्षणाची जबाबदारी काढून ती आता जनरल अॅलन ब्रूक यांचेवर सोपविण्यात आली होती. ब्रिटनच्या प्रत्येक शहरातून व खेड्यांतून होमगार्ड संघटनेचे जाळे पसरत जात होते. प्रत्येक धडधाकट ब्रिटिश स्त्री-पुरुष प्रजाजन अहोरात्र आपआपल्या गावात पहारा करीत होता. जुलै महिना संपण्यापूर्वी सारे ब्रिटिश राष्ट्र शस्त्रसज्ज झाले. आकाशातून जर्मन सैन्य उतरले, तर त्याचा जागोजाग खातमा करण्याची तयारी जुलैअखेर पुरी झाली.

## ब्रिटनच्या स्वारीचा आराखडा

चर्चिल यांना याची कल्पना होती, की हिटलर एकीकडे शांततेचे आवाहन करीत असला, तरी त्याचे ब्रिटनवरील स्वारीचे मनसुबे सुरू झाले असणार. हा अंदाज अगदी बरोबर होता. १९ जुलैला शांततेचे आवाहन हिटलर करीत असतानाच जर्मन सर्वोच्च लष्करी यंत्रणेने ब्रिटनच्या स्वारीचा आराखडा तयार केला होता.

या आराखड्यानुसार पहिल्याच धडाक्यासरशी ९०,००० जर्मन सैन्य ब्रिटनच्या किनाऱ्यावर वेगवेगळ्या सहा ठिकाणी उतरणार होते. रॅम्सगेट, ब्रायटन, वायमाऊथ आदि ठिकाणी तोंडावर पहिल्याच सैन्यलाटेत स्वारीवर जाणाऱ्या जर्मन सैन्याचे नेतृत्व राहाणार होते–फील्डमार्शल रडन्स्टेडकडे. या सैन्याच्या लोंढ्यापाठोपाठ १,७०,००० जर्मन सैन्य लाटालाटांनी इंग्लंडमध्ये पोचणार होते. दुसऱ्या लाटेत–सहा पॅन्झर डिव्हिजन्स, तीन स्वयंचलित डिव्हिजन्स व दोन पॅरेशूट डिव्हिजन्स यांचा अंतर्भाव होता.

हे प्रचंड जर्मन सैन्य इंग्लंडच्या किनाऱ्यापर्यंत नेण्याचे काम अर्थातच जर्मन आरमारप्रमुखाचे होते व रिअर ॲडमिरल रीडर हा या दृष्टीने आपला अहवाल तयार करीत होता. रीडरच्या अंदाजाप्रमाणे जर्मन सैन्य अनेक ठिकाणी उतरविण्यात धोका होता...कारण हवा स्वच्छ असली व पहिले ८०-९० हजार सैन्य ठिक-ठिकाणी उतरले, तरी मागून दिमतीला जाणारे सैन्य कदाचित वाईट हवेमुळे अडकून पडले, तर पुढे गेलेल्या सैन्याची लांडगेतोड होणार, यात त्याला शंका नव्हती. जर्मन आरमार इतक्या ठिकाणी रसद पोचविण्याच्या ताकदीचे नव्हते. म्हणून त्याने आपल्या अहवालात सैन्य अनेक ठिकाणी न उतरवता एक-दोन ठिकाणीच डोव्हरसमोर उतरवावे अशी सूचना केली व जर्मन आरमाराची तूर्त तयारी न झाल्यामुळे ब्रिटनच्या स्वारीचा बेत १९४१ च्या मे महिन्यापर्यंत पुढे ढकलावा, असा हिटलरपाशी आग्रह धरला.

आठ-नऊ महिन्यांनी जर्मन आरमाराची परिस्थिती कितीही सुधारली; तरी या आठदहा महिन्यांत ब्रिटन पुन: उठून उभे राहील, याचा अचूक अंदाज हिटलरला होता. डंकर्कला शस्त्रास्त्रे टाकून पळालेले सैन्य विस्कळीत अवस्थेत असताना व आकाशात जर्मनीचे वर्चस्व निर्विवाद असतानाच, ब्रिटनची स्वारी केली पाहिजे, हे तो समजून चुकला होता. परंतु रीडरने हातपाय गाळल्यामुळे त्याचा नाइलाज झाला. त्याने जो निर्णय घेतला, तो गुप्त कागदपत्रांत नमूद केलेला आढळला. यात हिटलरने आज्ञा दिली होती–

" सप्टेंबर १९४० पर्यंत ब्रिटनच्या स्वारीचा मुहूर्त साधायलाच हवा. परंतु प्रत्यक्ष स्वारी सप्टेंबर १९४० मध्ये करावयाची, की मे, १९४१ पर्यंत ती लांबवा-वयाची याचा निर्णय, दक्षिण ब्रिटनवर सतत आठवडाभराच्या बॉम्बवर्षावाचा काय परिणाम होतो, तो पाहून मग घेण्यात येईल. जर या बॉम्बहल्ल्यांनी ब्रिटिश बंदरे, आरमारदल व हवाईदल यांची विलक्षण हानी होत आहे, असे दिसले, तर १९४० सालातच ही स्वारी करावयाची आहे. नाहीतर मात्र मे, १९४१ पर्यंत हा विचार पुढे ढकलावा लागेल–"

## विचित्र शिथिलावस्था

ब्रिटनवरील स्वारीची तारीख पुढे ढकलावी, हा रीडर याचा सल्ला हिटलरने

मानला, याला जर्मन आरमाराची ताकद त्यावेळी पुरेशी नव्हती एवढे एकच कारण नाही. कारण असंख्य धाडसी निर्णय यापूर्वी हिटलरने घेतले होते व ब्रिटनवरील स्वारीच्या प्रयत्नात मनुष्यहानी कितीही झाली, तरी ती पार पाडावयाचीच, असा निर्णय हिटलरने त्यावेळी घेतला असता, तर ते त्याच्या धाडसी नेतृत्वाला साजेसेच ठरणार होते. परंतु खरी गोष्ट अशी होती, की ब्रिटनला काय मार्गाने नामोहरम करावयाचे, याचा निश्चित विचारच कुणापाशी नव्हता. तिसऱ्या राईशच्या आयुष्यातील हा आश्चर्यजनक विरोधाभासच म्हणायला हवा! सर्व युरोपखंड यावेळी हिटलरच्या पायाशी लोळण घेत होता. जर्मनीच्या इतिहासात एवढे मोठे लष्करी विजय मिळाल्याची ही पहिलीच खेप होती. जर्मनीच्या विजयाने सर्वांचे डोळे दिपलेले आहेत, अशा या सुवर्ण-संधीच्या प्रसंगी—आवेशाने, साहसाने, ब्रिटनवर तुटून पडावे, ही हिटलरची इच्छाच अर्धमेली व्हावी, याला काही अर्थ होता काय ? केवळ हिटलरच नव्हे, तर त्याच्या सर्व तेरा फिल्डमार्शलपैकी कुणाजवळही इंग्लंडला नामोहरम करण्याची निश्चित योजना यावेळी नव्हती व मुख्य म्हणजे हे केलेच पाहिजे, असा उत्साहही नव्हता.

याला कारण अर्थात हेच होते, की जर्मनांपाशी शेजारपाजारच्या राष्ट्रांची भूमी हिसकून घ्यावी, यापेक्षा मोठी अशी महत्त्वाकांक्षेची क्षितिजेच नव्हती. यामुळे युरोपातील जर्मनीच्या सबल आणि निर्बल शेजारी राष्ट्रांना धुळीला मिळवताच त्यांची कल्पनाशक्तीच पांगळी झाली.

जे आक्रमण हाती घेतले आहे, त्यामागे काही विशाल तत्त्वज्ञानाची जोड असल्याखेरीज कुठलेही आक्रमण फार काळ आक्रमक अवस्थेत राहूही शकत नाही. गरळ ओकताच विंचवाने नांगी टाकावी, त्याप्रमाणे एक विचित्र शिथिलावस्था अशा तत्त्वशून्य आक्रमकांच्या नशिबात लिहिलेली असते. जर आक्रमणाच्या मागे एखाद्या विशाल तत्त्वज्ञानाचा पाठपुरावा असेल, तर दृष्टीचे क्षितिज आकुंचित राहूच शकत नाही. हिटलरच्या आक्रमकयुद्धाला अशा कसल्याच परतत्त्वाचा स्पर्श नव्हता. त्या आक्रमणामागची राष्ट्रीयत्वाची भूमिका तेवढी शुद्ध होती. राष्ट्रीय सूडाची जाज्वल्य महत्त्वाकांक्षा ही स्वागतार्ह होती. परंतु यापलीकडे जाऊन जगाची रचना अधिक सुखकारक करण्याची साधी सदिच्छादेखील नाझी आक्रमकांपाशी नव्हती. यामुळे टिचभर इंग्लिश खाडीने आणि एकाकी पडलेल्या, परंतु युरोपियन राष्ट्रांच्या स्वातंत्र्याच्या उद्घोषाने युद्धात आहुती टाकीत राहिलेल्या ब्रिटनसारख्या छोट्या देशाने, अखेर हा नाझी भस्मासुर नेस्तनाबूद करण्यात यश मिळविले. परंतु हे करीत असताना ब्रिटिशांनी केवढी भयानक किंमत दिली, याचा इतिहास अत्यंत रोमहर्षक व स्फूर्तिदायक आहे.

### विमानहल्ल्यांचे वेळापत्रक

१ ऑगस्ट, १९४० ला हिटलरने ब्रिटनवरील विमानहल्ल्यांचे वेळापत्रक

गोअरिंगच्या हाती ठेवले. या गुप्त वेळापत्रकात हिटलरने खालीलप्रमाणे आज्ञा सोडलेल्या आढळतात--

फ्यूरर हेडक्वार्टर्स
१ ऑगस्ट, १९४०

अत्यंत गुप्त

[परिपत्रक नं. १७– ब्रिटनविरुद्ध करण्याच्या हवाई व नाविकयुद्धाचा आराखडा]

इंग्लंडवर कबजा करणे सोयीचे व्हावे, याकरता ब्रिटनविरुद्ध हवाई व नाविक युद्धाचा जोर वाढवण्याचे मी ठरवले आहे.

या दृष्टीने मी पुढील आज्ञा सोडीत आहे.

१. जर्मन हवाईदलाने शक्य तितक्या लवकर ब्रिटिश विमानदलाचा प्रतिकार मोडून काढावा.

२. ब्रिटिश विमानदलाचा प्रतिकार पुरेसा कोसळताच इंग्लंडची बंदरे व अन्न-धान्याची ने-आण करणारी महत्त्वाची ठिकाणे यांवर प्रखर बॉम्बहल्ले चढवण्यात यावे. मात्र दक्षिणेकडील बंदरांवर हे हल्ले सौम्य असावे. ही काळजी आपल्या पुढल्या पवित्र्याच्या दृष्टीने घेणे आवश्यक आहे.

३. ब्रिटनला दहशत बसावी, या दृष्टीने जे बॉम्बहल्ले करावयाचे, त्यासंबंधी मी योग्य तेव्हा निर्णय घेईन.

४. सहा ऑगस्टपासून बॉम्बहल्ल्यांची प्रखरता वाढवण्यास सुरवात करावी. नाविकदलानेही याच सुमारास आपल्या सर्व शक्तीनिशी निकराचे हल्ले सुरू करावेत.

–ॲडॉल्फ हिटलर

डंकर्कच्या युद्धात ब्रिटनच्या फायटर विमानांनी लुफ्तवाफ़ला काहीसा हिसका दाखविला असल्यामुळे, ब्रिटनची फायटर विमाने जास्तीतजास्त संख्येने नष्ट करण्याच्या दृष्टीने गोअरिंगने जुलैअखेरपर्यंत इंग्लिश खाडीतील ब्रिटिश आरमारी जहाजांवर हल्ले चढवले होते. आरमाराच्या संरक्षणासाठी ब्रिटिश फायटर विमाने बहुसंख्येने इंग्लिश खाडीत यावीत, हा हेतू या काहीशा सौम्य बॉम्बहल्ल्यांमागे होता.

परंतु ब्रिटनच्या हवाईदल प्रमुखांनी यावेळी अत्यंत धूर्तपणाने, फायटर विमानांच्या संपूर्ण विनाश होऊ देण्यापेक्षा चार जहाजे अधिक बुडाली तरी चालेल, असे ठरवले व फक्त मोजकीच फायटर विमाने यासाठी त्यांनी आरमाराच्या संरक्षणासाठी धाडली. जुलै महिन्यात ब्रिटनच्या चार विनाशिका व १८ व्यापारी जहाजे जर्मन विमानहल्ल्यांमुळे बुडाली, परंतु लुफ्तवाफ़च्या २९६ बॉम्बर विमानांचा बळी घेऊन व १३५ निकामी करून ब्रिटनने या पहिल्या सलामीत फक्त १४८ फायटर विमाने गमावली.

## राडारचं वरदान

ब्रिटिशांना संख्येने व सामर्थ्याने चौपट असलेल्या लुफ्तवाफशी मुकाबला करण्यात जे अभूतपूर्व यश मिळाले, त्याला कारण राडार यंत्राचा शोध हे होय. या यंत्रावर जर्मन विमानांचा प्रवास अचूक निर्देशित होत असे. पश्चिम युरोपातून इंग्लंडवरील हल्ल्यासाठी उड्डाणभूमीवरून निघाल्यापासून जर्मन विमानांच्या प्रवासाची दिशा व रोख राडार यंत्राच्या पडद्यावर उमटत असे. यामुळे ब्रिटिश फायटर विमानांना— जर्मन बॉम्बर्सना नेमके कुठल्या ठिकाणी, किती वाजता गाठायचे, याचा अचूक बेत ठरवता येत असे. शत्रूला सोयीचे असेल, त्यावेळी व त्याच ठिकाणी तो हल्ला करतो. परंतु त्याला सोयीच्या असलेल्या ठिकाणीच लढत राहाण्याचा मूर्खपणा इंग्लिश युद्धशास्त्रात बसत नव्हता ! म्हणून प्रतिकाराबरोबरच बर्लिनवर बॉम्बहल्ले सुरू करण्याचा मनसुबा ब्रिटिश विमानदल तत्क्षणी रचू लागले. जर्मन वैमानिकांना हे कळेना, की आपण ज्या दिशेने जातो, त्याच दिशेवर व आपल्या विभागलेल्या शक्तिसंख्येवर ब्रिटिश फायटर विमाने अचानक कशी तुटून पडतात ? या इलेक्ट्रॉनिक यंत्राचा शोध अद्याप जर्मनीला ठाऊक नव्हता व यामुळे जर्मन विमानांच्या हानीचे आकडे पाहून गोअरिंग अधिकाधिक चवताळून हल्ल्यांची प्रखरता प्रतिदिनी वाढवीतच होता.

अॅडॉल्फ गॅलंड या जर्मन फायटर विमानदलाच्या अधिकाऱ्याने युद्धानंतर याची कबुली दिली, ती अशी—

" आर्. ए. एफ्. फायटर विमानांचे नियंत्रण व मार्गदर्शन भूमीवरून यंत्राने केले जात असावे, याचा अंदाज आम्हाला आला होता. कारण जमिनीवरून स्पिटफायर व हरिकेन विमानांना दिल्या जाणाऱ्या संदेशाज्ञा, आमच्या वैमानिकांनाही स्पष्ट ऐकू येत असत. आम्हाला या यंत्राचे अस्तित्व ही मोठीच धक्कादायक व कटु गोष्ट ठरली. "

यामुळेच १२ ऑगस्ट, १९४० ला गोअरिंग याने ब्रिटिश बंदरावरील हल्ल्यांचा जोर कमी करून ब्रिटिशांच्या राडार स्टेशन्सचा विनाश करण्याच्या दृष्टीने या संदेशांच्या अनुषंगाने जोरदार बॉम्बवृष्टी करण्याची आज्ञा सोडली. १२ तारखेला जो प्रचंड बॉम्बहल्ला या दृष्टीने करण्यात आला, त्यांत ब्रिटिशांची पाच राडारस्थाने नष्ट झाली व एक निकामी झाले ! परंतु राडारस्टेशनचे योग्य तेवढे महत्त्व लक्षात न आल्याने गोअरिंग याने राडारस्थानांचा संपूर्ण विध्वंस होण्यापूर्वीच या दिशेने होणारे हल्ले थांबवले ! याबाबत गोअरिंगने असे म्हटले आहे–

" राडारस्टेशनावरील हल्ले चालू ठेवण्यात काही स्वारस्य आहे, असे दिसत नाही. कारण ज्या ज्या राडारस्थानावरून आतापर्यंत हल्ला चढवला, तेथून अजूनही संदेश देण्याचे काम चालूच आहे. "

गोअरिंगचा याबाबतीत जो भ्रम झाला, त्याला कारण असे होते, की राडार

स्टेशनवरून फक्त जर्मन विमानांची दिशा समजत असे आणि या ज्ञानावरून ब्रिटिश फायटर विमानांना मार्गदर्शन देण्याचे व आज्ञा सोडण्याचे काम जे चालत असे, ते सेक्टर स्टेशनमधून ! ही सर्व सेक्टर स्थाने जमिनीखाली बांधण्यात आलेली होती. पाच-दहा राडार स्थाने नष्ट झाली तरी, फारसे बिघडत नसे; कारण राडार-यंत्रे असंख्य ठिकाणी बसवलेली होती. सेक्टर स्टेशने मात्र मोजकीच होती.

## महागात पडलेले विमानहल्ले

ब्रिटिश एअर मार्शल डाऊलिंग याने राडारयंत्राचा व स्टेक्टरस्टेशन्सचा मोठ्या कौशल्याने उपयोग चालवलेला होता.

संख्याबळात जर्मनी अत्यंत वरचढ असल्यामुळे, एकीकडे हूल दाखवून ब्रिटिश फायटर विमाने गुंतवावी व दुसरीकडेच जोराचा हल्ला करावा, हे तंत्र जर्मन वापरीत असे. यावर डाऊलिंग याने शोधून काढलेला उपाय साधा होता. ब्रिटनच्या दक्षिण भागात बॉम्बहल्ल्यांचा जोर अधिक होता. या ठिकाणी प्रतिकारात जखमी झालेल्या व दमलेल्या ब्रिटिश वैमानिकांना उत्तरेकडील भागात विश्रांतीसाठी पाठवण्यात येत असे. जर उत्तरेकडे थोडीफार हूल उठवून जर्मन विमानांनी ब्रिटिशांचा कात्रज करण्याचा घाट घातलाच, तर हे विश्रांतीसाठी गेलेले वैमानिक विश्रांतीसाठी ठेवलेल्या फायटर–विमानांनी त्यांचा समाचार घेऊ शकतील, अशी ही योजना होती.

अपेक्षेप्रमाणे १५ ऑगस्ट रोजी गोअरिंगने शंभर विमानांचा काफिला उत्तरेकडील भागात रवाना करून ८०० बॉम्बर्स, ११४९ फायटर विमानांचे संरक्षण देऊन दक्षिणेकडील भागावर रवाना केली. दक्षिणेकडील हा विमानहल्ला परतवणे ब्रिटिशांना शक्य नव्हते व काही विमाने लंडनपर्यंत पोचून त्यांनी लंडनवर अग्निवर्षाव केला. क्रॉयडोनजवळच्या चार विमान–कारखान्यांवर अचूक बॉम्बफेक करून जर्मन विमानांनी ब्रिटिशांना मोठाच धक्का दिला, परंतु या दिवशी जर्मनींची ७५ विमाने पाडण्यात आली व यासाठी ३४ ब्रिटिश विमानांची किंमत मोजावी लागली.

दक्षिणेकडे हा प्रचंड विध्वंस चालू असताना उत्तरेकडील हल्ल्यामुळे तिकडे गेलेली ब्रिटिश फायटर विमाने तिकडेच अडकून पडतील व आपल्याला मोकळे रान मिळेल, या हिशोबाने केलेला हा भीषण हल्ला मात्र हिशोब चुकल्याने जर्मनीला महागात पडला. उत्तरेकडे गेलेल्या शंभर जर्मन बॉम्बर्सचा मुकाबला करण्यासाठी दक्षिण भागातून एकही ब्रिटिश फायटर विमान धावले नाही...व दक्षिणेकडील हल्ल्यात जर्मनीची दुप्पट हानी करून गोअरिंगलाच ब्रिटिशांनी धक्का दिला. या उलट उत्तरेकडे विश्रांतीसाठी गेलेल्या ब्रिटिश वैमानिकांनी शंभर जर्मन विमानांपैकी ३० विमाने जमीनदोस्त केली व या बदल्यात फक्त दोन ब्रिटिश विमाने नादुरुस्त झाली.

या प्रमाणात जर्मन विमानांचा फडशा उडू लागला, तर जर्मनीला हे बॉम्ब-हल्ले परवडणार नाहीत, हे उघड होते. १७ ऑगस्टच्या विमानहल्ल्यांत जर्मनीने पुन: ७१ बॉम्बर्स गमावली व यासाठी ब्रिटिशांची हानी फक्त २७ विमानांचीच होती. हे सर्व आकडे युद्धानंतर पारखून घेतलेले आहेत. ब्रिटिश फायटर विमानांना राडारयंत्रे व सेक्टरस्टेशनच्या संदेशाची भरपूर मदत असल्यामुळे जर्मन हानीचे प्रमाण भरमसाट होत होते, तर ब्रिटिश विमानदल गनिमी काव्याने आपली हानी कमीत कमी करून घेत होते.

दि. १९ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट वाईट हवेमुळे जर्मन विमाने इंग्लंडवर जाऊ शकली नाहीत.

२४ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या १४ दिवसांत रोज एक हजाराहून अधिक जर्मन विमाने इंग्लंडवर बॉम्बवर्षावासाठी गोअरिंगने रवाना केली. त्यानेच त्यावेळी सांगितले होते–"इंग्लंडविरुद्धच्या हवाईयुद्धाचा हा सर्वांत महत्त्वाचा काळ आहे. शत्रूची सर्व फायटर विमाने नष्ट करणे व त्यांना आकाशातून हद्दपार करणे, हेच ध्येय आता आपल्या डोळ्यांसमोर आहे––"

––आणि खरोखरच या पंधरा दिवसांतील भीषण बॉम्बवर्षावात ब्रिटनची फायटर विमानांची चार उड्डाणस्थाने व सहा भूमिगत सेक्टर स्टेशने उद्ध्वस्त झाली होती. विमानांचा संदेश धाडण्याची सर्वच यंत्रणा खिळखिळी होऊन उद्ध्वस्तावस्थेत वाढ झालेली होती. या पंधरा दिवसांत ४६६ ब्रिटिश फायटर विमानांचा नाश झाला. शंभराहून अधिक ब्रिटिश वैमानिक मारले गेले व तितकेच जायबंदी झाले.

चर्चिल चिंताग्रस्त झाले होते. त्यांनी त्यावेळची मन:स्थिती सांगताना लिहिले आहे––

"The scales had tilted against fighter command... there was much anxiety––"

"आमच्या फायटर कमांडाविरुद्ध पारडे झुकले होते––आम्ही काळजीत पडलो होतो."

परंतु जे स्वत: उभे ठाकतात, त्यांना परमेश्वर मदत करतो हेच खरे! नेमकी याचवेळी जर्मनीच्या युद्धनेत्यांनी दुसऱ्या महायुद्धातील दुसरी मोठी चूक केली. २४ मे रोजी डंकर्कचा कबजा करू नका, असा हुकूम सोडण्यात हिटरलने जी चूक केली, त्यापेक्षा गोअरिंगची या वेळची चूक अधिक भयंकर होती.

## रक्ताचा बदला रक्ताने घेतला

इंग्लंडचा हवेतील प्रतिकार जवळजवळ कोसळलेला होता. अधिक एक आठवडा याच पद्धतीने त्याने इंग्लंड भाजून काढले असते, तर जर्मन छत्रीधारी

सैनिकांना इंग्लंडमध्ये मन मानल तिथे उतरता यावे, अशी परिस्थिती निर्माण होत होती; पण यावेळी तोपर्यंत झालेल्या हानीचे आकडे पाहून गोअरिंगने इंग्लंडवर दिवसा कोसळणारे हे अग्निदिव्य स्थगित करून, लंडनवर फक्त रात्री बॉम्बवर्षाव करण्याचा निर्णय घेतला!!

जर्मनगोटात असे काय घडले, की ज्यामुळे कात्रीत सापडलेले ब्रिटिश राष्ट्र यावेळी निसटू शकले? याची हकीकत मोठी बोधप्रद आहे. ज्यांना अहिंसेच्या वांझोट्या कल्पनांपेक्षा देशाचे भले अधिक व्हावे, अशी इच्छा असेल, त्यांना त्यापासून बरेच काही शिकता येईल. त्याचे असे झाले, की २३ ऑगस्टला लंडनच्या उपनगरांतील विमान-कारखान्यांवर बॉम्बवर्षाव करावयास गेलेल्या जर्मन विमानांनी चुकीने लंडनच्या मध्यभागावरच बॉंबफेक करून, अनेक घरें उद्ध्वस्त करून, बरेच ब्रिटिश नागरिक– बायका-मुले मारली. ही गोष्ट वस्तुत: चुकीने घडली होती. कारण नागरिकांवर बॉंबहल्ले करा, असा निर्णय तोपर्यंत गोअरिंगने घेतलेला नव्हता. तरीही होणारी गोष्ट घडून गेली होती. ब्रिटिश बायकामुलांचे प्राण घेतले गेले होते.

आता एअर मार्शल डाऊलिंगपुढे प्रश्न होता, की याचा बदला घ्यायचा, की एखाद्या आंतरराष्ट्रीय न्यायकोर्टात हे प्रकरण प्रविष्ट करून दाद मागायची? क्षणाचा विलंब न लावता चर्चिल–डाऊलिंग यांनी निर्णय घेतला, की निरपराध अशा लंडनमधील प्रजाजनांच्या रक्ताचा बदला एकच–बर्लिनवर बॉम्बफेक आणि निरपराध जर्मन प्रजाजनांचे रक्त!! नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही, हा अनुभव व्यवहारात नेहमीच खरा ठरतो. हा रोख व्यवहार जे पत्करतात, तेच आपल्या देशात कमीतकमी रक्तपात घडवतात. उलट हा व्यवहार सोडून जे 'निर्बुद्ध' वागतात, त्यांच्या राजकारणापायी देशाची अधिकच वाताहात होऊन रक्ताचे पाट दुथडी वाहतात. यावेळी काय घडले पाहा.

लंडनवरील बॉम्बहल्ल्यात मृत्यू पावलेल्या ब्रिटिश प्रजाजनांची दफने होण्या-पूर्वी म्हणजे २४ ऑगस्टलाच पहाटेचे काळोखात ८१ ब्रिटिश विमानांनी खाडी ओलांडून बर्लिनचा रस्ता धरला. यांपैकी फक्त निम्मीच विमाने बर्लिनपर्यंत पोहोचू शकली व वाईट हवेमुळे बाकीची परत फिरली. परंतु जी बर्लिनपर्यंत पोचली, त्यांनी बर्लिनवर बॉम्ब टाकलेच!

शिरर त्यावेळी बर्लिनमध्ये होता. त्याने लिहिले आहे––

"बर्लिनवर बॉम्ब! अहो हे कसे घडले? बर्लिनवासी दिङमूढ झाले. युद्धाच्या सुरवातीलाच गोअरिंगने आश्वासन दिले होते, की बर्लिनला कोणी धक्का लावू शकणार नाही. त्यांची मन:स्थिती त्यावेळी त्यांच्या चेहेऱ्यावरच पाहावयास हवी होती––!"

आश्चर्य म्हणजे या पहिल्या हल्ल्यातील एकही ब्रिटिश विमान जर्मनांना

पाडता आले नाही. दि २८–२९ ऑगस्टला आता धीर चेपलेली ब्रिटिश बॉंबर्स पुन: बर्लिनवर आली आणि या खेपेस मात्र तिसऱ्या राईशच्या राजधानीतच त्यांनी काही जर्मन नागरिकांचा बळीही घेतला. रक्ताचा बदला रक्ताने घेण्यात आला. निरपराध रक्तासाठी निरपराध रक्तच द्यावे लागले !

## अजून ‘ तो ’ का येत नाही ?

बर्लिनमधील नागरिक ब्रिटिशांनी मारले, ते लंडनवरील चुकीने झालेल्या हल्ल्याचा सूड म्हणून, ही गोष्ट त्यावेळी गोअरिंग किंवा गोबेल्स यांना कळण्यास मार्ग नव्हता. त्यामुळे बर्लिनवरील बॉम्बहल्ले होताच, गोबेल्स याने वृत्तपत्रांतून नि:शस्त्र जर्मन स्त्री-मुलांवरील ब्रिटनच्या या अमानुष बॉम्बफेकीविरुद्ध आरडाओरड मांडली.

परंतु सतत आठवडाभराच्या या ब्रिटिश बॉम्बफेकीचा मुख्य परिणाम हा झाला, की लढाईत होणाऱ्या जखमांपासून व विव्हळण्यापासून आपण सुरक्षित आहोत, ही बर्लिनवासी जर्मनांची कल्पना धुळीला मिळाली. युद्धापासून आपण फारसे लांब नाही, ही भीती त्यांच्याही मनात घर करून बसली.

एक सप्टेंबरला युद्धाचा पहिला वर्षदिन होता. या दिवशी वस्तुत: हिटलरचे भाषण असावयाचे, परंतु बॉम्बहल्ल्याच्या भीतीने हे भाषण ४ सप्टेंबरला ठरवण्यात आले होते. एक सप्टेंबरला बर्लिनवर ब्रिटिश विमाने निश्चितच येणार, असा जर्मनीचा कयास होता.

चार सप्टेंबर रोजी स्पोर्टपॅलास्ट स्टेडियमवर सायंकाळी झालेल्या या हिटलरच्या भाषणाला शिरर हजर होता. त्याने लिहिले आहे—

“ आज–नाझी सर्वाधिकाऱ्याचा ‘ मूड ’ वेगळाच होता. उपहासगर्भित विनोदाचे हिटलरला वावडे असले, तरी आज मात्र तो उपहासगर्भित पद्धतीने बोलत होता—”

आपल्या भाषणात हिटलर म्हणाला—

“ इंग्लंडमध्ये मोठे कुतूहल पसरले आहे. इंग्लिश लोक विचारीत असतात– ‘ अजून तो का येत नाही……शांत राहा ! शांत राहा ! तो येणार आहे ! …… तो निश्चित येणार आहे ! ! ” (हशा–टाळ्या)

“ आता चर्चिलसाहेबांनी आपल्या मेंदूतून एक नवे बाळ जन्माला घातले आहे. बर्लिनवर रात्री होणारे बॉम्बहल्ले हे खास चर्चिल यांच्या मेंदूतून निघालेले अपत्य आहे. ब्रिटिश विमाने रात्रीच का येतात ? ते अधिक परिणामकारक असते म्हणून ? छे, छे ! अहो, दिवसा बर्लिनवर येण्याची त्यांची प्राज्ञाच नाही !……जर्मन विमाने मात्र रोज दिवसाढवळ्या इंग्लंडवर वावरत असतात. गेले दोन–तीन महिने मी या बाबतीत काही बोललो नव्हतो. मला वाटलं, ब्रिटिशांचा हा वेडेपणा ते बंद करतील, पण मी बोलत नाही, याचा अर्थ आम्ही घाबरलो आहोत, असा त्यांनी

समजू नये. त्यांच्या या रात्रीच्या हल्ल्यांना आता आम्हीही तशाच हल्ल्यांनी उत्तर देणार आहोत. जर ब्रिटिश हवाईदल आमच्यावर एका रात्रीत दोनतीन किंवा चार हजार किलोग्रॅम बॉम्ब्स टाकू शकत असेल, तर एकाच रात्री आम्ही १५० ते ४०० हजार किलोग्रॅम बॉम्ब टाकू शकतो......" (प्रचंड टाळ्या.)

"ते जर सांगत असतील, की आमची शहरे ते बेचिराख करणार आहेत, तर त्यांची शहरेही बेचिराख केल्याशिवाय आम्ही सोडणार नाही. एक वेळ मग अशी येईल, की आमच्यापैकी कुणीतरी एक गर्भगळीत होईल ! मी एवढंच सांगतो, की ही पाळी नॅशनल सोशॅलिस्ट जर्मनीवर येणार नाही !" (प्रदीर्घ टाळ्या.)

झाले, या नादापायी गोअरिंग याने ब्रिटनवरील दिवसाचे हल्ले बंद करून लंडनवर रात्री भयंकर प्रमाणावर बॉम्बहल्ले करण्याचा निर्णय पक्का केला.

## सात सप्टेंबरची काळरात्र

या निर्णयानुसार ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६२५ बॉम्बर्स व ६४८ फायटर विमानांचा प्रचंड तांडा लंडनवर रवाना करण्यात आला. त्या दिवशी शनिवार होता. सायंकाळी ५ वाजता ३२० बॉम्बर्स व संरक्षणासाठी ३२० फायटर विमाने अशी जर्मन विमानांची पहिली लाट थेम्स नदी ओलांडून लंडनवर रोरावू लागली. वूलविच् येथील दारूगोळ्याचे कारखाने, गॅस फॅक्टरी, पॉवर स्टेशन्स, डेपो व डॉक विभागावर बॉम्बवर्षाव सुरू झाला. लंडन शहराभोवती आगीचे कडे पडले. तीन तास हा मारा चालू होता. काळोख पडला. रात्री आठ वाजून दहा मिनिटांनी २५० बॉम्बर्स विमानांची दुसरी लाट येऊन थडकली. त्यांनी पहिल्या विमानांना परतण्याची खूण केली. रविवारी पहाटे ४॥ वाजेपर्यंत जर्मन बॉम्बर्सच्या लाटांवर लाटा येत होत्या. सकाळ झाली. रविवारचा दिवस लंडन शहर रात्रीपासून घुमसणाऱ्या आगीशी झगडत होते. शेकडो माणसे मृत्युमुखी पडली होती; पडणाऱ्या घराखाली हजारो गाडली गेली होती. मृतांची व जखमींची मोजदाद सुरू झाली. रविवारचा सबंध दिवस अतिश्रमाने थकलेल्या लंडनवासियांना सायंकाळ तरी निद्रेची मिळाली काय ? सायंकाळी ७॥ वाजता दोनशे जर्मन बॉम्बर्सचा काफिला पुन: लंडनवर घिरट्या घालून बॉम्ब फेकू लागला. रविवारची सर्व रात्र—शनिवार रात्रीप्रमाणेच—बॉम्बहल्ला चालू होता.

या दोन दिवसांत ८४२ माणसे मारली गेली. २३४७ जखमी झाली. लंडननगरी चार-पाच दिवस जळत होती. गोअरिंगचे हे लंडनदहन दुसऱ्या महायुद्धातील अमानुषतेचे भयानक प्रकरण आहे. यावेळी लंडनमध्ये झालेल्या हाहाकाराची छायाचित्रे पाहाताना आजही आतड्यांना पीळ बसतो.

'लंडन भाजून काढू व इंग्लंडला शरण आणू', या महत्त्वाकांक्षेने पेटलेल्या गोअरिंगने १५ सप्टेंबर, १९४० ला लंडनवर पुन: भरदिवसा मोठा बॉम्बहल्ला



**London can take it ...**

आव्हान लंडनने स्वीकारले...

*

आयोजित केला.

ब्रिटिश खाडीपलीकडे होणारी विमानांची जमवाजमव राडारयंत्रावर चित्रित होत होती व ब्रिटिश फायटर विमाने यावेळी तयारीत होती. यावेळी जर्मनांनी तंत्र थोडे बदलले होते. फक्त २०० बॉम्बर्स व त्यांच्या संरक्षणासाठी ६०० फायटर विमाने पाठवण्यात आली होती. म्हणजे प्रत्येक एका बॉम्बरच्या रक्षणासाठी तीन फायटर विमाने. भर दुपारी ही विमाने इंग्लिश खाडीवर आली. त्यांची कल्पना

होती, की लंडनपर्यंत आपण निर्वेधपणे जाणार......परंतु या वेळी ब्रिटिश फायटर विमानांनी त्यांना खाडीवरच सामना देण्यास भाग पाडले. यावेळी झालेल्या हवाई युद्धात ३४ जर्मन बॉम्बर्स पाडण्यात आली व ब्रिटनने २६ विमाने गमावली. काही जर्मन विमाने लंडनपर्यंत पोचून त्यांनी बॉम्बवर्षाव केला, परंतु त्यांना येताना ब्रिटिश विमानांनी हटकले.

या हवाई-लढाईत जर्मनीची जी हानी झाली, त्यावरून लुफ्तवाफ्ने एक धडा घेतला, की भर दिवसा इंग्लंडवर होणाऱ्या हवाईयुद्धात जर्मनीची हानीच अधिकाधिक होणार आणि याला कारण इंग्लंडच्या फायटर कमांडजवळ असलेली राडारयंत्रणा !

मागे सांगितल्याप्रमाणे जर्मन विमानहल्ल्याने ब्रिटनची वाहतूकयंत्रणा कोसळताच स्वारीचा निर्णय घेण्यात येईल, असे हिटलरने ठरवले होते. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत लुफ्तवाफ्ला ब्रिटिश फायटर विमानांचा विध्वंस करणे न साधल्यामुळे हिटलरने इंग्लंडवरील स्वारीचा बेत आता बेमुदत पुढे ढकलला......

## लंडन आता भीत नाही

इंग्लंड वाचले. वाटेल ती किंमत देऊन ब्रिटनवर स्वारी करण्याचे साहस करण्यास सर्व अनुकूलता असताना, हिटलरचा विचार निश्चित होईना. कारण ब्रिटिश खाडीत ब्रिटिश आरमाराशी झुंज घेण्याची ताकद, नार्वेच्या लढाईत बरीच नुकसानी सोसलेल्या जर्मन नाविकदलापाशी नव्हती व हवाईयुद्धात राडार-यंत्रणेच्या शोधापुढे ब्रिटिश फायटर विमानांचा संपूर्ण नाश करणे गोअरिंगला साधत नव्हते.

७ सप्टेंबर ते ३ नोव्हेंबरपर्यंत सतत ५६-५७ रात्री रोज सर्वसाधारणपणे दोनशे बॉम्बर्सनी इंग्लंडच्या शहरांवर बॉम्बसत्र चालूच ठेवले, पण स्वारीचा धोका टाळण्यात यश मिळाल्यामुळे प्रस्फुरीत झालेले ब्रिटिश राष्ट्र आता वाढत्या निर्धाराने विमानांच्या उत्पादनात नवे नवे उच्चांक प्रस्थापित करू लागले. वर्षाला जवळजवळ १०,००० विमाने इंग्लंडचे कारखाने तयार करू लागण्याच्या स्थितीत आलेली होती. अमेरिकेहून शस्त्रास्त्रांची व अन्नधान्याची विपुल आयात सुरू झाली होती. चर्चिल आता आत्मविश्वासाने सांगत होते—

**'London can take it...!'**

—'येऊ द्यात—आणखी जर्मन विमाने येऊ द्यात—लंडन आता भीत नाही!' ज्यावेळी हजारो विमाने येत होती, तेव्हाही चर्चिल यांनी इंग्लंडच्या जनतेला त्यांच्या हालअपेष्टांचे ऐतिहासिक महत्त्व विषद करताना सांगितले होते—

"Never in the field of human conflict was so much owed by so many to so few..."

निष्पाप जीव ! निरपराध रक्त..



*

[ मानवी संघर्षाच्या इतिहासात इतक्या थोड्या माणसांना असंख्य माणसांवर एवढे मोठे ऋण रचण्याची संधी मिळालेली नाही. ]

जर्मनीच्या युद्धनेत्यांचा सारा संताप आणि आकाशातून पडणारी आग ब्रिटिश जनतेने या काळात सहन केली, ती केवळ दोन गोष्टींच्या जिवावर. रणमैदानात राडार–यंत्रणा आणि मनात चर्चिल–मंत्रणा ! चर्चिल यांचे यावेळेचे नेतृत्व सगळा चमत्कार घडवीत होते. सर्व धोके पत्करून चर्चिल उद्ध्वस्त नगरांतून फिरत होते. उद्ध्वस्त घरे आणि प्रेतांचे दर्शन पाहून सामान्य माणसांबरोबर त्यांचे डोळेही अश्रूंनी भरून येत होते. केव्हा हे पाहात असताना—‘ अरे, या साऱ्याला मीच तर कारण नाही ना ?’ या प्रासंगिक विचाराने त्यांची मनःस्थिती चमत्कारिक होत



मीच तर याला कारण नाही न ? – चर्चिल

*

होती......परंतु या त्यांच्या करुणेला भ्याडांच्या रडण्याभेकण्याचे स्वरूप कधीच येऊ शकले नाही किंवा शरणागतीचा विचारही त्यांच्या मनाला कधी शिवला नाही. जे व्रत त्यांनी उघडया डोळयांनी स्वीकारले होते, ते पार पाडीत असताना कोसळलेल्या संकटाकडे तुच्छतेने पाहायला ते देशबांधवांना शिकवीत होते.

स्वतः चर्चिल हे या काळात सप्टेंबरच्या मध्यापर्यंत १०, डाऊनिंग स्ट्रीट येथेच

राहात असत. येथील घरे फारशी चांगली व मजबूत नव्हती. चर्चिल सांगतात--

## आतला आवाज

"व्हाईटहॉलभोवतालच्या सरकारी इमारतींवर पुनःपुन्हा हल्ले होत होते. डाऊनिंग स्ट्रीट विभागात असलेल्या सर्व इमारती या दोनशे-अडीचशे वर्षांपूर्वी बांधलेल्या जुन्या डुगडुगत्या इमारती होत्या. ज्या कंत्राटदारांची नावे त्या इमारतींवर लिहिलेली होती, त्यांनी पैसे खाऊन इमारतीचे बांधकाम मुळात चांगले केलेले नव्हते. या ठिकाणापासून माझी कचेरी जवळच्या दगडी इमारतीत हलवण्याचे ठरले व या नव्या इमारतीत मी राहावयास आलो."

"१७ ऑक्टोबरची सायंकाळ मी कधीही विसरणार नाही. आम्ही सर्व दहा नंबरच्या खोलीत जेवावयास बसलो असतानाच रात्रीचा विमानहल्ला सुरू झाला. रस्त्याकडील शटर्स लावलेले होते. आमच्या इमारतीपासून मोठाले स्फोट होत असतानाच आमच्या कानांवर त्याचे आवाज आदळत होते. एकदम मला आठवण झाली, की दहा डाऊनिंग स्ट्रीट या माझ्या निवासाच्या स्वैपाकघराची खिडकी पंचवीस फुटी तावदानाची होती. अजून आमचा स्वैपाक तिथेच तयार होत असे व या क्षणीही स्वैपाकघरात मिसेस् लॅंडेमेअर या बाई आमचा स्वैपाक करीत होत्या. ही स्वैपाकीण व तिच्या दिमतीला असलेली मोलकरीण अशी दोघेच तिथे होती. मला एकदम काय स्फूर्ती झाली कोणास ठाऊक, मी तसाच उठलो व आमच्या दगडी इमारतीला लागून असलेल्या स्वैपाकघरात जाऊन बटलरला तेथील स्वैपाकीणबाई व तिच्या मदतनीस मोलकरणीस तावडतोब भूमिगत आसऱ्यामध्ये निघून जाण्यास मी सांगितले. पुनः येऊन मी टेबलाशी बसलो मात्र आणि दोन-तीन मिनिटांत आमचे घर हादरले. माझा डिटेक्टिव्ह रक्षक धावत आत आला व त्याने स्वैपाकघर उद्ध्वस्त झाल्याचे सांगितले. सुदैवाने मला दैवी आवाजाने जणू पूर्वइशारा दिला व माझ्या नोकरांचे प्राण मी वाचवू शकलो--परंतु माझ्या निवासाभोवती पहाऱ्यावर असलेले रात्रपाळीचे दोघे होमगार्ड्स या बॉम्बवर्षावात मारले गेलेच."

या अनुभवापेक्षाही अधिक मोलाचे क्षण चर्चिल यांनी टिपलेले आहेत. एकदा चर्चिल हे रॅमसगेट विभागात हानीची पाहणी करीत असतानाच बॉम्बहल्ला सुरू झाला. चर्चिल सांगतात---

"मला तावडतोब एकदम मोठ्या बोगद्यात नेण्यात आले. या बोगद्यात असंख्य माणसे कायमचीच राहात होती...कारण त्यांची घरेदारे बॉम्बवर्षावात नष्ट झाली होती. १५ मिनिटे आत राहून मी पुनः बाहेर आलो, कारण तोपर्यंत हल्लेखोर विमाने निघून गेली होती. बाहेर येऊन आम्ही पाहिले, तो ढिगारे जळत होते. एका लहानशा उपाहारगृहावर बॉम्ब पडला होता व त्या जागेवर काचेचे सामान, भांडीकुंडी व मोडलेल्या लाकडी सामानाचा ढीग आता दिसत होता. उपाहारगृहाचा

मालक, त्याची पत्नी व गडी-माणसे सर्व रडत होती. आता यांना घर कुठले ? आता ही माणसे उपजीविका कशावर करणार ? अधिकार माझ्यापाशी होता ! परत जाताना गाडीमध्ये मी आमचे चॅन्सेलर ऑफ दि एक्स्चेकर किंग्सले वूड यांना पत्र लिहून घेतलं. या पत्रात मी तत्त्ववजा एक आज्ञा लिहिली होती, की शत्रूच्या हल्ल्यामुळे झालेले लोकांचे सर्व नुकसान हे राष्ट्राचे नुकसान समजून त्याची नुकसान-भरपाई करण्यात यावी. ही नुकसानभरपाई पूर्णपणे त्या व्यक्तींना ताबडतोब देण्यात यावी. माझ्या या पत्राने किंग्सले वूड थोडेसे चकित झाले. परंतु मी आग्रहच धरला. कारण माझ्या मते या बॉम्बहल्ल्यात होणारे व्यक्तीचे नुकसान हा साऱ्या राष्ट्राचाच बोजा समजला गेला पाहिजे—"

## हिटलरने मोर्चा फिरवला

जर्मन विमानहल्ल्यांना निर्धारपूर्वक तोंड देणाऱ्या ब्रिटिश जनतेचे मानसिक धैर्य टिकवण्याचा मोठा वाटा चर्चिल यांचेकडे निर्विवादपणे जातो. त्यांच्या खंबीर नेतृत्वामुळेच ब्रिटिश राष्ट्र जीवावरच्या संकटातून वाचले. अर्थात यदाकदाचित ब्रिटनवर जर्मन सैन्य उतरलेच असते, तर काय घडले असते, याचेही चित्र चर्चिल यांच्या डोळ्यांपुढे सुस्पष्ट होते व आपल्या भाषणांतून हे चित्र ते स्पष्टपणे त्याकाळी मांडत होते. जर जर्मन सैन्याने ब्रिटिश किनाऱ्यावर पाऊल ठेवलेच असते, तर काय झाले असते, ते चर्चिल सांगतात—

"The massacre would have been on both sides grim and great. There would have neither been mercy nor quarter. We were prepared to go all lengths. I intended to use the slogan –'you can always take one with you'– "

[दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर भीषण रक्तपात झाला असता. कोणीच कुणाला दयामाया दाखविली नसती किंवा करुणेचा उद्भव झाला नसता. आम्ही वाटेल त्या दिव्यातून जायला सिद्धच होतो. मी ही एकच घोषणा जनतेला देणार होतो—'निदान एका तरी शत्रूसैनिकाला यमसदनाला पाठवून मगच देह ठेवणे प्रत्येकाला शक्य आहे.']

अशा या दैदिप्यमान नेतृत्वापुढे आणि मारता मारता राज्य घेण्यासाठी उठलेल्या ब्रिटिश राष्ट्रावर स्वारी करण्याचा विचार, अवघा युरोप पादाक्रांत केलेल्या हिटलरला अखेर सोडून द्यावा लागला, यात आश्चर्य ते काय ?

परंतु ब्रिटनच्या स्वारीचा विचार सोडून द्यावा लागत आहे, याचे शल्य हिटलरच्या मनाला फारसे यावेळी डाचू शकले नाही. कारण तत्पूर्वीच त्याने आपले लक्ष पूर्वेकडे वळवले होते. रशियाचा हिशोब प्रथम चुकता करावा, अशा निर्णयावर हिटलर आला होता. ●

अपूर्ण

# रंगायनचे ' यशोदा '

## : १ :

## ' रंग ' ही नाही आणि ' गायन ' वर्ज्य !

हल्ली नाटक पाहणाऱ्या प्रेक्षकांचे दोन वर्ग मानण्याची प्रथा आहे. जाणकार आणि सामान्य ! हा जाणकार जाणकार म्हणून जो म्हणतात, तो बहुतेक फुकट पासात बसलेला असतो, म्हणून त्याला ' जाणता ' म्हणायचे; तर माझे म्हणणे इतकेच, की असे वर्ग पाडू नयेत. ज्याला नाटक पाहावे असे वाटते, तो जाणकार समजावा व अशा बऱ्याच जाणकार लोकांना नाटक आवडले नाही, की ते ' पडले ' असे समजावे.

' यशोदा ' अनेकांना नव्हे, जवळजवळ सर्वच लोकांना आवडले नाही, त्याअर्थी ते ' पडले ' यात शंका नाही. परंतु पडणाऱ्या वस्तूवस्तूत फरक आहे.

आकाशातून वीज पडते आणि कधी कधी कावळाही मरून पडतो. वीज पडते, तेव्हा माणसे स्तिमित होतात. पाहणारे ज्याला त्याला सांगतात, ' अहो, वीज पडली. ' मुद्दा आहे तो पडणे म्हणजे काय, हे कसे वेगवेगळे असू शकते एवढेच सांगण्याचा. ' यशोदा ' कसे पडले हे सांगायचे तर, ' कावळा मरावा ' तसे पडले नाही, पण ' हळहळ करावी ' असेही पडले नाही.

आमचे एक काका आहेत. त्यांना तालमीचा भारी नाद. लहानपणी आम्ही ' अग्निकंकण ' किंवा ' अमृतमंथन ' ला निघालो, की म्हणायचे, " सिनेमा काय पाहता. सर्कस पहा ! ती ताराबाई केसाने दगड उचलते. हा ऽ ऽ एवढा. वाघाच्या तोंडात मान, छातीवरून हत्ती जातो, तरी पण माणूस मरत नाही. असे काही पाहा. "

आमचे ते वय सर्कस पाहण्याचे होते, एवढा एकच मुद्दा काकांच्या जमेस धरला, तरी सिनेमा व सर्कस यात फरक आहे, हे काकांनी कधी मानलेच नाही. दोन्ही पाहायचीच ना ? मग सर्कसच पहावी, असे त्यांचे म्हणणे असे. सर्कस पाहताना मनोमन आपण हे मान्य करतो, की आता यातली माणसे जे काही करून दाखवतील, ते आपल्याला न जमणारे आहे– आणि एकदा आपण त्यातून असे अलिप्त होऊ शकलो, की मग त्या पाहण्यात तोंडात बोट घालण्याचेही आपण विसरतो. लहान मुलांना ही अलिप्तता साधत नाही आणि ती टाळ्या वाजवतात, आश्चर्योद्गार



यशोदा आणि ताई

कढतात. मोठी माणसे मख्खपणे आसपासच्या मुलांना म्हणतात, 'गोपू, पाहिलंस का? तो खरा वाघ आहे, तरी तो माणूस त्याच्याजवळ जायला भीत नाही?"

## हे नाटक लिहाच......

'यशोदा' पाहताना प्रेक्षकांची अवस्था सर्कस पाहणाऱ्या प्रौढ माणसासारखी होते. विजया खोटे, मामा पेंडसे, श्रीराम लागू यांसारखी नाणावलेली 'नट'-मंडळी अचाट अभिनय करू शकतात, हे मुळी गृहीतच होते. विजया खोटे यांच्या दिग्दर्शनामुळे आशा कामेरकर (यशोदा), बाबू (अरुण आपटे), अक्का (कुमुद लेले) यांनीही तोडीस तोड कामे केली. नाटक संपले. जुन्या नाटकांपैकी संगीत नाटके पाहून प्रेक्षक बरोबर 'गायन' घेऊन जात असे. पुढचा आठवडा गळा नसला, तरी स्वतःशीच ती पदे गुणगुणत असे! या नाटकातून घरी नेण्यासारख एकच होते. अभिनय! परंतु 'खुर्च्या' पाहिल्या, तेव्हा घरी हेच नेलं, 'एक होती राणी' पाहिली, तेव्हा घरी हेच नेलं, 'कावळ्यांची शाळा' पाहिली, घरी हेच नेले. छे! छे! पुनःपुनः घरी तेच तेच नेण्याचा कंटाळा आला आहे. प्रेक्षकांनी घरी हेच न्यावं, असा रंगायनाचा आग्रह असल्यास आता त्यांनी निदान विजया खोटे व श्रीराम लागू यांना तरी 'नारळ' द्यावा. म्हणजे काय होईल? काही नवीन माणसे पाहिल्याचे तरी समाधान लाभेल. अर्थात ज्यांनी रंगायनची पूर्वीची नाटके पाहिली नसतील, त्यांनी हे नाटक विजया खोटे यांच्या अभिनय-दिग्दर्शनासाठी अवश्य अवश्य पाहावे.

'यशोदा' लिहिण्याच्या भरीस श्री. ना. पेंडसे यांना पाडण्यात आले. याला कारण एकच दिसते, की यातील सोवळ्या झालेल्या ताईची भूमिका हे एक विलक्षण आव्हान होते. हे स्वीकारण्याचा मोह रंगायनच्या चालकांना झाला असावा. 'यशोदा'चा विषय आज पकड घेऊ शकणार नाही, नाट्यमय प्रसंग उभे करण्याची ताकद श्री. ना. पेंडशांच्या ठिकाणी बेताचीच आहे, या गोष्टी रंगायनाच्या चालकांना समजत नव्हत्या, अशी सोयीस्कर गैरसमजूत करून घेण्याची निदान माझी तरी तयारी नाही. त्यामुळे श्री. ना. पेंडसे यांच्या नावाने ओरड करण्यास मी तयार नाही.

नाटके लिहून कंपन्यांच्या दारात ती घेऊन हिंडणारे पेंडसे नव्हेत. यामुळे पेंडशांच्या दारात, ' हे नाटक लिहाच, ' म्हणून ज्यांनी हट्ट धरला, त्यांनाच दोषी धरावे.

मला वाटते, एवढेच पुरे !

**रा. म. शास्त्री**

: २ :

## लेखक आणि प्रेक्षक यांतील संघर्ष

' मी जिकलो मी हरलो ' या नाटकानंतर रंगायनने सुबक, आकर्षक आणि मुख्य म्हणजे सर्वांना कळेल, असे काय दिले, असा खडा सवाल कोणी विचारला, तर याचे उत्तर देता येईल की नाही, कोण जाणे ! खरोखर गेल्या वर्षा दीड वर्षात रंगायनची झालेली पिछेहाट शोचनीय आहे. कावळ्यांची शाळा, खुर्च्या, एक होती राणी ही नाटके प्रेक्षकांना ' थोडी ' तरी समजली असतील, असे रंगायनचे हौशी नटवर्ग सांगू धजावतील काय ? सर्वसामान्य प्रेक्षकांच्याच नव्हे, तर जाणकारांच्या दृष्टीनेही रंगायनचे हे अपयश फार दु:खद आहे. आणि यातच भर पडली ती ' यशोदा ' या नव्या नाटकाने ! तितकेच रटाळ, तितकेच कंटाळवाणे आणि तितकेच कळण्यास अती कठीण !

या चार अंकी नाटकाचा प्रत्येक अंक जेमतेस अर्ध्या, फार तर पाऊण तासाचा आहे. त्यामुळे नाटक कधी सुरू झाले, अंक संपला कधी आणि अखेरीस नाटक संपले कधी, याचा पत्ताही लागत नाही, इतके ते थोटके आहे. नाटकाबद्दल परंपरागत कल्पनांना प्रथम तडा बसतो, मन नाराज बनते, ते यामुळे ! बरं, अशा या छोटे-खानी नाटकात (?) व्यवस्थित कथानकाची रचना तर सोडाच, पण व्यक्तिचित्र-णही पुरेसे केलेले नाही. सबंध नाटकभर यशोदा, ताई, अक्का आणि काका यांची परस्परांशी नाती काय आहेत, याचा पत्ता लागेल तर शपथ ? प्रेक्षक नाटकाच्या विषयाशी समरस होण्याऐवजी परस्पर नाती जोडण्यातच इतका गर्क होऊन जातो, की नाटक सुरू कधी झाले आणि संपले कधी, याचा त्याला पत्ता लागत नाही. तरीही तो तर्क करीतच राहातो. म्हणजे नाटकात (?) व्यवस्थित कथानक नाही, पुरेसे उठावदार व्यक्तिचित्रण नाही. आता नाट्यमय प्रसंग ! त्याबद्दल अशीच अवस्था ! ! अनेक ठिकाणी बहारदार नाट्यमय प्रसंग उभे करण्याची जागा असू-नही ते टाळले गेले आहेत, ह्याला काय म्हणायचे ? यशोदेच्या बदकर्माबद्दल साऱ्या गावात उठलेले काहूर (प्रेक्षक नुसतेच त्याबद्दल ऐकत असतात), हे खरोखरच कशाप्रकारचे आहे, किती तीव्र आहे, हे दाखवायला काय हरकत होती ? व यशोदेचा आणि साखरपेंडीच्या मुसाचा गैरसंबंध असल्याबद्दलची जी अफवा होती —ज्याबद्दल यशोदा नकार देत होती, पण त्याच बरोबर ज्या मुसाला गावाने

वाईट चालीचा ठरविला व जो यशोदेला सभ्य वाटत होता, त्याची व्यतिरेखा उभी करून नाटच साधता आले नसते का ? मूळच्या कादंबरीच्या अखेरीस असलेला काकाच्या मृत्यूचा प्रसंग टाळला गेला आहे, तो प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दाखवून नाटच निर्माण करणे कठीण होते ? याचप्रमाणे अण्णा हा काय प्रकारचा माणूस आहे, हे अधिक तीव्रतेने व्यक्त करायला काय अवघड होते ? अशा किंवा अन्य कोणत्याही नाटयमयप्रसंगाची पुसटसशी ओळखही या नाटकात झालेली नाही. ही तर गोष्ट खरीच, पण त्यापेक्षाही सर्वात महत्त्वाचा नाटयपूर्ण प्रसंग म्हणजे यशोदेचे विठोबाशी होणारे लग्न ! ही गोष्ट किती भयंकर होती, हे नाटकातून यत्किंचितही व्यक्त झालेले नाही आणि याला प्रमुख कारण एकच व ते म्हणजे विठोबा ही व्यक्तीच नीटपणे उभी करता आलेली नाही. एकंदरीत या लेखनात नाटयमय प्रसंग नाहीत, व्यक्तिचित्रण नाही, सुसूत्र व्यवस्थित कथानक नाही, मग त्याला नाटक म्हणायचे कशाला ?

### ● तीन उत्तम भूमिका

ठीक आहे, श्री. नां. सारखा मान्यवर लेखक, रंगायनसारखी मातबर संस्था याला नाटक म्हणते, आपणही म्हणू या ! पण नाटक म्हणजे केवळ लेखन नव्हे. त्यात प्रायोगिकता हाही भाग आलाच. त्याचाही विचार करायचा. यावेळी मात्र थोडेबहुत—फार नाही, पण थोडे नक्की— समाधान लाभते. नाराज मन आनंदी बनते. पैसे खर्च करून आलेल्या प्रेक्षकांना बरे वाटते, रंगायनचे हितचिंतकांची मान थोडीशी उंचावते. आणि याला कारण ठरली आहेत ती तीनच पात्रे. नवीन, पण त्यांच्या कामावर मनापासून खूष व्हावे अशी ! एक कुमुद लेले ( अक्का ), दुसरी यशोदा ( आशा कामेरकर ) आणि तिसरा बाबू ( अरुण आपटे ). यांतील अक्काचे पात्र दुय्यम महत्त्वाचे आणि बाबूचे तर अगदी सामान्य, पण या दोघाही कलाकारांनी अशा काही रुबाबात, अशा काही सहजतेने कामे केली, की त्यांच्या कामावर खूष न होणारा खरा रसिकच नव्हे ! बाबूचे काम एकाच प्रवेशात—फक्त ४।६ वाक्ये—पण स्मरणीय झाले, अस्सल कोकणी चंट मुलगा त्याने हावभावातून, बोलण्यातून सुरेख उभा केला. कुमुद लेले यांनी ठसकेबाज, काहीशी पुढेपुढे करणारी, पण तोंडाळ अक्का अशा काही मोकळेपणाने आणि चपलतेने सादर केली, की एके काळी हिंदी रंगभूमीवरील नाणावलेली ही अभिनेत्री मराठी रंगभूमीवर यापूर्वीच का आली नाही, याचेच वाईट वाटले ! इतके ते काम उत्कृष्ट वाटले. यशोदेच्या प्रमुख कामात आशा कामेरकरांनीही आपल्याकडून परिश्रमांची कसोशी केली आहे, हे पुरेपूर जाणविले. त्यांचे मुद्राभिनय यथायोग्य तर होतेच, पण त्यांना असलेली भूमिकेची समजही पुरेपूर व्यक्त झाली. चारही अंकांत त्या अगदी थोडके बोलल्या, पण न बोलताही साऱ्या प्रेक्षकवर्गाला खिळवून ठेवण्याचे, त्यांची सहानुभूती मिळविण्याचे कसब त्यांना उत्तम साधले. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन ! विजया

खोट यांचे धाडस जबर म्हणूनच त्यांनी विधवा ताईची भूमिका केली. मामा पेंडसे यांनी काकाची भूमिका सहजतेने केली, नेहमीच्या थाटात केली. विठोबा (अरुण काकडे) हे वास्तविक फार चांगले पात्र, पण अवघे काही क्षण रंगभूमीवर आले. त्याबद्दल काय लिहायचे? एकूण अभिनयाच्या दृष्टीने पाहता नाटक बरेच सावरले गले आहे.

आता नाटकाचे नेपथ्य! नाटक 'वास्तव', 'वास्तव' म्हणून ओरडून सांगायचे, पण नेपथ्य मात्र सूचक करायचे, हा कुठला न्याय? ही कुठली वास्तवता? निदान एवीतेवी श्रम करायचेच होते, तर व्यवस्थित एखाद्या कोकणी घराचा (या सूचक नेपथ्यातील घर कोकणी खास वाटत नव्हते.) सेट उभा करायचा. निदान इतर कशाला नसली, तरी त्याला तरी टाळी पडली असती. पण छे: तिथेही रंगायनने ठरविले होते–टाळी म्हणून घ्यायची नाही. घ्यायची तर शिवीच- ओवी कटाक्षाने टाळायची.

सुधीर दामले

## प्रेक्षकहो, आता उठा! नाटक संपले!!

पुण्यातील यशोदेचा पहिला प्रयोग होता. प्रेक्षागृह तुडुंब भरले होते अनेक जाणकार, मर्मज्ञ, रसिक बहुसंख्येने उपस्थित होते. पहिला अंक संपला दुसरा झाला, तिसरा संपला, चौथाही संपला. नाटक सुरू कधी झाले आणि ते संपले कधी, याचा कोणाला उलगडाच झाला नाही. कारण समोर जे पाहिले, त्याची संगती तर लागत नव्हतीच, पण मुख्य म्हणजे कळले नव्हते आणि म्हणूनच चौथ्या अंकानंतरही प्रेक्षागृहात लोक बसून होते. त्यांना वाटले, बघू या पुढच्या अंकात तरी काही समजेल; पण छे; पाचवा अंक सुरू होण्याऐवजी लाऊड-स्पीकरवरून त्यांना ऐकायला मिळाले, "प्रेक्षकहो, नाटक संपले आहे. आता घरी जा!"

## संघर्ष

नाटक संपून घरोघर निघालेल्या प्रेक्षकांत चर्चा चालू होती.

"काय हो? नाटकात नाट्य-संघर्ष वगैरे काहीच कसं काही!"

"वाऽ! असं कसं म्हणता. नाटकात फार मोठा संघर्ष होता. लक्षात नाही आला?"

"नाही बुवा, तो कोणता?"

"अहो, नाटक संपले किंवा नाही, याबद्दल लेखक आणि प्रेक्षक यात केवढा तरी संघर्ष नव्हता का?"



नालंदा चित्र

# तीन देवियाँ

## आनंदी आनंद आणि तीन गडे

एक 'गडे' : कल्पना

तीन पोरींचा आणि एका चोराचा हा सिनेमा आहे. अशी कोणती चोरी की जिला शिक्षा नाही ? दिल की चोरी ! बरोबर ओळखलंत. हे दिल वगैरे आहे, म्हणून हिंदी चित्रपट चालले आहेत. 'दिल देके देखो', 'फिर वही दिल लाया हूं', 'एक दिल सौ अफसाने', 'दिल अपना प्रीत परायी', 'दिल ही तो है', 'दिल तेरा दिवाना', 'दिल दिया दर्द लिया', या दिल्प्रकरणावर दिल्ली जोपर्यंत खूष आहे, तोपर्यंत डरो मत ! हा, तर काय सांगत होतो, या सिनेमात दिलकी नुसती 'चोरी' नाही, चोरबाजारच आहे. तीन 'टवळ्या' एकाच दिलावर धाड घालतात आणि एकच हिरो तीन दिलं चोरतो.

**–स्टोरी आयडिया–**

आता एकाच दुकलीने परस्परांचे दिल चोरले, मोहब्बत केली, तर ते तीन तास रंगवायला चित्रपटाला कथा वगैरे लागते, पण तीन देवियाँ एकदम मिळाल्या, तर तास तास वाटून घेतला की झाले ! स्टोरी करायची काय ? म्हणूनच या चित्रपटाचा कथालेखक असा कुणी नाही. श्रेयनामावलीत हा चित्रपट असू शकतो, हे ज्याच्या टाळक्यातून निघाले, त्याचा उल्लेख आहे, 'स्टोरी आयडिया–सदाशिव वह्राम !' सदुभाऊ-बेस्ट लक्...

ही स्टोरी आयडिया मोठी छान आहे. नंदा, कल्पना, सिमी या नावाच्या तीन मुली देव आनंदच्या प्रेमात पडतात. यातली नंदा नोकरी करते. कल्पना सिनेमा नटी आहे व सिमी नुसतीच श्रीमंत आहे. या तिघी एकसमयावच्छेदेकरून देव-आनंदच्या प्रेमात का पडतात ? तर हा देव आनंद कविता चांगल्या करतो म्हणून. कवी म्हणून त्याचा लौकिक असतो. लौकिकाचे राहू द्या, पण त्याचा कवितासंग्रह इतका खपतो, की त्याला पैशाची ददात म्हणून पडत नाही ! (या कवीचे नाव

करंदीकर, रेगे, बापट, पाडगावकर असे काही असते तर ?) या तिघी त्याच्या प्रेमात पडल्या खऱ्या, पण या तिघींशी एकसमया तर नाहीच, पण अंतराअंतरानेही लग्ने करणे कविरायांना शक्य होत नाही. (कारण द्विभार्या प्रतिबंधक कायदा आणि कवीचे नॉन मुस्लीमत्व) दुसरी एक स्टोरी आयडिया सुचली बघा. हा कवी शेख गब्दुल्ला वगैरे कुणी दाखवला असता, तर मग तीनच काय, चार देवियाँ आल्या तरी अडणार नाही. कॉंग्रेस सरकार झिंदाबाद ! निधर्मी राज्याचा विजय असो. तेव्हा कवीच्या पुढे अडचण आली, लग्न कुणाशी करावे ? मग तो जातो एका प्रो. अशोककडे. प्रो. अशोक म्हणजे काचेच्या गोळ्यावर सर्व गोळाबेरीज उत्तरे सांगणारे मुंबईचे द्रष्टे. काचेच्या गोळ्यावर तो कवी आपली लग्ने झालेली चक्क डोळ्यांनी पाहातो. जाहला सोहळा इस्टमन ! पहिले लग्न कल्पनाशी. सिनेमा नटीच ती. सकाळी शूटिंग आहे, म्हणून रात्री नवऱ्याला खोलीतून निघून जायला सांगते. नवरा सेटवर गेला, तर ' हिरो ' बुजतो, म्हणून पुन्हा नवऱ्यालाच ' गेट आऊट !' कॅन्सल. अशी बायको एकदम कॅन्सल. दुसरा नंबर सिमीचा. हनीमून काश्मिरात. हनीमूनहून आल्यावर अपेक्षेप्रमाणे सगळी काही लक्षणे दिसू लागतात, पण ही बायको म्हणजे, मला एवढ्यात ' आईच ' व्हायचे नाही. (' तुझ्यामुळे मी झाले आई, बाळा होऊ कशी उतराई ! ' हे प्रख्यात अपत्यगौरवगीत या बाईने ऐकले नसावे !) मूल नको म्हणणारी बायको मिळाली तर कसं व्हायचं ? नकोच ते. नंबर दोनदेखील कॅन्सल. आता तिसरीलासुद्धा काहीतरी ' आयडिया' काढून रद्द करता आली असती, परंतु हे काम मग नंदाने केलेच नसते !! पिक्चर चालले तर पाहिजे ! शेवटी उरलेलीशी जमवून टाकावे हे बरे. आयडिया खलास, पण पिक्चर हाऊसफुल्ल ! पात्रे अत्यंत वास्तव आहेत. कारण नंदा, कल्पना, सीमी, देव आनंद याच मंडळींनी याच नावाने कामे केली आहेत. यापेक्षा वास्तवता कसली ?

**—' काश्मीर टच् '—**

एखादा नातेवाईक लवकरच आटोपणार असे वाटू लागले, तर सर्व नातेवाईक


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्त मंदिराशेजारी,
**मंडई रस्ता, पुणे २.**

घाईघाईने, पण आठवणीने त्याला भेटून जातात. हिंदी सिनमावाल्यांनी 'काश्मीर' बावत असेच काहीतरी चालवले आहे, अशी अभद्र शंका येते. प्रत्येक हिंदी सिनेमात आपले काश्मीरचे शॉट्स् आहेतच ! तो बर्फ, ते शिकारे, मुशायरे ! शिवाय फोक डान्स-लोकनृत्य ! नुसते नृत्य म्हटले, तर ते पाहवते तरी, परंतु लोकनृत्य म्हटले की नीट नाचायचेही बंधन नाही. हे सर्व काही या सिनेमात आहे.

मुख्य म्हणजे छायाचित्रण स्पष्ट आणि कल्पक आहे. दृश्ये इतक्या झपाट्याने बदलतात, की कंटाळा असा येत नाही. मजरुह सुलतानपुरी या हकिमाचा काव्य-ताईत बांधल्यामुळे बर्मन यांनी या तिन्ही देवी 'सुकंठी' केलेल्या आहेत.

सेन्सॉरला टांग मारून दिग्दर्शक कमलजीत यांनी देव आनंद यांची 'त्रिस्थळी यात्रा' चतुराईने चित्रित केली आहे.

मोहब्बतचे पीकपाणी दरवर्षी वाढते आहे. अनेकांची यावर गुजराण होत आहे. आमची सूचना आता एवढीच आहे, की 'फक्त प्रौढांसाठी' असलेल्या अशा चित्रपटानंतर राष्ट्रगीत वाजवायला तरी बंदी असावी. तीन तीन देवियाँचा घुमाकूळ पाहून लगेच 'जन गण मन' करावयाचे म्हणजे कसे अगदी गुदमरायला होते !

—महेश

## चित्रपट शौकिन

१९६३ साली जगात निर्माण झालेल्या चित्रपटांबद्दलचा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, १९६३ साली जपानमध्ये सर्वांत जास्त म्हणजे ६५७ चित्रपट निर्माण झाले, तर भारतात ३१९ चित्रपट तयार झाले. अमेरिकन संख्याशास्त्र विभागास १६० देशांनी सादर केलेल्या माहितीवरून हा अहवाल तयार करण्यात आला आहे.

सिनेमाला जाणाऱ्यांची संख्या आपल्या देशात जास्त आहे, अशी आपण चिंता करत असतो, परंतु या बाबतीत चीनने आघाडी मारली आहे, सिनेमाला जाणाऱ्यांची संख्या जगात सर्वांत जास्त चीनमध्ये आहे, परंतु एकच व्यक्ती जास्त चित्रपट पाहण्याचे प्रमाण रशियात व अमेरिकेत जास्त आहे.

१९६० साली चीनमध्ये सिनेमाला जाणाऱ्यांची संख्या नुकतीच उपलब्ध झाली आहे. ही संख्या चार बिलियन (महापद्म) इतकी आहे. १९६३ साली रशियात सिनेमाला जाणाऱ्यांची संख्या ३८,४९,०००,००० इतकी होती, तर याच वर्षी अमेरिकेतील सिनेमाला जाणाऱ्यांची संख्या २,१७८,८००,००० इतकी होती. इतर आकडेवारी पुढीलप्रमाणे——

भारत १,४००,०००,०००

इटली ७४·४ कोटी

जपान ५११,१२१,०००

# भिंतीच्या तुंबडया

**● घोडयांचे भारतनाटयम्**

शाळेत इतिहास शिकत असताना पानिपतच्या पराभवाची कारणे तोंडपाठ असायची. साधारणपणे कुठल्याही लढाईत कुणाचाही पराभव व्हायला ही कारणे पुरतात, अशी माझी आतापर्यंत सोयीस्कर समजूत होती, पण नुकतेच एक थक्क करणारे कोरेकरकरीत कारण म्हणून काढण्यात आलेले आहे. सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी दक्षिण इटलीत वसलेले सायबेरीस नावाचे एक ग्रीक शहर उत्खननशास्त्रज्ञांना जमिनीच्या पोटात सापडले आहे. इ. स. पूर्व ५१० साली शेजारच्या क्रोटोन शहरच्या सैन्याने सायबेरीसवर हल्ला करून त्याचा पाडाव केला व ते नष्ट केले. या शहराचे पतन का झाले ? लोक लढवय्ये नव्हते का ? होते, पण त्यांनी शांततेच्या फावल्या वेळात एक नसता उद्योग करून ठेवला होता व तो म्हणजे आपल्या घोडयांना बासरीच्या तालावर नाचायला शिकविले होते ! लढाईच्या वेळी सायबेरीसच्या घोडेस्वारांनी प्रतिहल्ला केला, तेव्हा क्रोटोनच्या सैनिकांनी काय केले ? त्यांनी बासऱ्या वाजवल्या अन् सायबेरीसचे घोडे लढायच्या ऐवजी नाचू लागले! ! ! हे घोडयांचे भारतनाटयम् संपेपर्यंत क्रोटोनच्या सैन्याने शहर सर केले होते. आता बोला ! हिंदुस्थानात कागदी घोडे नाचविण्याची कला ओळखीची आहे, नव्हे, सरकारदरबारी कुशल कागदी घोडेस्वारांची वरीच पागा आहे, पण हाडामासाच्या घोडयांना नाचायला लावायची कल्पना अजब, यात शंका नाही. बरं, पण मी म्हणतो, घोडयांना नाचायलाच शिकवायचे, तर ते इतके चांगले शिकवायचे, की त्यांनी नमन करून पहिली गिरकी घेतल्याबरोबरच क्रोटोनच्या सैन्याने देहभान हरपून आणि जागच्या जागी खिळून सगळा प्रोग्राम पाहावा अन् तेवढया अवधीत सायबेरीसच्या पायदळाने (साध्या) घोडयाप्रमाण धावत जाऊन शत्रूची दाणादाण उडवायची.

या अचाट कल्पनेचा हिंदुस्थानात काय उपयोग करता येईल ? ६२ साली आपले नेफा झाल्यापासून "इकडून तिकडून आणलेली शस्त्रे दे चक्रपाणी," या पद्धतीने आपण शस्त्रसंभार बराच वाढवला आहे, हे खरे. तरीदेखील 'सेकंड फ्रंट' म्हणून सैन्यातल्या मालवाहू खेचरांना नाचायला शिकवून शत्रूला मंत्रमुग्ध (व नामोहरम) करायची सोय ठेवली तर ? राष्ट्रकार्य म्हणून दक्षिणेतला कुठलाही गुरू कुठल्याही खेचराला कथाकल्ली शिकवायला तयार होईल, पण एखादादुसरा चतुष्पाद उदयशंकर काय कामाचा ? मला वाटते, 'मास स्केल' वर नाच शिकवायचा म्हणजे



सगळ्या फौजी खेचरांना, मृणालिनी साराभाईंच्या क्लासला पाठविणेच बरे. पुढे मागे तर कुठल्याही खेचराने ' डान्सिग सर्टिफिकेट ' दाखविल्याखेरीज त्याची सैन्यात भरती करू नये, अशी मी जनरल चौधरींना सूचना करू इच्छितो.

● **पैसे खर्च करण्याची कथा**

माझी आतापर्यंत अशी समजूत होती (–अन् प्रत्येक अडाणी नवरा माझ्याशी सहमत असावा), की नवऱ्याने कमावलेले पैसे कसे खर्च करावेत, याचे बायकांना उपजत ज्ञान असते.–पण विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पॅरिसमधल्या एका बँकेने बायकांना पैसे खर्च करायला शिकविण्याचा वर्ग काढला आहे ! म्हणजे आता अर्थकारणाचे अनर्थकारण व्हायला उशीर नाही. कल्पना करा, केवळ उपजत ज्ञानाच्या जोरावर जर बायको नवऱ्याच्या पैशाचे सहज तीन तेरा करू शकते, तर " खर्च स्पेशॅलिस्ट " बायको काय करू शकणार नाही ?

एक पॅरिसवासी नवरा म्हणतो, माझी बायको जन्मतःच पैसे खर्च करण्यात इतकी हुशार आहे, की तिला अशा ' ट्यूशन ' ची जरूरी नाही. दुसरा म्हणतो, माझ्या बायकोने पैसे खर्च करण्याचे ज्ञान स्वतःच संपादन केले आहे, इतकेच नाही तर तिने ते उदार अंतःकरणाने आपल्या मुलीलाही दिले आहे. हिंदुस्थानातल्या नवऱ्यांचे तरी दुसरे काय म्हणणे असते ? उलट हिंदुस्थानातल्या नवऱ्याजवळ नसलेले पैसेदेखील त्याची ' ही ' खर्च करून दाखविते, हे विशेष कौतुकास्पद नाही का ? तेव्हा पॅरिसच्या बायकांसाठी पुण्याच्या बायकांना शिक्षिका म्हणून पाठवायला काहीच हरकत नाही.

● **पैशासारखे पाणी ?**

दिल्लीत सालाबादप्रमाणे यंदाही हीट लेव्हच्या सुमुहूर्तावर पाण्याचा दुष्काळ पडला आहे. या परिस्थितीला एकमेव तोडगा म्हणून एका त्रस्त मध्यमवर्गीय समंधाने आपल्या मंडळींना केलेली सूचना : "आतापर्यंत पाण्यासारखा पैसा खर्च केलात, आता जरा पैशासारखे पाणी खर्च करा."

सुधाकर राजे

# जगाच्या पाठीवर

## ● परीक्षापद्धतीत सुधारणा

"अभ्यासात तुमची खरोखर काय प्रगती आहे, याची तुम्हाला स्वतःला कल्पना आहेच आणि मलाही आहे. तेव्हा परीक्षा तरी कशाला घ्यावयाची. नोटीस बोर्डावर मी तुमची श्रेणी लिहितो, तुम्हाला ती मान्य झाली नाही आणि आपल्या वास्तविक पात्रतेपेक्षा खालची श्रेणी आपणास दिली गेली, असे तुम्हाला वाटलं, तर तुम्ही नेहमीप्रमाणे परीक्षा देऊ शकता." ब्रिस्टोल विद्यापीठातील माजी प्राध्यापक एच्. डी. एफ्. किट्टो यांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रयोग एकदा सुचविला होता. त्याचे पुढे काय झाले, समजले नाही, पण असा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे. विद्यार्थी व शिक्षक दोघेही स्वतःशी प्रामाणिक राहिले, तर हा प्रयोग निश्चित यशस्वी होईल व परीक्षेची आवश्यकताच भासणार नाही.

तीन तासांचा पेपर लिहायला सांगून त्यावरून विद्यार्थ्यांची प्रगती व यश आजमाविण्याची सध्याची पद्धती सदोष आहे, अशी टीका शिक्षणतज्ज्ञांनी अनेकदा केलेली आहे. कित्येकांना प्रश्नांची उत्तरे चांगली येत असूनही तीन तासांच्या मर्यादेत ती लिहिता येत नाहीत; म्हणजे तुम्हाला काय येते, यापेक्षा तुम्ही किती जलद लिहू शकता, याचीच ही परीक्षा होते. विषयाच्या आकलनापेक्षा परीक्षेपुरती गाइडांतील ठराविक प्रश्नांची उत्तरे घोकण्याला आणि तीन तासांत ती उद्धृत करण्यालाच अशा परीक्षांमध्ये महत्त्व येते. परीक्षेपुरते केलेले हे पाठांतर परीक्षेच्या दुसऱ्याच दिवशी विसरले जाते.

ही सदोष परीक्षापद्धती सुधारण्यासाठी पाश्चात्त्य विद्यापीठांतून निरनिराळे प्रयोग चालू आहेत. तीन तासांच्या पेपराऐवजी विद्यार्थ्यांना सोमवारी पेपर सांगावयाचा आणि त्याच्या उत्तरासाठी शुक्रवारपर्यंत मुदत द्यावयाची, हा प्रयोग ब्रिस्टोल विद्यापीठातील इंग्लिश विभागात गेल्या वर्षी करण्यात आला. पदार्थविज्ञानाच्या पदवीधरांचे बाबतीत दुसरा एक प्रयोग याच विद्यापीठात करण्यात आला. विद्यार्थ्यांना परीक्षेचे हॉलमध्ये पुस्तके नेण्याची परवानगी देण्यात आली. याचा अनुभव असा आला, की विद्यार्थ्यांनी पुस्तकातल्या माहितीनेच उत्तरे भरली. स्वतंत्र मुद्दे काही मिळाले नाहीत.

सध्याप्रमाणे तीन तासांच्या पेपरांची परीक्षा तर ठेवावयाचीच, पण त्याच्या जोडीला विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे सतत वर्षभर मूल्यमापन करीत जावयाचे, या दोन्ही तंत्रांचा अवलंब लँकेस्टर विद्यापीठात पहिल्या वर्षाच्या परीक्षेचे वेळी करण्यात आला.

यॉर्क विद्यापीठात निरनिराळ्या पाच पद्धतींचे एकत्रीकरण करून परीक्षा घेण्याचा प्रयोग करण्यात येत आहे. (१) सध्याप्रमाणे तीन तासांचे पेपर असतातच, पण काही विषयांच्या प्रश्नपत्रिका तीन दिवस आधी जाहीर करण्यात येतात. (२) काही विषयांची उत्तरे ग्रंथालयाच्या पद्धतीने लिहिण्यासाठी दहा दिवसांची मुदत दिली जाते. (३) सुटीत तयारी करून विद्यार्थ्यांना सात हजार शब्दांचा एक निबंध लिहावा लागतो. (४) याशिवाय प्रत्येक टर्मला एक याप्रमाणे विद्यार्थ्यांनी लिहिलेले तीन निबंध परीक्षेसाठी विचारात घेतले जातात. (५) कोणत्याही एका पेपराचेऐवजी किंवा त्याला पूरक म्हणून विद्यार्थ्यास तोंडी परीक्षा देता येते.

अशारीतीने निरनिराळ्या पद्धतींचे एकत्रीकरण करून सध्याच्या परीक्षापद्धतीतील दोष दूर करण्याचा प्रयत्न हे विद्यापीठ करीत आहे. आपल्याकडेही अशा स्वरूपाचे प्रयोग होणे आवश्यक आहे. विषय विद्यार्थ्याने कितपत आत्मसात केला आहे, याची चाचणी निरनिराळ्या प्रकारे घेतली गेली पाहिजे.

## ● इंग्लंडमधील विवाहसंस्था

विवाह जुळणाऱ्या धंदेवाईकसंस्थांवर नियंत्रण असले पाहिजे, त्यांना काही नियम असले पाहिजेत, अशी आवश्यकता इंग्लंडमधील सामाजिक कार्यकर्त्यांना वाटू लागली आहे. इंग्लंडमध्ये अशा एक हजार संस्था असून, दरवर्षी पंचवीस हजार लोक त्यांचा सल्ला घेतात; पण या संस्थांना काही नियम नाहीत. कायद्याने त्या नोंदल्या पाहिजेत, अशी सक्ती नाही. त्यांच्या फीबाबत काही निर्बंध नाहीत. साधारणपणे रजिस्ट्रेशन फी १० गिनी व लग्न जमल्यानंतर द्यावयाची फी २० ते ५० गिनी असते. तरुण मुलामुलींचे विवाह, प्रेम किंवा परस्पर परिचयातून जमतात किंवा जमविले जातात. त्यांना अशा संस्थांची आवश्यकता नसते. या संस्था मुख्यत: प्रौढांसाठी असतात.

अशा संस्थांचा सल्ला घेणाऱ्या लोकांमध्ये तीस वर्षांपर्यंतच्या गटात स्त्रियांची संख्या जास्त असते. तीस ते चाळीस वयाच्या गटात स्त्री व पुरुष दोघांचेही प्रमाण जवळजवळ सारखे असते. चाळीस ते साठ वयाच्या गटात स्त्रियांची संख्या जास्त, तर साठ ते ऐंशी वयाच्या गटात पुरुषांची संख्या जास्त असते. प्रौढांना आपली जबाबदारी कळते, तेव्हा आपल्यावर काही जबाबदारी नाही, अशीच संस्था चालकांची वृत्ती असते. "दोन प्रौढ माणसे एकत्र आल्यावर काय करतात, याला मी जबाबदार नाही," अशा शब्दांत एका चालकाने याबाबतचे आपले मत मांडले.

काही प्रौढ मनाच्या विशिष्ट अवस्थेत अशा संस्थांकडे धाव घेतात, तर काहींनी वर्षभर विचार करून अशा संस्थांची मदत घेतलेली असते. आपली हकीकत सांगताना ते घाबरतात. त्यांच्या तोंडून शब्द फुटत नाहीत. मग त्यांना एखादे पेय दिले जाते व थोडा धीर आल्यावर निरनिराळ्या स्थळांची माहिती पुरविली जाते.

त्यांतून निवड करून ते पत्रव्यवहार करतात, असा अनुभव एका संस्थेच्या चालिकेने सांगितला. या संस्थांचा प्रत्यक्ष उपयोग खरोखर कितपत होतो याची शंका असली तरी त्या अटळ आहेत, हे ब्रिटिश कौन्सिल ऑफ चर्चेसलाही मान्य करावे लागत आहे, पण अशा धंदेवाईक संस्थांपेक्षाही समाजहिताचे दृष्टीने चर्चनेच एखादी संस्था का चालवू नये अशी सूचना काही कार्यकर्त्यांनी केली, त्याबाबत निर्णय घेण्यापूर्वी धंदेवाईक संस्थांचे कार्य कसे चालते, याची पाहणी श्री. केनेथ लॉटन यांनी केली. ब्रिटिश कौन्सिल ऑफ चर्चेसचा लैंगिक प्रश्न, विवाह व कुटुंब यांसंबंधी सल्ला देणारा गट आहे. श्री. लॉटन या गटाचे सेक्रेटरी आहेत.

श्री. लॉटन यांनी सादर केलेल्या अहवालात धंदेवाईक विवाहसंस्थांसाठी काही आवश्यक नियम व अटी दिल्या आहेत. संस्थेचा चालकवर्ग समाजशास्त्रीय दृष्टीने या प्रश्नाचा अभ्यास केलेला आणि अशा कार्याचा अनेक वर्षे अनुभव असलेला असावा. सभासदांना वैयक्तिक मुलाखती घेऊन प्रवेश द्यावा. घटस्फोट, मृत्यू, वैद्यकीय तपासणीचे दाखले यांची छाननी करण्यात यावी. गुप्ततेची शपथ घेण्यात यावी, वगैरे नियम त्यांनी सुचविले आहेत. आपल्याकडील विवाहसंस्थांवरील नियंत्रणाचाही या दृष्टीने विचार होणे आवश्यक आहे.

विवाह जुळविणाऱ्या धंदेवाईक संस्था हॉलंडमध्येही आहेत, पण त्याशिवाय तेथे नफा न घेता चालविल्या जाणाऱ्या चार संस्था आहेत. डच रिफॉर्मड् चर्च, रोमन कॅथॉलिक्स आणि ह्युमॅनिस्ट सोसायटी यांच्या सहकार्याने त्यांचे कार्य चालते. पंचाहत्तर डॉक्टर सल्लागार व तेवढेच धर्मोपदेश त्यांना सल्ला देतात. सभासदांच्या मुलाखती व वैद्यकीय तपासणी करण्यात येते. माहिती गुप्त ठेवली जाते. सभासदांकडून घेतल्या जाणाऱ्या फीपैकी काही भाग सल्ल्याबद्दल डॉक्टरांना व धर्मोपदेशकांना दिला जातो व बाकीच्या रकमेतून संस्थेचा खर्च भागविला जातो.

आपल्याकडे धंदेवाईक विवाहसंस्था बऱ्याच आहेत, पण एक समाजकार्य म्हणून कोणताही फायदा न घेता कार्य करणाऱ्या संस्था फारच थोड्या आहेत. ज्या आहेत त्यांचे क्षेत्रही विशिष्ट जमातीपुरतेच असून, कार्यही वरांची माहिती पुरविणे एवढ्यापुरतेच मर्यादित आहे.

## नेहरूंचा कुत्रा

सिमल्यास गेल्या ११ जूनला हिमाचल राज्य रेडक्रॉसतर्फे कुत्र्यांचे एक प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यात एका कुत्र्याला पाहण्यासाठी सर्वांत मोठी रांग लागली होती. या कुत्र्याचे नाव मधू. हा पंडित नेहरूंनी पाळलेला त्यांचा आवडता कुत्रा. आपल्या धन्याची लोकप्रियता व कर्तबगारीचा वारसा त्यानेही काही प्रमाणात मिळविलेला दिसला. गुन्हेगारांचा शोध करण्यासाठी हिमाचल प्रदेश पोलिसांनी कुत्र्यांचे एक पथक ठेवले आहे. मधू या पथकाचा प्रमुख आहे. सबंध देशात असलेल्या अशा प्रकारच्या कुत्र्यांच्या पथकात हे पथक सर्वांत कार्यक्षम समजले जाते. ●

| | |
|---|---|
| लालमहाल | प्रतापगड |
| पन्हाळगड | राजगड |
| पुरंदर | आग्रा |
| लेखक<br>ब. मो. पुरंदरे<br>राजहंस | मूल्य<br>प्रत्येकी रुपये दोन<br>प्रकाशन, पुणे. |

MANOOS (Fortnightly) : 1 July 1965 : 30 Paise: Regd. No. B 9304

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल…

स्वस्तिक

चप्पल्स




Parkerson/srp/13

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं श्री. ग माजगावकर